१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, मंगळवार २ डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-७४, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 74, Marathi - Daily - Pune, 2 December, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा !

निवडणूक रद्द झाल्याने देवेंद्र फडणवीस नाराज.

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## 'काय डोंगर काय झाडी'फेम
# शहाजीबापूंवर धाड



### रडू कोसळले

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे शिंदे गटाचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या कार्यालयावर निवडणूक आयोगाच्या भरारी पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेने आज धाड टाकली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सांगोल्यातील प्रचारसभेनंतर काही तासांतच झालेल्या छापेमारीमुळे महायुतीतील अंतर्गत राजकारण पुन्हा चव्हाट्यावर आले. धाडीनंतर शहाजीबापू पाटील यांनी यामागे भाजपाचे दीपक साळुंखे असल्याचा थेट आरोप केला. प्रचाराचा कालावधी संपण्याच्या एक दिवस आधीच ही कारवाई झाल्याने त्यांना रडू कोसळले. दरम्यान, सांगोल्यातील शेकाप, राष्ट्रवादी आणि भाजपाच्या कार्यालयांवरही छापे पडल्याची माहिती आहे. या कारवाईवेळी पथकाने व्हिडिओ रेकॉर्डिंग करून तपासणी केली.

■ सोलापूर

शिंदे गटाचे माजी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले की, काल नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सांगोल्यात शिवसेनेची शेवटची जाहीर सभा झाली. त्यानंतर मी कार्यालयात गेलो. थोडी एक दहा मिनिटे खुर्चीवर झोप काढून घरी जाण्याचा विचार करत होतो. मला काही समजायच्या आत खासगी कपड्यात पाच-सहा लोक » पान ७ वर

नित्य नवे, प्रेम हवे!
पुरुषांसाठी
मदन योग®
पॉवर टॅब्लेटस्
आयुर्वेदिक सिध्द फॉर्म्युला !
Amazon वर कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध
94220 11723
मेडिकल, आयुर्वेदिक दुकानात उपलब्ध

# अचानक निवडणूक पुढे ढकलल्याने संताप
## मुख्यमंत्री ते विरोधी पक्षाची आयोगावर टीका

■ मुंबई

राज्यातील जवळजवळ २४ नगरपरिषदांच्या अध्यक्षपदासह अनेक ठिकाणी नगरसेवकपदाच्या निवडणुका मतदानाला एक दिवस शिल्लक असताना निवडणूक आयोगाकडून २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या. यामुळे राज्यात प्रचंड गोंधळ उडाला असून, राजकीय पक्ष कमालीचे संतप्त झाले आहेत. आज मुख्यमंत्री फडणवीस, भाजपा नेते यांच्यापासून विरोधी पक्षाने आयोगावर कठोर शब्दांत टीका केली आणि लेखी तक्रार करणार असल्याचे सांगितले. अंबरनाथ, बदलापूर, यवतमाळसारख्या काही ठिकाणी निवडणूक अधिकारी आणि उमेदवार यांच्यात वादही झाला. यामुळे राजकीय वातावरण तापले असताना आयोगाने कायदेशीर सल्ला घेऊनच निर्णय घेतल्याचा दावा केला. तर निवडणुकांचे निकाल ३ डिसेंबरला जाहीर न करता सर्व निवडणुका झाल्यावर एकत्र जाहीर करण्याची मागणी विरोधकांनी केली.







मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, निवडणूक आयोगाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावला. या निवडणुका रद्द करणे हे अत्यंत चुकीचे आहे. अशा पद्धतीने प्रत्येकवेळी कुणीतरी न्यायालयात जाईल आणि निवडणूक पुढे ढकलली जाईल, असे आजवर कधीच झालेले नाही. निवडणूक आयोग कोणाचा सल्ला घेत आहे आणि कुठल्या कायद्याचा आधार घेतला आहे, याची मला कल्पना नाही. मी जेवढा कायद्याचा अभ्यास केला आहे आणि अनेक वकिलांशी चर्चा केली आहे, त्यावरून असे म्हणता येईल की, एखादी व्यक्ती न्यायालयात गेली म्हणून निवडणूक पुढे ढकलता येत नाही. निलंग्यात सर्व प्रक्रिया पूर्ण झाली होती. एकाचा फॉर्म रद्द झाला. तो न्यायालयात गेला. न्यायालयानेही तो फॉर्म अमान्य केला. कुणीतरी आयोगाला प्रतिवादी बनवले म्हणून निवडणूक पुढे ढकलणे चूक आहे. ज्या उमेदवारांनी प्रामाणिक प्रयत्न केले, त्यांच्यावर हा अन्याय आहे. आता १५ ते २० दिवस त्यांनी पुन्हा प्रचार करायचा, हे चुकीचे आहे. आता निवडणूक होऊन जाईल, पण आम्ही याबाबत निवडणूक आयोगाशी चर्चा करू. निवडणूक आयोग स्वायत्त संस्था आहे. त्यांनी जो निर्णय घेतला आहे, तो मान्य करावा लागेल. पण हा निर्णय चुकीचा आहे. सरकार या प्रकरणी निवडणूक आयोगापुढे सादरीकरण करून हा निर्णय चुकीचा असल्याचे त्यांना पटवून देईल.

महसूलमंत्री भाजपाचे चंद्रशेखर बावनकुळे या घोळावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, निवडणूक आयोगाने मतदानाच्या ४८ तासांपूर्वी असा निर्णय घेणे अनाकलनीय आहे. त्यांनी कोणत्या नियमानुसार हा निर्णय घेतला, याचा अभ्यास करावा लागेल. आयोगाने २३ नोव्हेंबरलाच हा निर्णय घेतला असता तर निवडणूक अधिकाऱ्यांची एवढी तारांबळ उडाली नसती. सर्व नागरिक उद्या मतदान करायला जाणार आहेत. अशावेळी असे धक्के देणे योग्य नाही.

उबाठाचे अंबादास दानवे यांनीही निवडणूक आयोगावर टीका केली. ते म्हणाले की, आयोग हा चुकीचा पायंडा पडत आहे. उद्या निवडणूक पुढे ढकलण्यासाठी अशा पद्धतीने वेगवेगळ्या युक्त्या लढवल्या » पान ७ वर

### कायदेशीर सल्ला घेऊनच निर्णय

याबाबत आज निवडणूक आयोगाने असे स्पष्टीकरण दिले आहे की, निवडणुका पुढे ढकलल्या नसत्या, तर कायदेशीर तांत्रिक बाबींमुळे भविष्यात संपूर्ण निवडणूक प्रक्रियाच रद्द होण्याची भीती होती. हा मोठा धोका टाळण्यासाठीच कायदेशीर सल्ला घेऊन हा निर्णय घेणे अपरिहार्य होते. अशी नामुष्की टाळण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या निर्विघ्न पार पाडण्यासाठीच, सर्व बाजूंचा विचार करून निवडणुका स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## एपस्टाईन फाईलमध्ये कोणत्या भारतीय राजकारण्याचे नाव?

■ मुंबई

अमेरिकेचे सरकार एपस्टाईन फाईल खुली करणार असून, त्याचे भारतीय राजकारणावरही परिणाम होतील, अशी सूचक पोस्ट काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. त्यांच्या या पोस्टमुळे एपस्टाईन लैंगिक अत्याचार प्रकरणात सामील असलेला भारतीय राजकारणी कोण याची चर्चा सुरू झाली आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच एपस्टाईन फाईल्स ट्रान्सपरन्सी ॲक्टवर स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे जेफ्री एपस्टाईनने अनेक अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याच्या गुन्ह्यांशी संबंधित फाईल उघड करण्यात येणार आहे. या फाईलमध्ये असंख्य राजकारणी आणि अधिकाऱ्यांची नावे आहेत. त्यामुळे हे प्रकरण आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिले जात आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी या एपस्टाईन फाईलचे वृत्त शेअर करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा आणि महाराष्ट्र काँग्रेसला टॅग केले आहे. त्यामुळे चव्हाण यांना नेमके काय सुचवायचे आहे, यावर उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

### पृथ्वीराज चव्हाणांच्या पोस्टमुळे चर्चा

## ड्रामेबाजी सोडा, चिंतन करा
## मोदींचा विरोधकांना सल्ला

■ नवी दिल्ली

संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद भवन परिसरात देशाला संबोधित केले. याप्रसंगी त्यांनी विरोधी पक्षांवर बोचरी टीका करत 'ड्रामेबाजी सोडा, पराभवावर चिंतन करा', असा खोचक सल्ला दिला.

राजकारणात नकारात्मकता उपयोगी पडू शकते. परंतु राष्ट्रनिर्मितीसाठी सकारात्मक विचारसरणी असणेदेखील आवश्यक आहे. माझा तुम्हाला सल्ला आहे की, तुम्ही ड्रामेबाजी सोडा आणि आपला पराभव का होत आहे, यावर चिंतन करा, असे मोदी म्हणाले. बिहार विधानसभा निवडणुकीत झालेल्या दणदणीत विजयाबद्दल बोलताना मोदी म्हणाले की, बिहारमध्ये विक्रमी मतदान झाले हे लोकशाही मजबूत असल्याचे ढळढळीत उदाहरण आहे. या निवडणुकीत महिलांनी हिरीरीने भाग घेतला.

## आजारपणात राऊत यांची पत्रकार परिषद
## शिंदेंचे ३५ आमदार भाजपा फोडणार

■ मुंबई

आजारपणामुळे जनसंपर्कापासून अलिप्त राहण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिल्यानंतर काही काळ दूर झालेले शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी आज अनेक दिवसांनंतर पत्रकार परिषद घेतली. ते आजारी असल्याचे त्यांचा अशक्तपणा आणि त्यांच्या आवाजावरून कळत होते. मात्र त्यांच्या बोलण्याचा जोश पहिल्यासारखाच होता. त्यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले की, पालिका निवडणूक दोन्ही ठाकरे बंधू एकत्र लढविणार » पान ७ वर



### संजय राऊत यांच्यावर रेडिएशन

स्वत:च्या प्रकृतीबाबत बोलताना संजय राऊत म्हणाले की दोन महिन्यापेक्षा जास्त काळ मी घर आणि रुग्णालयाच्या कैदरवान्यात आहे. माननीय उद्धव ठाकरेंचे माझ्यावर बारीक लक्ष आहे. मी कुठे बाहेर पडत नाही ना हे ते पाहतात. आत्ताही त्यांची परवानगी नाही. तब्येतीत सुधारणा होते आहे. अजूनही सुधारणा होईल. उपचार कठोर असतात. आजारापेक्षा उपचार भयंकर असतात. डिसेंबरनंतर मी पूर्ण बरा होऊन येईन. आता रेडिएशनचा भाग संपला आहे. डॉक्टरांची टीम चांगले काम करते आहे, प्रकृती हळूहळू सुधारते आहे. डिसेंबरनंतर मी पूर्ण बारा होईन. देवेंद्र फडणवीस, नरेंद्र मोदी यांनीही चौकशी केली. एकनाथ शिंदेंनी फोन केला होता. कारण राजकारणाच्या पलीकडे काही नाती जपायची असतात. राज ठाकरेही दोन दिवसांत भेटायला येणार असल्याचे राऊत यावेळी म्हणाले.

## थरूर काँग्रेस बैठकीत पुन्हा गैरहजर
## आईसोबत असल्याचे स्पष्टीकरण

■ कोची

काँग्रेस कार्यकारिणी सदस्य आणि खासदार शशी थरूर काल काँग्रेसच्या



महत्त्वाच्या बैठकीत पुन्हा एकदा गैरहजर राहिले. यानंतर थरूर यांच्या कार्यालयाने ते सध्या केरळमध्ये त्यांच्या ९० वर्षीय आईसोबत असल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र यापूर्वी विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मुद्यावरील बैठकीत ते प्रकृती अस्वास्थ्यामुळे अनुपस्थित होते. थरूर यांची पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकीला गैरहजर राहण्याची ही दुसरी वेळ आहे. त्यामुळे पक्षांतर्गत चर्चेला उधाण आले आहे.

ऑपरेशन सिंदूरपासून थरूर अनेक प्रसंगी पंतप्रधान मोदींना धार्जिणी भूमिका घेत असल्याने काँग्रेसमध्ये त्यांच्याबद्दल नाराजी आहे. थरूर यांच्या भूमिकेवर काँग्रेस नेते संदीप दीक्षित यांनी टीका करत म्हटले की, थरूर यांना देशाबद्दल फारशी समज नाही. काँग्रेसच्या » पान ७ वर

## उत्तराखंडात अर्धकुंभ
## १४ जानेवारीपासून सुरू

■ देहराडून

उत्तराखंडमधील २०२७ चा अर्धकुंभ मेळा हरिद्वारमध्ये १४ जानेवारी ते २० एप्रिलदरम्यान होणार आहे. तब्बल ९७ दिवस चालणाऱ्या या मेळ्यात १० प्रमुख स्नान उत्सवांचा समावेश असून, यामध्ये पहिल्यांदाच चार अमृत स्नान (शाही) होणार आहेत. त्यामुळे हा अर्धकुंभ ऐतिहासिक ठरणार आहे.

अनेक दिवसांपासून अर्धकुंभाच्या तारखांबाबत गोंधळ निर्माण झाला होता. त्यानंतर मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी हरिद्वार धरण कोठी येथे आखाडा प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन वेळापत्रक निश्चित केले. १३ आखाड्यांनी कार्यक्रम, स्नानाच्या तारखा आणि आयोजनावर एकमताने सहमती दर्शवली आहे. मेळ्याचे उद्घाटन १४ जानेवारीला होणार असले तरी तयारी १ जानेवारीपासूनच सुरू होईल. २० एप्रिलला अंतिम स्नानानंतर मेळ्याची सांगता होणार आहे.

## ससून डॉकमधील मासे विक्रेत्यांचा
## आंदोलन करण्याचा इशारा

■ मुंबई

भाडे थकवल्याच्या कारणावरून गेल्या महिन्यात गोदामे रिकामी करायला लावलेल्या मत्स्य व्यावसायिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. मुंबई बंदर प्राधिकरण (एमबीपीए) आणि मत्स्य विकास महामंडळाच्या (एमएफडीसी) विरोधात आझाद मैदानात हे मत्स्य व्यावसायिक आंदोलन करणार आहेत.

हे आंदोलन २ डिसेंबर रोजी करण्यात येणार होते. मात्र २ डिसेंबर रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदान होणार असल्याने आंदोलन पुढे ढकलण्यात आले आहे. याबाबत ससून डॉक फिश ट्रेडर्स असोसिएशन आणि बंदर बचाओ समितीचे अध्यक्ष कृष्णा पवळे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असल्याने २ डिसेंबर रोजी संबंधित खात्याचे मंत्री मुंबईत उपलब्ध नसतील. त्यामुळे निवडणुका आटोपल्यानंतर आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ससून डॉकचे नूतनीकरण आणि त्या ठिकाणी आलिशान असा मरीन प्लाझा प्रकल्प उभारण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यासाठी ससून डॉकमध्ये कित्येक वर्षांपासून व्यवसाय करणाऱ्या मत्स्य व्यावसायिकांना हटवले जात आहे.

## व्होटचोरीवरून विरोधक आक्रमक
## दिवसभरासाठी कामकाज तहकूब

■ नवी दिल्ली

संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू झाले. अपेक्षेप्रमाणे हे अधिवेशन वादळी ठरेल याची चुणूक पहिल्याच दिवशी दिसून आली. मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीवरून (एसआयआर) विरोधकांनी लोकसभेत सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. 'व्होट चोर, गद्दी छोड'चे नारे लगावत विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज वारंवार स्थगित होत दुपारी दोन वाजता दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधकांनी अध्यक्षांसमोरच्या मोकळ्या जागेत येऊन जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रथम कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केले. १२ वाजता सदनाचे कामकाज सुरू झाले. मात्र काही वेळातच विरोधक पुन्हा आक्रमक झाले. » पान ७ वर

## लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणी
## एनआयएचे काश्मीर-लखनौत छापे

■ नवी दिल्ली

राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) ने लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणाच्या चौकशीसाठी डॉ. शाहीन शाहिदच्या लखनौ येथील घरासह जम्मू-काश्मीरमधील आठ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत स्थानिक पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाची मदत घेतली. तर महत्त्वाच्या आरोपींच्या घरांच्या झडती घेऊन कागदपत्रे जप्त केली.

एनआयए अधिकाऱ्यांनी सांगितले की, डॉ. आदिल आणि जसीर बिलाल यांचे काझीगुंडमधील घर, शोपियान येथील मुफ्ती इरफान यांचे घर, पुलवामाच्या कोइल येथील डॉ. मुझम्मिल याचे घर आणि सांबुरा येथील अमीर रशीद याच्या घराची झडती घेतली. लखनौमधील डॉ. शाहीन शाहिद आणि तिचा भाऊ डॉ. परवेझ अन्सारी यांच्या घरांवरही छापे टाकले. लाल किल्ला बॉम्बस्फोट कटात जैश-ए-मोहम्मदच्या आंतरराज्यीय व्हाईट-कॉलर मॉड्यूलची भूमिका असल्याचा संशय आहे. एनआयए आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी यापूर्वीही संबंधित » पान ७ वर

# वॉशिंग मशीन माणूसही धुणार

*आता कपड्यांबरोबरच माणूस धुणारी वॉशिंग मशीन बाजारात आली आहे. जपानमध्ये मानवांसाठी विशेष बनवलेली ही ह्यूमन वॉशिंग मशीन विक्रीसाठी उपलब्ध झाली असून, तिची किंमत तब्बल ३.८५ लाख डॉलर आहे.*



### जपानमध्ये विक्रीला उपलब्ध

■ टोकियो

ही मशीन ओसाका येथील सायन्स कंपनीने विकसित केली आहे. याला मिराई निनगेन सेंताकुकी असे नाव देण्यात आले आहे. कॅप्सूलसारख्या आकाराची असलेली ही वॉशिंग मशीन वापरकर्त्याला आत झोपून झाकण बंद केल्यावर कपड्यांसारखी मात्र स्पिनशिवाय पूर्ण शरीराची धुलाई व स्वच्छता करते. धुलाईदरम्यान संगीतही वाजवले जाते. ही वॉशिंग मशीन एआय तंत्रज्ञानावर आधारित असून ती केवळ १५ मिनिटांत माणसाला अंघोळ घालून, शरीर सुकवून पूर्णपणे ताजेतवाने करते. या पारदर्शक कॅप्सूलमध्ये बसल्यावर, पाण्याचा वेगवान फवारा आणि सूक्ष्म बुडबुड्यांच्या सहाय्याने त्वचेची स्वच्छता केली जाते. मशिनमध्ये बसवलेल्या सेन्सर्समुळे हृदयाचे ठोके व शरीराचे तापमान मोजले जाते आणि त्यानुसार एआय तंत्रज्ञान पाण्याचे तापमान नियंत्रित ठेवते. कंपनीने सध्या फक्त ५० युनिटच विक्रीसाठी तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

## प्लॅटफॉर्मवर शौचालय नसल्याने
## धावत्या रेल्वेतून उतरताना पडून मृत्यू

■ मुंबई

दादर स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक १० वर शौचालय नसल्याने लांब पल्ल्याच्या गाडीतील शौचालयाचा वापर करण्यासाठी गेलेल्या महिलेचा सुरू झालेल्या गाडीतून उतरताना रुळांवर पडून मृत्यू झाला.

ही ५८ वर्षीय महिला आंध्र प्रदेशमध्ये राहणारी आहे. ती मुलासोबत मुंबईत कामानिमित्त आली होती. मुंबईत ती आणि तिचा मुलगा अंबरनाथ येथे वास्तव्यास होते. ती आपल्या मुलासह अंबरनाथला परतण्यासाठी दादर स्थानकावरील मध्य रेल्वेच्या दहा क्रमांकाच्या प्लॅटफॉर्मवर आली. प्लॅटफॉर्मवर तिला शौचालय आढळले नाही. त्यामुळे प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या लांब पल्ल्याच्या गाडीतील शौचालयाचा वापर करण्यासाठी ती आणि तिचा मुलगा हैदराबादला जाणाऱ्या एक्स्प्रेस गाडीत चढले. शौचालयाचा वापर केल्यानंतर तिचा मुलगा गाडीतून खाली उतरला. परंतु तोपर्यंत गाडी सुरू झाली. त्यामुळे घाईघाईने गाडीतून उतरण्याच्या प्रयत्नात ती महिला प्लॅटफॉर्म आणि गाडी याच्या मधल्या पोकळीत पडली.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३


## पाहिजेत

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर / जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी 'बायका/मुली' पाहिजेत. पगार 18,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007 / 9892575886** दादर वेस्ट {NC252877}

होम टू होम सेल्स कामासाठी मुली/महिलांची आवश्यकता (वयमर्यादा 19 ते 50) क्षेत्र- नवी मुंबई, ठाणे, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ, पनवेल, मीरा-भायंदर कामाची वेळ - 5 तास. पगार 450 (Per Day) मोबाईल नंबर :- **8850107299 / 8850254970/ 7900098574** {NC253179}

भायखळा/माझगाव विभागात कुरिअर डिलिव्हरीसाठी कमिशनवर मुले/मुली पाहिजे. (Daily Payment) **8828077636** {NC253187}

लोअरपरेल पगार 18000 (सुट्टी नाही), वेळ 8 ते 5, PF, ॲडव्हान्स, बोनस, ट्रेनपास, बस भाडे, ओव्हर टाईम, इन्सेन्टिव्ह मिळेल, बिल्डिंगवरील टाक्याची साफसफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांसाठी, वय 40 पर्यंत. **9320080200 / 9821819036** {NC253143}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC253037}

ड्रायव्हर पाहिजेत - कॉल सेंटर, ओला उबेरसाठी. मुंबई, ठाणे, नवी मुंबई; टीआर लायसन्स आवश्यक. संपर्क: **9920925129** {NC253213}

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (24,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC253224}

मुली - हाउसकीपिंग, रिसेप्शनिष्ठ, सिक्युरिटी, पॅकिंग. 103,निर्मलाधाम, प्रभातनगर, गांवदेवी मैदान, ठाणे वेस्ट **7304179292** {NC253225}

पेस्ट कंट्रोल नेरुळ करिता अनुभवी टेक्निशियन पाहिजे. **9221964870 / 9892288297** {NC253186}

पाहिजेत सेल्स एक्झिक्युटिव्ह, पेस्ट कंट्रोल टेक्निशियन आणि वर्कर्स कामासाठी मुले पाहिजेत आकर्षक पगार आणि इतर सुविधा पेस्ट रिलीफ इंडिया प्रा.लि. संपर्क: **7498466001** {NC253222}

दादर-वरळी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 10000. फोन - **9029985564** {NC253178}

माहीम येथे ऑफीस कामासाठी ऑफीस बॉय, हेल्पर, ड्रायव्हर पाहिजेत. संपर्क- **9821116504/ 7303236166** {NC253236}

नोकरीची सुवर्ण संधी नर्सेस आणि हेल्थकेअर सेक्टर युएई. लेबर जॉब युरोप कंट्री. **9820433355** {NC253231}

अनुभवी इलेक्ट्रीशियन आणि हेल्पर पाहिजेत. पगार योग्यतेनुसार. संपर्क- **9819776666.** {NC253232}

सिक्युरिटी गार्ड, सुपरवायझर, एरिया ऑफिसर पाहिजे, सायन, अँटॉपहिल, संपर्क: **7303772600** {NC253235}

## पाहिजेत

मोठ्या प्रमाणात हाऊसकीपिंग सिक्युरिटी गार्ड ऑफीसबॉय पाहिजे वसईफाटा, बोरिवली, कांदिवली, पालघर, जोगेश्वरी, वडाळा.- **8097507698** {NC253237}

मुंबईत घरकाम, कूक, मुलांची काळजी, रुग्णसेवा, यासाठी मुली/महिला पाहिजे. मोफत राहणे-खाणेची व्यवस्था, पूर्णवेळ/अर्धवेळ, चांगला पगार. **9819339480** {NC253233}

फ्रेशर/ अनुभवी ऑफीसबॉय, बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह (फिल्ड), लेडीज ऑफीस असि., टेलीकॉलर पाहिजेत. **9326583110** {NC253234}

उल्हासनगर येथे ड्रायव्हरची आवश्यकता आहे उल्हासनगर/ अंबरनाथ/ बदलापूर येथे राहणाऱ्यांना प्राधान्य अर्ज आणि परवान्याची प्रत सोबत मुलाखतीसाठी भेटा. वेळ १० ते १२ पत्ता : गोदावरी अपार्टमेंट भाटिया चौक उल्हासनगर ४२१००५ मोबाईल **9175090420** {NC253238}

## Situation Vacant

Need Delivery boy in Santacruz West for all over Mumbai Contact :- **9987976412** {NC253180}


### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- **मॅनेजर, 'नवाकाळ'**



# टीम इंडियाचा युवा खेळाडू रिंकू सिंग

**टी-२० क्रिकेटमधील आव्हानात्मक असं फिनिशरचं काम रिंकूनं यशस्वीपणे केलंय. रिंकू सिंग हा मूळचा उत्तर प्रदेशातील अलिगढचा राहणारा आहे. येथूनच त्याने शिक्षण पूर्ण केलं. रिंकूची आयपीएलपर्यंत पोहोचण्याची कहाणी त्रास आणि दु:खांनी भरलेली आहे. रिंकूचे वडील अलिगडमध्ये गॅस सिलिंडरचे वाटप करायचे. रिंकू हा पाच भावंडांपैकी एक आहे. रिंकूला शालेय जीवनापासून क्रिकेटची खूप आवड होती आणि फावल्या वेळात तो मित्रांसोबत क्रिकेट खेळायचा. यात त्याला खूप आनंद मिळायचा. आर्थिक परिस्थितीमुळे रिंकूला शिक्षण अर्धवट सोडावे लागले. त्याने नववीला असताना शाळा सोडली. यादरम्यान कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमुळे रिंकूच्या वडिलांवर ५ लाखांचे कर्ज होते. वडील आणि भावाप्रमाणेच तो घराला अडचणीतून बाहेर काढण्यात व्यस्त होता. पण या कठीण काळातही रिंकूने क्रिकेट सोडले नाही. यादरम्यान त्याची उत्तर प्रदेशच्या अंडर-१९ टिममध्ये निवड झाली.**

संजीव वेलणकर
पुणे

क्रिकेट खेळताना दिसलो की, बाबा मला खूप मारायचे, अशी आठवण तो सांगतो. मात्र २०१२ मध्ये शालेय स्पर्धेत रिंकूला बक्षीस म्हणून बाईक मिळाली. या घटनेनंतर त्याच्या कुटुंबियांनी त्याला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. त्याचे वडील बक्षीस मिळालेल्या दुचाकीवरून सिलिंडर पोहोचवण्याचे काम करू लागले. मात्र, त्यानंतरही घरची स्थिती सुधारली नाही. यानंतर रिंकूने भावाकडे कुठेतरी



नोकरी लावण्याची विनंती केली. त्याच्या भावाने त्याला झाडू मारण्याच्या कामावर ठेवले, पण तो एका दिवसात काम सोडून परत आला. यानंतर रिंकूने घरात स्पष्टपणे सांगितले की, त्याला फक्त क्रिकेटमध्ये नशीब आजमावायचे आहे. यानंतर सततच्या मेहनतीच्या जोरावर त्याने यूपी संघात स्थान मिळवले. यूपीच्या अंडर-१६, अंडर-१९ आणि अंडर-२३ टीममधून रिंकू खेळला. २०१७ मध्ये त्याला किंग्स इलेव्हन पंजाबने आयपीएलसाठी टीममध्ये घेतले. पंजाबकडून रिंकूला फारशी संधी मिळाली नाही. पण रिंकूचे नशीब तेव्हा चमकले जेव्हा केकेआरने त्याला ८० लाखांची बोली लावून विकत घेतले आणि २०१८ मध्ये, तो मुंबई इंडियन्सच्या ट्रायल्समध्ये दिसला.

रिंकू सिंगने आपल्या वादळी फलंदाजीसह गेल्या दोन वर्षांत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. IPL २०२३ मध्ये सलग ५ चेंडूंत ५ षटकार मारून KKR ला विजयाकडे नेल्यानंतर रिंकूने मागे वळून पाहिले नाही. यंदा त्याच्या के के आर टीमने आयपीएल २०२४ चे तिसरे जेतेपद पटकावले. त्याने भारतासाठी टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण करत आपल्या खेळीची छाप पाडली आहे. रिंकूच्या बॅटने आयपीएल २०२४ मध्ये अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली नाही. तरीही त्याला टी-२० विश्वचषक संघातही राखीव खेळाडू म्हणून स्थान मिळाले होते. दुबईत झालेल्या आशिया चषक २०२५ स्पर्धेत भारतीय संघाने बाजी मारली होती. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये या स्पर्धेतील अंतिम सामना पार पडला होता. या स्पर्धेतील शेवटच्या सामन्यासाठी रिंकू सिंगला प्लेईंग ११ मध्ये स्थान दिले गेले होते. या सामन्यात रिंकूने शेवटच्या चेंडूवर चौकार मारून भारताला विजय मिळवून दिला होता. रिंकूचे समाजवादी खा. प्रिया सरोज बरोबर लग्न ठरले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत देशाच्या वेगवेगळ्या भागांतून अनेक तरुण महिला खासदार निवडून आल्या. प्रिया सरोज यादेखील संसदेत पोहोचणाऱ्या सर्वात तरुण महिला खासदारांपैकी एक आहेत.



# राष्ट्रवादीच्या आमदार कटके यांच्या मर्सिडीजने ४ वर्षांच्या मुलीला उडवले

■ शिरूर

**सत्ताधारी** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या मर्सिडीज कारने एका ४ वर्षीय मुलीला उडवले. ही मुलगी गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना दुपारी शिरूरच्या बोऱ्हाडेमळा येथे पुणे-अहिल्यानगर महामार्गावर घडली. शुभ्रा पंढरीनाथ बोऱ्हाडे असे जखमी मुलीचे नाव आहे.

आमदार ज्ञानेश्वर कटके काल दुपारी शिरूर नगरपरिषदेच्या प्रचारासाठी पुण्याहून शिरूरच्या दिशेने निघाले होते. रस्त्यात बोऱ्हाडे मळा येथील ह्युंदाई शोरूमच्या समोर शुभ्रा महामार्ग ओलांडण्याचा प्रयत्न करत होती. ती अचानक आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या काळ्या रंगाच्या मर्सिडीज समोर आली. लहान मुलगी कारपुढे आल्याचे पाहून कटके यांच्या चालकाने जोरात गाडीचे ब्रेक दाबले. पण मुलगी व कारमध्ये फारसे अंतर नव्हते. त्यामुळे कारने शुभ्राला उडवले. गाडीत बसलेले आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्यासह त्यांच्यासोबत असलेले त्यांचे कार्यकर्ते मदतीसाठी त्या मुलीच्या दिशेने धावले. त्यांच्याच कारमधून मुलीला शिरूर लगतच्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. पण त्यानंतर तिची प्रकृती गंभीर झाल्याने तिला पुण्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातात शुभ्राच्या डोके व जबड्याला जबर मार लागला आहे.

# काँग्रेसच्या लशींमुळे मोदी स्वत:च्या पायांवर उभे आहेत

■ मुंबई

## सुषमा अंधारेंचा पलटवार

**कोरोना** काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपलब्ध करून दिलेल्या लशीमुळे आपल्या साऱ्यांचा जीव वाचला या भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या दाव्याला शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. काँग्रेसने दिलेल्या चौदा लसींमुळे पंतप्रधान मोदी, रवींद्र चव्हाण आणि तुम्ही सगळे स्वतःच्या पायांवर उभे आहात, असे अंधारे म्हणाल्या. त्यांचा रोख पोलिओ आणि अन्य रोगांवर काँग्रेसच्या काळात देण्यात आलेल्या लशींवर होता.

त्या पुढे म्हणाल्या की, 'चाराने की मुर्गी और बाराने का मसाला' अशी भाजपाची अवस्था आहे. जाहिरातबाजी करण्यात भाजपाचा हात कोणी धरू शकणार नाही. रवींद्र चव्हाणांना कोण सांगणार की, तुम्ही एक लस दिली त्याचेही पैसे घेतले. काँग्रेसने पोलिओ, देवीसह चौदा लसी मोफत दिल्या. म्हणजे रवींद्र चव्हाणांसह पंतप्रधान मोदींचा जीव काँग्रेसने वाचवला. जर पोलिओची लस मिळाली नसती तर आपण सारे पांगुळगाडा घेऊन फिरलो असतो, असे अंधारे म्हणाल्या.

# सुरक्षा नोंदणी नंबर प्लेटला एक महिन्याची मुदतवाढ

■ पुणे

**राज्य** परिवहन विभागाने 'उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी' (एचएसआरपी) २०१९ च्या पूर्वीच्या वाहनांना बसविण्यासाठी आता वाहनचालकांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नंबर प्लेट बसविण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे. या मुदतवाढीमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

ही मुदतवाढ अंतिम असून एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर वायुवेग पथकाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्याच्या परिवहन आयुक्तांकडून सांगण्यात आले. राज्यात २०१९ च्या पूर्वीच्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंधनकारक आहे. त्यामुळे पुण्यात २५ लाखांपेक्षा जास्त वाहनांना ही नंबर प्लेट बसवावी लागणार आहे. मात्र, आतापर्यंत केवळ साडेसात लाख वाहनांना ही नंबर प्लेट बसविण्यात आली आहे. नंबरप्लेट बसविण्याचे काम एका कंपनीला देण्यात आले असून, वाहनसंख्या आणि त्या तुलनेत एचएसआरपी नंबर प्लेटची नोंदणी करून ती बसविण्यासाठी लागणारा कालावधी अधिक जात आहे.



# आजचे राशी भविष्य

मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | उत्साह टिकवून ठेवा. खरेदी कराल. नवीन वस्तूंची खरेदी होईल. कार्यक्षेत्रातील ज्येष्ठांची प्रेरणा लाभदायक ठरेल. |
| वृषभ | कुटुंबामध्ये मतभेद टाळा. हितशत्रूंकडे दुर्लक्ष करून स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करा. कलाकारांना नवीन संधी मिळेल. |
| मिथुन | अचानक धनलाभाचा योग आहे. कार्यक्षेत्रामध्ये बुद्धीचातुर्याने अडचणींवर मात कराल. मनातील इच्छा पूर्ण झाल्यामुळे आनंदी वृत्ती राहील. |
| कर्क | धाडसी योजना आखून यश मिळवाल. वाढलेल्या जबाबदारीस योग्य न्याय देण्यासाठी कामाची गती वाढवावी. जोडीदाराचा सल्ला उपयोगी पडेल. |
| सिंह | जिद्दीने व उत्साहाने हाती घेतलेले काम पूर्ण करा. वाणीवर नियंत्रण ठेवल्यास फायदा होईल. कुटुंबासह धार्मिक यात्रा केल्याचे समाधान मिळेल. |
| कन्या | कार्यक्षेत्रात मोठे निर्णय घेण्यासाठी अनुभवी व्यक्तीचा सल्ला जरूर घ्या. मनावर विनाकारण भीतीचा पगडा राहील. प्रवासात कागदपत्रे सांभाळा. |
| तूळ | स्पष्ट बोलावे लागले तरी सौम्य शब्द वापरावे. व्यवहारचातुर्याने नियोजित कामे मार्गी लावू शकाल. कलाकारांना प्रसिद्धीचा योग आहे. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रामध्ये शत्रूंवर मात करण्यासाठी भावनिक न होता अलिप्त धोरण योग्य ठरेल. कार्यशैलीतील सकारात्मक बदल उपयोगी राहील. कौटुंबिक मतभेद टाळा. |
| धनु | आर्थिक व्यवहाराबाबत सतर्क रहा. आळस झटकून कामाला लागा. नियमांचे काटेकोर पालन करावे. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. |
| मकर | कौटुंबिक समस्या मार्गी लावण्यासाठी जोडीदाराची साथ मिळेल. कार्यक्षेत्रामध्ये चिकाटीने केलेल्या कामाचे फळ मिळेल. मनामध्ये शंका कुशंका ठेवू नका. |
| कुंभ | नोकरीनिमित्त केलेल्या प्रवासामुळे फायदा होईल. निराशावादी विचार मनामध्ये येऊ देऊ नका. मिळालेल्या नवीन संधीमुळे मानसन्मान वाढेल. |
| मीन | आर्थिक गुंतवणूक करताना अनुभवी व्यक्तीचा सल्ला अवश्य घ्यावा. मुलांच्या प्रगतीमुळे समाधान मिळेल. नियोजित कामांमध्ये अडथळे आले तरी प्रयत्न सोडू नका. |

# — लॉटरी —

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 48 • सोडत दिनांक 01/12/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **SL-00 : 7654**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **7654** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई; श्री एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **0192** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1202 | 1740 | 3252 | 4025 | 4236 | 5225 | 6042 | 6645 | 7615 | 8033 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1428 | 1659 | 3092 | 3362 | 4605 | 6797 | 7278 | 8548 | 8740 | 9262 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0473 | 3963 | 5021 | 5035 | 5199 | 5933 | 6753 | 7035 | 7365 | 8532 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0360 | 0758 | 2301 | 3527 | 3901 | 4232 | 5156 | 6751 | 7274 | 7870 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1164 | 1708 | 2278 | 3146 | 3764 | 4443 | 5215 | 5908 | 6687 | 7578 | 8408 | 9149 |
| | | 1166 | 1712 | 2288 | 3192 | 3765 | 4445 | 5220 | 5915 | 6721 | 7598 | 8423 | 9154 |
| | | 1169 | 1759 | 2291 | 3218 | 3780 | 4447 | 5235 | 5946 | 6753 | 7606 | 8431 | 9206 |
| | | 1176 | 1795 | 2321 | 3230 | 3795 | 4457 | 5244 | 5954 | 6797 | 7636 | 8438 | 9216 |
| | | 1193 | 1796 | 2323 | 3262 | 3799 | 4459 | 5251 | 5965 | 6836 | 7666 | 8455 | 9259 |
| 0000 | 0564 | 1194 | 1827 | 2325 | 3289 | 3803 | 4461 | 5282 | 5994 | 6846 | 7675 | 8476 | 9299 |
| 0009 | 0591 | 1208 | 1834 | 2327 | 3305 | 3809 | 4466 | 5355 | 5996 | 6869 | 7701 | 8639 | 9315 |
| 0011 | 0605 | 1214 | 1836 | 2340 | 3313 | 3838 | 4467 | 5375 | 6012 | 6935 | 7710 | 8661 | 9316 |
| 0026 | 0609 | 1221 | 1851 | 2434 | 3317 | 3841 | 4468 | 5382 | 6033 | 6946 | 7717 | 8662 | 9436 |
| 0036 | 0621 | 1232 | 1911 | 2438 | 3318 | 3934 | 4471 | 5387 | 6036 | 6954 | 7721 | 8663 | 9437 |
| 0041 | 0698 | 1241 | 1912 | 2439 | 3321 | 4007 | 4499 | 5395 | 6142 | 6958 | 7725 | 8678 | 9445 |
| 0043 | 0728 | 1248 | 1915 | 2481 | 3323 | 4024 | 4514 | 5413 | 6146 | 6961 | 7731 | 8684 | 9455 |
| 0068 | 0740 | 1249 | 1926 | 2523 | 3327 | 4058 | 4549 | 5429 | 6186 | 6967 | 7737 | 8702 | 9463 |
| 0069 | 0756 | 1251 | 2027 | 2595 | 3331 | 4059 | 4596 | 5435 | 6206 | 7038 | 7747 | 8778 | 9545 |
| 0074 | 0766 | 1253 | 2028 | 2601 | 3340 | 4060 | 4613 | 5463 | 6217 | 7071 | 7753 | 8784 | 9560 |
| 0098 | 0773 | 1283 | 2030 | 2609 | 3342 | 4095 | 4646 | 5501 | 6259 | 7073 | 7765 | 8789 | 9597 |
| 0108 | 0778 | 1311 | 2033 | 2622 | 3369 | 4104 | 4649 | 5505 | 6266 | 7093 | 7769 | 8799 | 9605 |
| 0180 | 0803 | 1355 | 2042 | 2643 | 3370 | 4152 | 4684 | 5510 | 6283 | 7112 | 7780 | 8802 | 9608 |
| 0201 | 0814 | 1357 | 2043 | 2684 | 3376 | 4154 | 4693 | 5540 | 6306 | 7127 | 7795 | 8803 | 9610 |
| 0203 | 0815 | 1367 | 2069 | 2692 | 3380 | 4216 | 4724 | 5541 | 6317 | 7129 | 7796 | 8827 | 9669 |
| 0230 | 0820 | 1368 | 2086 | 2696 | 3393 | 4241 | 4794 | 5572 | 6319 | 7150 | 7820 | 8857 | 9696 |
| 0232 | 0825 | 1381 | 2093 | 2701 | 3397 | 4248 | 4901 | 5577 | 6322 | 7174 | 7828 | 8871 | 9697 |
| 0243 | 0833 | 1405 | 2096 | 2781 | 3423 | 4251 | 4905 | 5585 | 6360 | 7196 | 7892 | 8872 | 9701 |
| 0299 | 0837 | 1409 | 2102 | 2785 | 3426 | 4269 | 4906 | 5598 | 6381 | 7207 | 7902 | 8879 | 9801 |
| 0300 | 0844 | 1415 | 2111 | 2826 | 3435 | 4284 | 4939 | 5599 | 6384 | 7209 | 7909 | 8880 | 9829 |
| 0304 | 0853 | 1419 | 2122 | 2903 | 3446 | 4287 | 4944 | 5624 | 6417 | 7246 | 7930 | 8881 | 9863 |
| 0307 | 0855 | 1460 | 2123 | 2920 | 3527 | 4334 | 4954 | 5642 | 6426 | 7273 | 7978 | 8886 | 9884 |
| 0308 | 0886 | 1488 | 2125 | 2926 | 3534 | 4342 | 4955 | 5655 | 6448 | 7363 | 7987 | 8892 | 9889 |
| 0314 | 0909 | 1515 | 2142 | 2927 | 3536 | 4346 | 4993 | 5656 | 6460 | 7387 | 8016 | 8899 | 9892 |
| 0317 | 0950 | 1525 | 2158 | 2939 | 3539 | 4352 | 4998 | 5665 | 6468 | 7407 | 8018 | 8933 | 9895 |
| 0381 | 0988 | 1541 | 2182 | 2982 | 3540 | 4398 | 5005 | 5745 | 6480 | 7410 | 8033 | 8964 | 9898 |
| 0404 | 0997 | 1563 | 2206 | 2989 | 3590 | 4400 | 5016 | 5755 | 6488 | 7419 | 8074 | 8978 | 9915 |
| 0423 | 1004 | 1572 | 2208 | 2998 | 3593 | 4401 | 5049 | 5782 | 6489 | 7427 | 8089 | 8988 | 9916 |
| 0437 | 1074 | 1592 | 2216 | 2999 | 3613 | 4402 | 5059 | 5798 | 6534 | 7492 | 8128 | 9044 | 9931 |
| 0459 | 1091 | 1608 | 2218 | 3003 | 3632 | 4404 | 5134 | 5818 | 6556 | 7515 | 8180 | 9062 | 9961 |
| 0484 | 1100 | 1635 | 2231 | 3075 | 3636 | 4406 | 5145 | 5843 | 6604 | 7519 | 8256 | 9079 | 9975 |
| 0485 | 1114 | 1645 | 2233 | 3087 | 3638 | 4407 | 5151 | 5853 | 6622 | 7559 | 8301 | 9097 | 9978 |
| 0513 | 1115 | 1655 | 2254 | 3102 | 3663 | 4419 | 5153 | 5884 | 6623 | 7563 | 8312 | 9129 | 9980 |
| 0540 | 1119 | 1672 | 2269 | 3110 | 3673 | 4425 | 5196 | 5895 | 6661 | 7570 | 8341 | 9130 | 9981 |
| 0547 | 1161 | 1701 | 2275 | 3134 | 3737 | 4432 | 5200 | 5900 | 6678 | 7577 | 8368 | 9147 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री • धनलक्ष्मी विकली लॉटरी •

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 48 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 01/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SL-01 : 8691**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1219 | 1809 | 1876 | 2947 (पवार लॉटरी, ठाणे) | 4125 (रुक्मणी एन्टरप्राइझेस, औरंगाबाद) | 5313 | 5572 | 8220 | 8430 | 9541 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0370 | 2109 | 2555 | 2721 | 3582 | 3627 | 5909 | 6006 | 8693 | 9015 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1500 | 2795 | 3097 | 3578 | 3720 | 4020 | 5578 | 5786 | 6438 | 6545 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0759 | 2554 | 3039 | 4037 | 4825 | 5867 | 7605 | 9446 |
| | 0770 | 2559 | 3274 | 4044 | 4945 | 5981 | 7687 | 9490 |
| 0053 | 0830 | 2574 | 3307 | 4045 | 5088 | 6347 | 7814 | 9493 |
| 0066 | 1279 | 2592 | 3357 | 4093 | 5172 | 6491 | 7940 | 9541 |
| 0174 | 1421 | 2602 | 3393 | 4294 | 5364 | 6586 | 8024 | 9593 |
| 0305 | 1711 | 2639 | 3526 | 4345 | 5401 | 6617 | 8246 | 9654 |
| 0316 | 1811 | 2656 | 3537 | 4431 | 5526 | 6658 | 8417 | 9692 |
| 0330 | 1884 | 2704 | 3633 | 4460 | 5534 | 6946 | 8717 | 9808 |
| 0341 | 2021 | 2721 | 3635 | 4464 | 5556 | 7145 | 8751 | 9929 |
| 0483 | 2122 | 2914 | 3892 | 4483 | 5577 | 7229 | 8778 | 9938 |
| 0572 | 2326 | 2921 | 3896 | 4543 | 5633 | 7369 | 8940 | 9956 |
| 0595 | 2423 | 2931 | 3902 | 4551 | 5650 | 7497 | 9349 | 9965 |
| 0698 | 2462 | 2954 | 3931 | 4819 | 5732 | 7517 | 9356 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

निकाल — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 48 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 01/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-05 : 0845**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **2547**

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **2840**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1289 | 2542 | 4291 | 4305 | 4356 | 5235 | 6224 | 6490 | 8556 | 9017 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2758 | 3227 | 3531 | 3950 | 4444 | 5685 | 6378 | 8109 | 8127 | 9439 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0766 | 1256 | 1280 | 1618 | 2662 | 3096 | 3223 | 5648 | 5915 | 6360 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1174 | 2157 | 3328 | 4063 | 4785 | 5876 | 6695 | 7706 | 8859 |
| | | 1195 | 2189 | 3331 | 4134 | 4799 | 5905 | 6696 | 7726 | 8871 |
| | | 1217 | 2246 | 3334 | 4145 | 4848 | 5968 | 6731 | 7733 | 8886 |
| 0013 | 0577 | 1372 | 2270 | 3343 | 4148 | 4876 | 6036 | 6763 | 7741 | 8922 |
| 0023 | 0607 | 1418 | 2429 | 3350 | 4149 | 4948 | 6089 | 6814 | 7744 | 8934 |
| 0060 | 0610 | 1472 | 2492 | 3382 | 4202 | 4990 | 6264 | 6815 | 7814 | 8988 |
| 0062 | 0644 | 1482 | 2510 | 3420 | 4204 | 5127 | 6268 | 6825 | 7817 | 9409 |
| 0066 | 0654 | 1511 | 2529 | 3440 | 4214 | 5163 | 6299 | 6968 | 7927 | 9520 |
| 0071 | 0680 | 1519 | 2634 | 3532 | 4222 | 5182 | 6301 | 7024 | 8104 | 9582 |
| 0184 | 0734 | 1521 | 2677 | 3615 | 4240 | 5194 | 6363 | 7072 | 8168 | 9595 |
| 0204 | 0750 | 1642 | 2727 | 3703 | 4245 | 5255 | 6416 | 7075 | 8183 | 9597 |
| 0205 | 0850 | 1669 | 2762 | 3723 | 4276 | 5256 | 6429 | 7098 | 8284 | 9626 |
| 0250 | 0872 | 1703 | 2766 | 3770 | 4337 | 5515 | 6462 | 7173 | 8298 | 9649 |
| 0366 | 0884 | 1715 | 2812 | 3794 | 4348 | 5518 | 6469 | 7177 | 8395 | 9887 |
| 0407 | 0950 | 1747 | 2879 | 3821 | 4414 | 5539 | 6503 | 7267 | 8467 | 9894 |
| 0408 | 1014 | 1811 | 2911 | 3861 | 4433 | 5570 | 6539 | 7378 | 8615 | 9910 |
| 0432 | 1039 | 1845 | 3045 | 3913 | 4471 | 5598 | 6573 | 7401 | 8689 | 9912 |
| 0444 | 1067 | 1899 | 3138 | 3993 | 4546 | 5675 | 6621 | 7414 | 8734 | 9916 |
| 0505 | 1096 | 2008 | 3150 | 4025 | 4597 | 5685 | 6623 | 7427 | 8798 | 9932 |
| 0517 | 1109 | 2035 | 3224 | 4032 | 4644 | 5720 | 6647 | 7622 | 8814 | 9950 |
| 0567 | 1152 | 2062 | 3260 | 4046 | 4783 | 5745 | 6686 | 7675 | 8839 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ०२/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| ३ | २ | ७ |
| ३१ | २१ | ७१ |
| ३६ | २६ | ७६ |
| १२० | १३८ | १३३ |
| ४९० | २३७ | २२३ |

# श्री अनुसयानंदन मंदिरातर्फे दत्तजयंती सोहळ्याचे आयोजन

■ मुंबई

**श्री** अनुसयानंदन दत्त मंदिर ट्रस्ट यांच्यावतीने व मंदिराचे संस्थापक सुभाष बाळू मोरे यांच्या आशीर्वादाने भव्य श्री दत्तजयंती उत्सव महाड वरंडोली-वरेकोंड गावातील दत्तमंदिरात गुरुवार ४ डिसेंबर रोजी साजरा होणार आहे.

बुधवार ३ डिसेंबर ते गुरुवार ४ डिसेंबरपर्यंत दोन दिवस चालणाऱ्या या भक्तीमय सोहळ्यानिमित्त भजन, किर्तन, होम हवन, काकड आरती, पादुका पूजन, जप, नामस्मरण, दत्त मूर्तीवर अभिषेक, दत्त माऊलीची पालखी प्रदक्षिणा व दत्त मूर्तीची दृष्ट उतरविण्याचा सोहळा, श्री गजानन महाराज महाप्रसाद तसेच गावातील शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी भक्तगण मंडळींनी या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन वरील ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 48 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 01/12/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-02 : 0493**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0468 | 0489 | 0552 | 2524 (तुळशी लॉटरी एजन्सी, अहमदनगर) | 3590 | 4947 | 6506 | 6954 | 7267 | 8458 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0343 | 1080 | 1960 | 2086 | 2262 | 4663 | 5057 | 7215 | 7451 | 8692 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0528 | 1697 | 2241 | 3972 | 4304 | 4344 | 4522 | 4967 | 7523 | 9352 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1035 | 1203 | 2180 | 4883 | 5518 | 6204 | 6383 | 7012 | 7718 | 8346 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 100/- | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1540 | 2417 | 3333 | 4075 | 4684 | 5451 | 6446 | 7380 | 8248 | 9191 |
| | | 1569 | 2420 | 3352 | 4173 | 4690 | 5455 | 6515 | 7399 | 8268 | 9341 |
| 0003 | 0597 | 1598 | 2422 | 3373 | 4175 | 4744 | 5524 | 6637 | 7633 | 8395 | 9368 |
| 0031 | 0615 | 1630 | 2459 | 3396 | 4227 | 4758 | 5575 | 6651 | 7675 | 8398 | 9384 |
| 0070 | 0708 | 1641 | 2571 | 3502 | 4243 | 4775 | 5592 | 6659 | 7717 | 8426 | 9390 |
| 0098 | 0721 | 1643 | 2612 | 3503 | 4304 | 4791 | 5596 | 6673 | 7738 | 8489 | 9438 |
| 0141 | 0748 | 1647 | 2649 | 3542 | 4327 | 4848 | 5615 | 6674 | 7741 | 8524 | 9449 |
| 0180 | 0820 | 1661 | 2786 | 3595 | 4332 | 4878 | 5703 | 6723 | 7757 | 8583 | 9469 |
| 0208 | 0850 | 1752 | 2819 | 3596 | 4395 | 4880 | 5775 | 6763 | 7777 | 8697 | 9503 |
| 0240 | 0903 | 1757 | 2821 | 3597 | 4436 | 4889 | 5805 | 6825 | 7789 | 8744 | 9524 |
| 0242 | 1011 | 1811 | 2835 | 3603 | 4437 | 4923 | 5857 | 6876 | 7797 | 8781 | 9589 |
| 0261 | 1046 | 1839 | 2849 | 3763 | 4445 | 4943 | 5903 | 6890 | 7878 | 8786 | 9654 |
| 0390 | 1070 | 1885 | 2856 | 3827 | 4447 | 5016 | 5918 | 6896 | 7891 | 8790 | 9698 |
| 0403 | 1083 | 1994 | 2920 | 3883 | 4463 | 5106 | 5921 | 6910 | 7899 | 8804 | 9749 |
| 0408 | 1168 | 2082 | 2948 | 3920 | 4484 | 5145 | 5995 | 6963 | 7930 | 8806 | 9750 |
| 0470 | 1173 | 2098 | 3023 | 3956 | 4499 | 5211 | 6049 | 7019 | 7945 | 8814 | 9770 |
| 0474 | 1181 | 2150 | 3033 | 3964 | 4541 | 5245 | 6111 | 7119 | 8037 | 8839 | 9779 |
| 0495 | 1273 | 2182 | 3034 | 3978 | 4590 | 5303 | 6116 | 7136 | 8058 | 8848 | 9797 |
| 0507 | 1295 | 2221 | 3069 | 3993 | 4650 | 5314 | 6165 | 7144 | 8110 | 8895 | 9909 |
| 0557 | 1328 | 2283 | 3130 | 4001 | 4657 | 5328 | 6178 | 7165 | 8123 | 9071 | 9920 |
| 0572 | 1448 | 2315 | 3200 | 4034 | 4674 | 5341 | 6353 | 7210 | 8196 | 9155 | 9957 |
| 0591 | 1513 | 2413 | 3332 | 4043 | 4683 | 5417 | 6432 | 7302 | 8222 | 9180 | 9970 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शक्तिपीठ महामार्ग चंदगडहून जाणार मुख्यमंत्र्यांची प्रचार सभेत घोषणा

■ कोल्हापूर

**जनतेच्या** समर्थनामुळे शक्तिपीठ महामार्ग चंदगड तालुक्यातून वळवला असून कोणत्याही परिस्थितीत हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प चंदीगडमधून जात पूर्ण करणारच, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केली. चंदगडमध्ये आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदासाठी भाजपा उमेदवार सुनील काणेकर, आजरा नगर पंचायत नगराध्यक्षपदासाठीचे उमेदवार अशोक चराटी आणि गडहिंग्लज नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गंगाधर हिरेमठ यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत फडणवीस बोलत होते. त्याप्रसंगी फडणवीस म्हणाले की, शक्तिपीठ महामार्गाचे महत्त्व ओळखून आमदार शिवाजी पाटील यांनी या महामार्गाच्या समर्थनार्थ मोर्चा काढला होता.त्यामुळे शक्तिपीठ महामार्ग चंदगडच्या दिशेने वळवण्यात आला. या महामार्गालगत लॉजिस्टिक पार्क,एमआयडीसी तयार करून या भागामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडवून आणले जाईल.

## सोलापुरात काँग्रेसला धक्का गोल्डन वूमन फुलारे भाजपात

■ सोलापूर

**काँग्रेसच्या** नेत्या दोन वेळा नगरसेविका राहिलेल्या आणि गोल्डन वूमन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीदेवी फुलारे यांनी भाजपाचे कमळ हाती धरले आहे. निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला बसलेला हा मोठा धक्का मानला जात आहे. फुलारे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार कोठे, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, माजी महापौर दिलीप कोल्हे यांच्या उपस्थितीत पती जॉन फुलारे यांच्यासह भाजपामध्ये प्रवेश केला.त्यानंतर लगेचच त्या विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतासाठी हजर राहिल्या.




## भाजपा उमेदवाराकडून शिवरायांच्या पुतळ्याला भाजपाची टोपी व गमछा

■ भंडारा



**भंडारा** नगरपालिकेच्या निवडणूक प्रचारादरम्यान प्रभाग क्रमांक २ मधील भाजपाच्या महिला उमेदवाराने प्रचारादरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या डोक्यावर भाजपाची टोपी आणि गळ्यात कमळाचा गमछा घालण्याचा प्रकार घडला. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली आहे.

यावर उबाठाच्या उपनेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराज आमच्याच पक्षात आहेत हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न भाजपाकडून झाला. ही कृती निषेध आणि संतापाच्या पलीकडची आहे.

काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, महाराष्ट्राच्या दैवतांचा अपमान ही भाजपाची सवय झाली आहे. प्रचाराच्या नादात आता थेट छत्रपतींच्या पुतळ्याला पक्षाची टोपी आणि दुपट्टा घालण्यात आला.

## काँग्रेस उमेदवाराच्या फलकाला काळे फासले

■ बुलडाणा

**पालिका** निवडणुकीच्या आदल्या दिवशी मुस्लीमबहुल तेलगू नगर परिसरातील काँग्रेसच्या अध्यक्षीय उमेदवार लक्ष्मी दत्ता काकस यांच्या प्रचार फलकाला अज्ञातांनी काळे फासले. सकाळी ही बाब लक्षात येताच परिसरात तणाव निर्माण झाला. काँग्रेसचे उमेदवार वसीम शेख, नदीम शेख यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी पालिका कर्मचाऱ्यांच्या मदतीने खराब झालेला फलक खाली उतरवला. त्यानंतर पोलिसांनी तो फलक व लोखंडी सांगाडा जप्त करून पोलीस ठाण्यात नेला. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी शहर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. घटनेची माहिती मिळताच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पोलीस ठाण्यात पोहोचले व तातडीने तपासाची मागणी केली.

## मुख्यमंत्री नाही! उपमुख्यमंत्री म्हणा अजित पवारांच्या विधानाने हशा

■ पुणे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा प्रचाराच्या अखेरच्या दिवशी आज सर्वच पक्षांनी शक्तिप्रदर्शन केले. पुण्यातील राजगुरुनगर येथील उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रचारसभा अनपेक्षित प्रसंगामुळे चर्चेचा विषय ठरली. सभेच्या सुरुवातीला एका कार्यकर्त्याने अजित पवार यांचा उल्लेख राज्याचे मुख्यमंत्री असा केला. त्यावर तत्काळ प्रतिक्रिया देत पवार म्हणाले, मला उपमुख्यमंत्री म्हणा, मुख्यमंत्री नाही! त्यांच्या या विधानाने सभास्थळी हशा पिकला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभेला उद्देशून विकासाच्या मुद्यांवर संबोधित केले. ते म्हणाले की, मी कामाचा माणूस आहे. कोणाकडून चिरीमिरी मागून किंवा पैशांच्या जोरावर कामे घेतलेली नाहीत. ७० हजार कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला जातो, पण एक रुपयाचाही अपहार केलेला नाही. तुम्ही आम्हाला साथ दिली, तर येथील प्रश्न मी हिवाळी अधिवेशनात प्राधान्याने सोडवेन. आचारसंहितेमुळे निधी किंवा विकास योजनांबाबत

## कागलमध्ये उबाठा उमेदवाराची माघार

■ कोल्हापूर

**कागल** नगरपरिषद निवडणुकीत मतदानाच्या काही तास आधीच राजकीय वातावरण तापले. उबाठाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शारदा नागराळे यांनी अचानक निवडणुकीतून माघार घेतली असून या निर्णयामुळे कागलच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आणि समरजितसिंह घाटगे यांनी अनपेक्षितरित्या एकत्र येत आघाडी केल्यानंतर कागलमध्ये राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली. दोघांचा संयुक्त प्रचार जोरात सुरू असताना शिंदे गट एकाकी पडला होता. परंतु आता ठाकरे गटातील प्रमुख उमेदवारानेच माघार घेतल्याने परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. शारदा नागराळे यांनी माघार घेत थेट मुश्रीफ-घाटगे आघाडीला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे ठाकरे गटात असंतोष आणि नाराजी उसळली असून गटाने निवडणूक संवेदनशील घोषित करण्याची मागणी केली आहे. उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

## एमआयएमच्या महिला उमेदवाराच्या पतीवर ३ जणांचा जीवघेणा हल्ला

■ अकोला

अकोल्याच्या अकोट नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १५ मधील एमआयएमच्या नगरसेवकपदाच्या महिला उमेदवार उज्ज्वला तेलगोटे यांचे पती राजेश तेलगोटे यांच्यावर आज सकाळी जीवघेणा हल्ला करण्यात आला. निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी ही घटना घडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. राजेश तेलगोटे यांच्या माहितीनुसार, आज सकाळी मॉर्निंग वॉकवरून परतत असताना अज्ञात तीन हल्लेखोरांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. त्यानंतर ते फरार झाले. हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर अकोट ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची बातमी पसरताच तेलगोटे यांचे समर्थक व कार्यकर्त्यांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती

## जतमध्ये अजित पवारांच्या उमेदवाराच्या घरावर हल्ला

■ सांगली

**जत** नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असून आज पहाटे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सुरेश शिंदे यांच्या घरावर आणि गाडीवर अज्ञातांकडून दगडफेक करण्यात आली. या हल्ल्यात घराचे तसेच गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. घटना घडली तेव्हा शिंदे कुटुंबीय घरातच होते. हल्ल्यानंतर हल्लेखोर पसार झाले. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.


या प्रकरणी भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांकडून ही दगडफेक झाल्याचा आरोप माजी आमदार विलासराव जगताप यांनी केला असून, संबंधित हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## छगन भुजबळांचा थेट रुग्णालयातून प्रचार

■ मुंबई

**नगरपालिका,** नगरपरिषद आणि नगरपंचायती निवडणुकांच्या तोंडावर येवला नगरपालिकेसाठी महायुतीच्या प्रचारसभेत अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ अनोख्या पद्धतीने सहभागी झाले. तब्येत बिघडल्यामुळे मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू असतानाही त्यांनी थेट रुग्णालयातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मतदारांना संबोधित केले.

भुजबळ यांच्या फेसबुक पेजवर शेअर झालेल्या व्हिडिओमध्ये ते हाताला सलाईन, नाकाला ऑक्सिजन पाइप लावलेल्या अवस्थेत भाषण करताना दिसतात. भुजबळ म्हणाले की, २१ वर्षे येवल्याचे प्रतिनिधित्व करत असताना



आम्ही कुणाच्याही जमिनी लुबाडल्या नाहीत, बँका लुबाडल्या नाहीत, कुणाचे पैसे बुडवले नाहीत. मी येवल्यात नसतानाही पंकज व समीर अहोरात्र काम करत आहोत. तुम्ही मला जितके प्रेम दिले, तितकेच प्रेम महायुतीच्या सर्व उमेदवारांना द्या.

## चाकणला लवकरच स्वतंत्र महानगरपालिका मिळणार

**अजित पवारांची माहिती**

■ पुणे

**चाकण** शहरातील वाढती लोकसंख्या पाहता चाकणला स्वतंत्र महापालिका स्थापन करण्यावर सरकारच्या पातळीवर विचार सुरू आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिकृत उमेदवार भाग्यश्री वाडेकर यांच्या प्रचारसभेत ते बोलत होते.

अजित पवार म्हणाले की, चाकण शहराची लोकसंख्या वाढत चालली आहे. त्यामानाने सोयी-सुविधा अपुऱ्या पडू लागल्या आहेत. पायाभूत सोयी-सुविधा वाढवणे ही काळाची गरज बनली आहे. त्या दृष्टिकोनातून चाकण शहरासाठी स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करण्यावर विचार सुरू आहे. इंदूरच्या धर्तीवर विकास करण्यासाठी पुणे जिल्हयातील ज्या तीन शहरांची निवड करण्यात आली आहे त्यात चाकणचा समावेश आहे. समाजामध्ये लाडक्या बहिणींना मान-सन्मान मिळवून देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि आपले सरकार नेहमीच करत आले आहे. चाकण शहराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आम्हाला संधी द्या.

## खंडूराज गायकवाड यांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर

■ मुंबई

**लोककला** क्षेत्रातील भरीव आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने मंत्रालयातील ज्येष्ठ पत्रकार खंडूराज गायकवाड यांची राज्य सांस्कृतिक पुरस्कार- २०२४ साठी निवड केली आहे.



गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ लोककलावंतांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने कार्य करणारे गायकवाड हे लोककला व तमाशा परंपरेचे अभ्यासक म्हणूनही ओळखले जातात. प्रयोगात्मक कलेतील त्यांच्या योगदानाबद्दल सांस्कृतिक कार्य विभागाने त्यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आहे. तमाशा सम्राज्ञी कै. विठाबाई नारायणगावकर यांच्या नावाने जीवनगौरव पुरस्कार सुरू करण्यासाठी त्यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. तसेच राज्यातील लोककलावंत अनुदान शिफारस समितीवर त्यांनी काम केले आहे. गायकवाड हे रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे दीर्घकाळ सदस्य राहिले असून मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या कार्यकारिणीवर सध्या ते काम करीत आहेत. अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा वर्षानुवर्षे कार्यसंबंध आहे.

## रेल्वेच्या तत्काळ तिकिटांसाठी ओटीपी पडताळणी अनिवार्य

■ मुंबई

**रेल्वे** मंडळाच्या निर्देशांनुसार पश्चिम रेल्वेने तत्काळ तिकीट बुकिंगची प्रक्रिया बदलली आहे. आता तत्काळ तिकीट मिळवण्यासाठी ओटीपी पडताळणी आवश्यक असणार आहे. बुकिंग करताना प्रवाशाने दिलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी पाठवला जाईल आणि तो टाकल्यानंतरच तिकीट मिळेल. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी सांगितले की, ही नवी प्रणाली पहिल्यांदा मुंबई सेंट्रल-अहमदाबाद शताब्दी एक्स्प्रेस ट्रेन क्रमांक १२००९/१२०१० या गाडीमध्ये सुरू झाली आहे. यासाठी रेल्वेने प्रवाशांना वैध आणि चालू मोबाईल नंबर देण्याचा सल्ला दिला आहे. याशिवाय, १ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू केलेल्या नियमांनुसार, आधार पडताळणी केलेले प्रवासीच बुकिंग सुरू झाल्यानंतर पहिल्या १५ मिनिटांत ऑनलाइन तिकीट बुक करू शकतील.

## राज्य निवडणूक आयोग स्वत:चे नियम पाळण्यात अपयशी! सपकाळांचा घणाघात

■ मुंबई

**राज्यातील** २४६ नगरपालिका ४२ नगरपंचायतींचे मतदान एक दिवसावर आले असताना २० नगरपालिका व काही प्रभागात निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय आश्चर्यकारक आहे. कोर्टाच्या निकालाने या निवडणुका पुढे ढकलल्या असे जर सांगितले जात असेल तर हा निकाल २२ नोव्हेंबरला आला होता. मग ३० नोव्हेंबरपर्यंत म्हणजे ८ दिवस निवडणूक आयोग झोपा काढत होते काय?, असा संतप्त सवाल करून निवडणूक आयोग स्वत:चे नियम पाळू शकत नाही. आयोगाचा भोंगळ कारभार सुरू आहे, असा घणाघाती आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळपास १० वर्षांनंतर होत आहेत. या निवडणुका कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात. मात्र त्यातही गोंधळ निर्माण करण्यात आला. आधी अर्ज भरण्याची प्रक्रिया किचकट केली, मतदार याद्यांमध्ये घोळ करण्यात आले. दुबार, तिबार नावे मतदार यादीत दाखवली, निवडणुका जाहीर झाल्यानंतर आरक्षणाच्या मुद्यावर कोर्टाने निर्देश दिल्याने अनेक नगरपंचायतीमधील भवितव्य टांगणीला लागले आहे.

## अंबरनाथमध्ये निवडणूक अधिकारी दालनात शिंदेसेनेचा गदारोळ

■ अंबरनाथ

**अंबरनाथमध्ये** निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात शिंदेसेनेचे कार्यकर्ते आणि उमेदवारांनी निवडणूक अधिकाऱ्यांच्या दालनात घुसून जोरदार घोषणाबाजी केली. लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या निवडणूक आयोगाचा निषेध असो, अशा घोषणा देत शिंदेसैनिकांनी आयोगावर राजकीय दबावाखाली निर्णय घेतल्याचा आरोप केला. उद्या मतदान असताना अचानक निवडणूक पुढे ढकलल्याने उमेदवारही संतप्त झाले असून त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना जाब विचारला. अंबरनाथमध्ये शिंदेसेना आणि भाजपा यांच्यात थेट सामना होणार आहे. शिंदेच्या जिल्हाप्रमुखांनी आरोप केला की, कोणताही आक्षेप नसताना उमेदवारांनी सर्व तक्रारी मागे घेतल्यानंतरही निवडणूक पुढे ढकलली. काही सत्ताधारी मंडळी निवडणुकीला घाबरत आहेत.

## मुंबईतील विवाहित पुरुष आणि तरुण बांगलादेशी तृतीयपंथी टोळीच्या जाळ्यात

**सामाजिक कार्यकर्त्याची माहिती**

■ मुंबई

**मुंबईतील** असंख्य विवाहित पुरुष आणि तरुणांना व्यसनाचे आणि अधिकच्या पैशाचे आमिष दाखवून बांगलादेशी बाबूखान या तृतीयपंथीच्या म्होरक्याने आपल्या जाळ्यात ओढले असल्याची धक्कादायक माहिती सामाजिक कार्यकर्ते कृष्णा आडेलकर यांनी दिली. या बांगलादेशी बाबूखानला गंभीर आजाराची लागण असल्याचे पुरावेसुद्धा पोलिसांना दिले असल्याचे आडेलकर यांनी सांगितले.

खऱ्या तृतीयपंथीसाठी कॅन्सर संस्थेच्या माध्यमातून काम करणारे कृष्णा आडेलकर पुढे म्हणाले, न्यायालयाने जामिनावर सोडलेल्या बाबूखान उर्फ ज्योती हाजी यांच्याकडे हजारो तृतीयपंथींची टोळी आहे. ही टोळी मुंबईतील गोऱ्यागुमट्या मुलांना आणि कुटुंबात कलह, नैराश्य असलेल्या विवाहित पुरुषांना चरस, गांज्या, दारू पुरवत त्यांना महिना मोठ्या रकमेचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढत आहे. पोलिसांनी चौकशी केलेल्या काही तृतीयपंथींचे हे दोन विवाह झाल्याचे सिद्ध झाले आहे. अनेकजण दिवसा घरी असतात आणि रात्री तृतीयपंथी म्हणून धंदा करतात. तशी तक्रारही गोवंडी मानखुर्द पोलीस ठाणे आणि पोलीस आयुक्तालयात केली आहे.

मुंबईच्या रेल्वे डब्यात जबरदस्तीने पैसे मागणारे आणि शहरातील रस्त्यावर रात्री देहविक्रीचा धंदा करणारे तरुण आणि पुरुष हे बाबूखान यांच्या टोळीत सापडलेले बोगस तृतीयपंथी असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यासंदर्भात पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याचे आपण उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## अनुमाई नगरात नागरिकांचा निवडणूक मतदानावर बहिष्कार

■ नगर

**नगर** परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीस केवळ काही तास शिल्लक असताना प्रभाग क्रमांक १५ मधील अनुमाई नगरात नागरिकांनी मतदान प्रक्रियेवरच बहिष्कार जाहीर केला. नळाला पाणी नाही, तर मतदान नाही, या आशयाचे फलक परिसरात लावून नागरिकांनी प्रशासनाविरुद्ध आणि लोकप्रतिनिधींच्या ढिसाळ कामकाजाविरुद्ध रोष व्यक्त केला. अमृत योजनेअंतर्गत सहा वर्षांपूर्वी नळ आणि पाइपलाइन बसविण्यात आले, मात्र मुख्य वाहिनीला पाण्याच्या टाकीशी जोडणी न झाल्याने आजतागायत पाणीपुरवठा सुरू नाही. अनेक वर्षे आश्वासने मिळूनही प्रत्यक्ष काम न झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. निवडणुकीच्या उंबरठ्यावर पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत मतदानाचा बहिष्कार कायम राहील, असा इशारा नागरिकांनी प्रशासन व उमेदवारांना दिला.

## कोल्हापुरात चिमुरडीवर अत्याचाराचा प्रयत्न

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्ह्यात अवघ्या सात वर्षांच्या चिमुरडीवर एका नराधमाने लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केला. पीडित मुलगी आपल्या आईसोबत एका नातेवाईकाच्या लग्नाला गेली असताना हा प्रकार घडला. अचानक घडलेल्या या प्रसंगामुळे लग्नस्थळी खळबळ माजली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला ताब्यात घेतले आहे.

लग्नाला आलेल्या काही नातेवाईकांसोबत मुलगी फिरण्यासाठी गेली होती. २८ वर्षीय विकास कांबळे तिच्या मागोमाग गेला. त्याने तिला जबरदस्तीने उसाच्या शेतात ओढून नेण्याचा प्रयत्न केला. चिमुरडीवर अत्याचार करण्याचा आरोपीचा मनसुबा होता. मात्र, तिने मोठ्याने आरडाओरडा सुरू केल्याने आसपासचे लोक घटनास्थळी धावून आले. लोक जवळ येत असल्याचे पाहताच आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत होता, पण जमलेल्या नागरिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या हवाली केले. घटनेनंतर मुलगी आणि तिचे कुटुंबीय भीतीच्या छायेखाली आहेत. इस्पुर्ली पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून आरोपीला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट असून नागरिकांनी आरोपीला कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे.

## सांताक्रूझमधील बिल्लाबोंग हायस्कूलला बॉम्बची धमकी

■ मुंबई

**सांताक्रूझ** येथील बिल्लाबोंग हायस्कूलला आज सकाळी ईमेलद्वारे बॉम्बची धमकी मिळाली. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली. शाळा प्रशासनाने तत्काळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर मुंबई पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. या पथकांनी शाळेजवळील परिसर, सुरेश वाडकर यांच्या मालकीचा आजीवासन स्टुडिओ आणि एक मंगल कार्यालय रिकामे करून शोधमोहीम राबवली. मात्र, कोणतेही स्फोटक साहित्य किंवा संशयास्पद वस्तू सापडली नाही, असे पोलिसांनी स्पष्ट केले

## वसई वायूगळती प्रकरणी चौकशी समिती स्थापन

■ वसई

**वसईमध्ये** झालेल्या क्लोरिन वायू सिलिंडरच्या गळती प्रकरणी पालिका आयुक्तांनी चौकशी समिती स्थापन केली आहे. या दुर्घटनेत १८ जण बाधीत झाले होते तर एकाचा मृत्यू झाला होता. दरम्यान, १५ वर्ष जुने असलेले सिलिंडर कुठल्या कंपनीचे आहेत, त्याच्या नोंदी पालिकेकडे नसून त्या कंपनीचा शोध घेतला जात आहे.वसई-विरार महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे जलशुध्दीकरणासाठी क्लोरिन वायू असलेली गॅस सिलिंडर होती. मागील १५ वर्षांपासून ठिकठिकाणी हे सिलिंडर पडून होते. २५ नोव्हेंबर रोजी दिवाणमान येथील जलकुंभाजवळ ठेवण्यात आलेल्या एका सिलिंडरमधून विषारी क्लोरिन वायूची गळती झाली होती. यामुळे इमारतीत राहणारे १८ नागरिक बाधीत झाले होते. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे पालिकेचा गलथानपणा उघड झाला होता. सिलिंडर ज्या ठिकाणी होते तिथे कुठल्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था नव्हती. १५ वर्षांपासून सिलिंडर तिथे होते तरी त्याची माहिती पालिकेला नव्हती. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी महापालिका आयुक्तांनी चौकशी समिती स्थापन केली आहे. या दुर्घटनेला नेमके जबाबदार कोण आहेत, त्याचा शोध या समितीमार्फत घेतला जाणार आहे.

### सिलिंडरची कंपनी सापडेना

वसई विरार महापालिका स्थापनेच्या आधी वसईत ४ नगरपरिषदा होता. त्यांना उसगाव धरणातून पाणीपुरवठा केला जात होता. या उसगाव धरणाच्या जलशुध्दीकरणासाठी या क्लोरिन वायूचा वापर केला जात होता. त्यासाठी हे सिलिंडर आणण्यात आले होते. मात्र त्यावेळी कुठल्या कंपनीने हे सिलिंडर दिले होते त्याची माहिती पालिकेकडे नाही. सध्या या कंपनीचा शोध सुरू असून त्यांना सिलिंडर परत केले जाणार आहेत.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

# नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# लोकसंख्येतील वाढ : काम कमी टेन्शन जास्त

भारताची लोकसंख्या हा नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. या लोकसंख्या वाढीशी निगडित अनेक प्रश्न केव्हा आणि कसे उग्र रूप धारण करतील हे सांगता येत नाही. सगळ्या लोकसंख्येच्या किमान गरजांची पूर्तता होणे हे सर्वात मोठे आव्हान असतेच. सुदैवाने गेल्या काही वर्षांत भारतातले अन्नधान्य उत्पादन अपेक्षेपेक्षा जास्त वेगाने वाढलेले आहे. आज देशातील १४० कोटी जनतेची अन्नधान्याची गरज भागवून भारत जगातल्या अनेक देशांना धान्य निर्यातही करतो आहे. एवढेच नव्हे तर आज सरकारी रेशन दुकानातून सरकारच्याच आकडेवारीप्रमाणे जवळपास ८० कोटी लोकांना दरमहा दहा किलो धान्य मोफत दिले जाते आहे. याचा अर्थ असे मोफत अन्नधान्य देऊन अडीअडचणीच्या काळासाठी धान्याचा साठा बाजूला ठेवता येणे शक्य झाले आहे. म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, पाणी या मूलभूत गरजांपैकी अन्नधान्याबाबतची परिस्थिती समाधानकारक आहे. परंतु रोजगाराचा प्रश्न सर्वात गंभीर असून, या वाढत्या लोकसंख्येला आवश्यक तेवढ्या रोजगाराची उपलब्धता करून देणे सरकारच्या आवाक्याबाहेर जाते आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येसाठी देशभर तितकेच कार्यक्षम शासन, प्रशासन असणे गरजेचे ठरते. लोकांच्या सरकारकडूनच अनेक प्रकारच्या अपेक्षा असल्याने समाजाच्या साधनसुविधांसाठी किंवा अन्य व्यवस्थांसाठी तितक्या मोठ्या प्रमाणावर सरकारी कर्मचारी वर्गदेखील नियुक्त करावा लागतो आहे. तंत्रज्ञानामुळे आणि अनेक नव्या व्यवस्थांमुळे कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढही करावी लागते आहे. या कर्मचाऱ्यांच्या पगारावर दरवर्षी वाढत जाणारा खर्च ही तर पुढच्या भविष्यकाळातली एक मोठी भयघंटाच ठरणार आहे. सध्याच्या लोकसंख्येत तरुणांचे प्रमाण जास्त आहे. परंतु पुढच्या तीस वर्षांत हेच तरुण म्हातारे होतील. एकूणच देशाच्या लोकसंख्येत ज्येष्ठ नागरीकांची संख्या वाढेल. परिणामी सरकारी नोकरीमध्ये आवश्यक असलेला प्रशिक्षित तरुण वर्ग उपलब्ध होईल की नाही याबद्दलही शंका व्यक्त होऊ लागली आहे. याउलट पुढच्या तीस वर्षांत निवृत्त होणारे कर्मचारी आणि आधीच निवृत्त झालेले कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनावर होणारा खर्च सरकारी तिजोरीवरचा सर्वात मोठा भार असेल.

### वाढत जाणारा पेन्शनचा खर्च

कोणत्याही कर्मचाऱ्याला त्याच्या निवृत्तीनंतरच्या काळात पेन्शनचा मोठा आधार असतो. परंतु या पेन्शनचे प्रमाण नेमके किती आणि कसे असावे. याबद्दलच्या धोरणाचा सरकारपुढे तितकाच मोठा प्रश्न उभा राहणार आहे. कारण लोकसंख्येच्या प्रमाणात वाढत जाणारी निवृत्तीधारकांची संख्या आणि त्यांना द्यावे लागणारे पेन्शन हे सरकारपुढचे सर्वात मोठे टेन्शन राहणार आहे. आजच सरकारच्या तिजोरीतून सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारावर सर्वाधिक खर्च होत असतो. पुढच्या काळामध्ये पेन्शनधारकांची संख्या दुप्पट होईल आणि सरकारी तिजोरीत निधीचा खडखडाट राहील अशी शक्यताही नाकारता येत नाही. म्हणजेच लोकसंख्येतून निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या प्रश्नांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची वाढणारी संख्या हादेखील सरकारसाठी काळजी करण्यासारखा विषय ठरेल. मूलभूत गरजांची पूर्तता करतानादेखील सरकारला बरीच कसरत करावी लागेल. एकीकडे भारताला जागतिक आर्थिक महासत्ता होण्याचे वेध लागलेले आहेत. त्यासाठी आवश्यक असलेल्या उद्योग व्यवसायांची किंवा देशांतर्गत साधनसंपत्तींचे नियोजन करावे लागते आहे. परंतु आर्थिक महासत्ता होऊनही वाढत्या लोकसंख्येचे हे वाढते परिणाम सरकारला दुर्लक्षित करून चालणार नाहीत. आज उपलब्ध असलेला गुणवत्ता किंवा कौशल्य असलेला तरुण वर्ग आजच्या प्रमाणामध्ये पुढच्या तीस-पस्तीस वर्षांमध्ये मिळू शकणार नाही. म्हणजे कुशल कर्मचाऱ्यांची संख्या कमी, पण त्यांच्यावर होणारा खर्च मात्र सर्वात जास्त असा हा विरोधाभास निर्माण होऊ शकतो. अन्नधान्याशिवाय निवाऱ्याचे प्रश्न म्हणजेच प्रत्येकाला स्वतःचे घर उपलब्ध करून देण्यातही अडचणी येत राहतील. खेड्यांच्या तुलनेत शहरांची संख्या वाढते आहे. आणि शहरांमध्ये घरांच्या किमती तितक्याच वेगाने वाढत असल्याने सर्वांसाठी घर हे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्णत्वाला येण्याची शक्यता राहत नाही. स्वाभाविकपणे या सगळ्या वाढत्या लोकसंख्येला आवश्यक चांगल्या पाण्याचा पुरवठा, आवश्यक तेवढी वीज आणि आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे म्हणजे लोकसंख्येबरोबर सुविधा वाढवण्यासाठीदेखील स्पर्धा सुरूच राहील.

### भौगोलिक असंतुलन

याशिवाय महत्त्वाची समस्या म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणात भौगोलिक असंतुलनही निर्माण होण्याची भीती आहे. देशाच्या विशिष्ट भागामध्ये विशिष्ट प्रकारची लोकसंख्या वाढत जाणे म्हणजे तिथल्या लोकसंख्येच्या दबावाचा सरकारला सतत सामना करत राहणे क्रमप्राप्त ठरते. जशी आज पश्चिम बंगालमध्ये स्थिती निर्माण झाली आहे. म्हणजेच वाढती लोकसंख्या हा भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेसाठीसुद्धा एक महत्त्वाचा मुद्दा ठरू शकतो. या परिस्थितीचा आतापासूनच विचार झाला पाहिजे. आता उपलब्ध असलेल्या तरुण वर्गाचा उपयोग करून घेणे, त्यांच्या रोजगारात वाढ करणे, शहरांपेक्षा गावाकडच्या सोयीसुविधांमध्ये वाढ करणे आणि भविष्यकाळातील या ज्येष्ठ नागरीकांच्या निवृत्तीवेतनासंदर्भातही आतापासूनच योजनांची पूर्वतयारी करणे क्रमप्राप्त ठरते. तरच लोकसंख्येचा हा वाढता भार पेलवता येऊ शकतो. भारताची आर्थिक स्थिती सुधारत असताना भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या समस्यांच्या निराकरणासाठी याच अर्थव्यवस्थेला स्वतंत्रपणे विचार करावा लागेल. जी लोकसंख्या देशाचे एक मनुष्यबळ असते त्याच लोकसंख्येतून निर्माण होणारे हे प्रश्न केव्हाही निर्णायक टप्प्यावर येऊ शकतात. त्याचे स्वरूप केव्हाही उग्र होऊ शकते. समाजातल्या सगळ्या वर्गांचा समानतेने विचार करताना किमान गरजांबरोबर काळाबरोबर बदलणाऱ्या आवश्यक सुविधांची पूर्तता महत्त्वाची ठरते. खरे तर भारत हा कृषीप्रधान देश असल्याने शेती व्यवसायाला वेगवेगळ्या पद्धतीने भक्कम करणे हा त्यावरचा मोठा उपाय ठरू शकतो. कोरोना काळामध्ये सगळे व्यवसाय बंद असताना शेती उद्योगानेही अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लावला होता.


**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

संघर्ष सुद्धा त्यांनाच निवडतो
ज्यांच्यात लढण्याची ताकद असते.

**पंचांग**

**मंगळवार, २ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



**मार्गशीर्ष शुक्ल द्वादशी**
**नक्षत्र : अश्विनी**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मेष**

**रवी उदय- ०६-५७**
**रवी अस्त- १७-५९**

**भौम प्रदोष, सूर्य ज्येष्ठा उत्तररात्री १.१३, व्यंकटगिरी मुकुटोत्सव**


मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.


संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)


## पाककृती



### पहाडी चणा डाळ



★ **साहित्य :-** १ कप हरभरा डाळ, २ कांदे बारीक चिरलेला, २ ते ३ सुक्या लाल मिरच्या, १ चमचा जिरे, २ इंच आल्याचा तुकडा, १ इंच दालचिनी, ८-१० काळी मिरी, २ तमालपत्र, २ लवंग, २ वेलची, १ चमचा बडीशेप, १ चमचा लिंबाचा रस, १ चमचा तूप, मीठ चवीनुसार, पाणी.

★ **कृती :-** पहाडी चणा डाळ बनवण्यासाठी सर्वप्रथम एक कप चणा डाळ नीट धुवून सुमारे अर्धा तास पाण्यात भिजत ठेवावी. नंतर मिक्सर ग्राईंडरमध्ये दोन ते तीन लाल मिरच्या, आल्याचा एक तुकडा, दालचिनीचा तुकडा, तमालपत्र, एक चमचा जिरे, लवंग दोन ते तीन, दोन ते तीन वेलची, एक चमचा बडीशेप घाला. सोबत लिंबाचा रस एकत्र मिक्स करा. थोडे पाणी घालून ग्राईंडरमध्ये बारीक पेस्ट तयार करा. कुकरमध्ये चणा डाळ टाका. त्यात चवीनुसार मीठ, देशी तूप, हळद, चिमूटभर हिंग घालून शिजवावे. डाळ किमान चार ते पाच शिट्ट्यांमध्ये शिजवावे. जोपर्यंत ते चांगले वितळत नाही. कुकरचा प्रेशर निघाल्यावर कढईत तेल घालून गरम करावे. तेल गरम झाल्यावर त्यात बारीक चिरलेला कांदा घालून परतून घ्यावा. कांदा चांगला सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. कांदा सोनेरी झाल्यावर त्यात मसाला पेस्ट घालून परतून घ्या.





# आयपीएलचे सामने बंगळूरूमध्ये होणार नाहीत?

## स्टेडियमला फिटनेस चाचणीत उत्तीर्ण व्हावे लागणार



**गेल्या महिला विश्वचषक स्पर्धेच्या वेळी न्यायमूर्ती जॉन मायकल डी'कुन्हा समितीने बंगळूरुचे चिन्नास्वामी स्टेडियम स्पर्धा आयोजनांसाठी असुरक्षित ठरवले होते. त्यामुळे आयपीएलचे सामने या स्टेडियममध्ये होतील की नाही, हे अजून निश्चित झालेले नाही. स्टेडियममध्ये पुन्हा सामने आयोजित करण्यापूर्वी तज्ज्ञांकडून सुरक्षा मंजुरी आणि फिटनेस चाचणी पास करणे आवश्यक असणार आहे.**

■ बंगळूरु

**एम.** चिन्नास्वामी स्टेडियमची सध्याची रचना मोठ्या आयोजनांसाठी सुरक्षित नाही. स्टेडियममध्ये प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठी पुरेसे दरवाजे नाहीत. आणीबाणीच्या परिस्थितीत बाहेर पडण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार नियोजन उपलब्ध नाही. या स्टेडियमसह आजूबाजूचे रस्ते खूप वर्दळीचे आहेत. ज्यामुळे आणीबाणीच्या परिस्थितीत उपाययोजना करणे कठीण होते. वाहन पार्किंगची जागा खूप कमी आहे. ज्यामुळे वाहतूक आणि गर्दीचे नियंत्रण बिघडते. या अहवालानंतर आयसीसी महिला विश्वचषकाचे सामने देखील बंगळुरूहून नवी मुंबईत हलवण्यात आले.

देशांतर्गत टी-२० लीग महाराजा टी-२० ट्रॉफी देखील बंगळुरूऐवजी म्हैसूरमध्ये हलवावी लागली होती. ३ जून २०२५ रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने पहिली आयपीएल फायनल जिंकली होती. त्यानंतर ४ जूनला स्टेडियममध्ये विजय मिरवणूक काढण्यात आली होती. परंतु स्टेडियमबाहेर प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली. ज्यात ११ लोकांचा मृत्यू झाला आणि ५०पेक्षा जास्त लोक जखमी झाले होते. या घटनेच्या चौकशीसाठी न्यायमूर्ती जॉन मायकल डी'कुन्हा यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. ज्याच्या अहवालात स्टेडियमशी संबंधित अनेक उणिवा समोर आल्या. कर्नाटक सरकारने चिन्नास्वामी स्टेडियमला फिटनेस चाचणी उत्तीर्ण करण्याचा आदेश दिला. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेला नोटीस पाठवली आहे.

## लंडन बुद्धिबळ ओपनमध्ये प्रज्ञानंदचा प्रभाव कायम

■ लंडन

**भारतीय** ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने लंडन बुद्धिबळ क्लासिक ओपनमध्ये आपली प्रभावी कामगिरी सुरू ठेवली आणि तो स्पर्धेचा को-लीडर बनला. सहाव्या फेरीत त्याने ५/६ गुण मिळवले आणि सध्या तो सर्बियन ग्रँडमास्टर वेलिमिर इविकसह पहिल्या स्थानावर आहे. प्रज्ञानंदने दिवसाची सुरुवात हंगेरियन ग्रँडमास्टर टॉमस फोडोस ज्युनियर विरुद्ध फक्त २१ चालींमध्ये बरोबरीने केली. परंतु दुसऱ्या फेरीत त्याने इस्त्रायलच्या आंतरराष्ट्रीय मास्टर एयटन रोसेनला पराभूत करून उल्लेखनीय पुनरागमन केले. त्याचा पुढचा सामना वेलिमिर इविकशी होईल जो स्पर्धेतील एक टर्निंग पॉईंट ठरू शकतो.

## हरमित सिंगची 'खासदार श्री'वर मोहोर

■ मुंबई

बोरिवली पश्चिमेकडील प्रमोद महाजन क्रीडा संकुलात प्रेक्षकांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडलेल्या खासदार श्री शरीरसौष्ठव स्पर्धेने वेगळीच उंची गाठली. या



अटीतटीच्या पोझयुद्धात आंतरराष्ट्रीय कीर्तीचा शरीरसौष्ठवपटू हरमित सिंग 'खासदार श्री'चा किंग ठरला. त्याने मुंबई श्रीचा किताब पटकावणाऱ्या उमेश गुप्ता, नीलेश दगडे, नीलेश रेमजे, अक्षय मोगरकर यांची कडवी लढत मोडून काढत लाखमोलाच्या स्पर्धेवर आपले नाव कोरले.

केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी केलेली लाखमोलाच्या बक्षिसांची उधळण केल्यामुळे या स्पर्धेत तब्बल ३०० पेक्षा अधिक शरीरसौष्ठवपटूंनी विक्रमी सहभाग नोंदवला. एकापेक्षा एक आणि बलाढ्य खेळाडूंच्या पीळदार युद्धात हरमित सिंगने उमेश गुप्ता, निलेश दगडे आणि संदीप सावळे यांना मागे टाकत विजेतेपदावर आपला हक्क गाजवला. मुख्य शरीरसौष्ठवाप्रमाणे मेन्स फिजिक फिटनेस गटातही स्पर्धकांच्या सहभागाने सेंच्युरी गाठत विक्रम केला. या दोन गटांच्या स्पर्धेतील १६५ सेमी गटात अनिश शिंदे, तर १६५ सेमी वरील गटात बॉबी पाटील विजेता ठरला.

## खो-खो स्पर्धा! ओम साईश्वर मंडळाने दोन्ही मुकुट पटकावले

■ मुंबई

**मुंबई** खो-खो संघटनेच्या मान्यतेने इन्स्पायर फाऊंडेशन आयोजित आणि मनसे पुरस्कृत कुमार-मुली (ज्युनिअर) मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा केशवराव दाते क्रीडांगण, आगाशे पथ, दादर (प.)येथे अत्यंत थरारक आणि रोमहर्षक लढतींच्या साक्षीने या स्पर्धेचा समारोप झाला. दोन्ही गटांत ओम साईश्वर सेवा मंडळाने पहिल्यांदाच दुहेरी मुकुट पटकावले. अंतिम फेरीच्या थरारक आणि धमाकेदार



सामन्यांमुळे प्रेक्षकांनी रोमांच अनुभवला. मुले-मुली दोन्ही गटांत ओम साईश्वर सेवा मंडळाने पहिल्यांदाच दुहेरी मुकुट मिळवत आणि शानदार विजय साजरे करत जिल्हा अजिंक्यपदावर सुवर्णाक्षरात नाव कोरले. ओम साईश्वर सेवा मंडळाचे हे मुलींचे तिसरे तर कुमारांचे पहिले अजिंक्यपद ठरले. यापूर्वी कुमारांमध्ये दोनवेळा त्यांना उपअजिंक्यपदावर समाधान मानावे लागले होते.

मुलींच्या अंतिम सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने शिवनेरी सेवा मंडळावर ६-५ (मध्यंतर ३-२) असा १.१० मि. राखून १ गुणाने धमाकेदार विजय मिळवत तिसरे अजिंक्यपद मिळवले. ओम साईश्वरच्या कादंबरी तेरवणकर (३.३०, ४.४० मि. संरक्षण), यशस्वी कदम (नाबाद १.१०,३.३० मि.संरक्षण व ३ गुण), निर्मिती परब (४.२० मि. संरक्षण), आर्या जाधव, आर्या गोरीवले व आर्या आचरेकर (प्रत्येकी १ गुण)यांनी तिसऱ्या अजिंक्यपदावर नाव कोरले.

## तुकाराम सुर्वे स्मृती क्रिकेट स्पर्धा आयुष गोहोची भेदक गोलंदाजी

■ ठाणे

**आयुष** गोहोच्या प्रभावी गोलंदाजीमुळे गणपत भुवड संघाने सदाशिव सातघरे संघावर पहिल्या डावात अवघ्या ४ धावांची आघाडी मिळवत ठाणे फ्रेंड्स युनियन आयोजित दुसऱ्या तुकाराम सुर्वे स्मृती १६ वर्षे वयोगटाच्या मुलांच्या २ दिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या बाद फेरीत खेळण्याच्या आशा कायम ठेवल्या. गणपत भुवड संघाने पहिल्या डावात १३४ धावा बनवल्यावर आयुषने ३५ धावांत ५ बळी मिळवत प्रतिस्पर्ध्यांना १३० धावांवर रोखत संघाला मोलाची आघाडी मिळवून दिली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या गणपत भुवड संघाला सिद्धांत सिंगने २२ आणि अर्जुन जाधवने २८ धावा करत संघाला सव्वाशे धावांचा पल्ला गाठून दिला. या डावात आयुष सुर्वेने तीन आणि अरीन चौबळ, आदित्य खेडेकर, रुद्र गिरीने प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. या आव्हानाचा पाठलाग करताना निरव बोरकरने ४६, आदित्य कदमने २५ आणि तन्मय मालुसरेने २४ धावांची खेळी करत संघाला आघाडी मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. पण त्यांना इतर फलंदाजांकडून साथ न मिळाल्याने सदाशिव सातघरे संघाला वर्चस्व मिळवता आले नाही. जय वामणे दोन तर अभिनव कदम आणि आर्यन मंदोराने प्रत्येकी एक बळी मिळवला.

## ठाण्यात आजपासून रंगणार विभागीय खो-खोचा थरार

■ ठाणे

**महाराष्ट्र** खो-खो असोसिएशनच्या व दि मंच्यूअर खो-खो असोसिएशन (ठाणे) यांच्या मान्यतेने आणि धी.युनायटेड स्पोर्ट्स क्लब(ठाणे) यांच्या आयोजनाखाली श्री दत्तजयंती उत्सवनिमित्त कै. जे. पी. कोळी यांच्या स्मरणार्थ निमंत्रित विभागीय पुरुष व महिला खो-खो स्पर्धेचे आयोजन २ ते ४ डिसेंबरदरम्यान ठाण्यात करण्यात आले आहे. युनायटेड स्पोर्ट्स क्लबचे माजी खेळाडू कै.जनार्दन पांडुरंग कोळी हे ठाण्यातील पहिले राष्ट्रीय खो-खो पटू होते. विजयवाडा येथील राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना चमकदार कामगिरी बजावली होती.

## खेलो इंडिया विद्यापीठ कुस्तीत इंदापुरातील मजुराच्या मुलाला रौप्य



■ जयपूर

**खेलो** इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील कुस्ती प्रकारात महाराष्ट्राने निराशाजनक कामगिरीचे प्रदर्शन घडवले. पुरुष गटात मजुराचा मुलगा असणाऱ्या अजय निंबाळकरने ग्रीको रोमन ५५ किलो गटात रौप्य, सृष्टी भोसले आणि समृध्दी घोरपडे यांनी कांस्यपदकाची कमाई केली. पुरुषांच्या गटात पदक विजेता ठरलेला अजय हा महाराष्ट्राचा एकमेव कुस्तीगीर ठरला.

भरतपूर येथे संपलेल्या कुस्ती स्पर्धेत ग्रीको रोमन ५५ किलो गटात अजय निंबाळकरने अंतिम फेरीत मजल मारून चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले. आक्रमक खेळ करत सलामीच्या फेरीत जळगावच्या धनराज सोनवणेवर ८-०ने मात केली. दुसऱ्या फेरीत चौधरी देवी लाल विद्यापीठाच्या अभिषेकला ८-०ने पराभूत केले. उपांत्य फेरीत अजमेर विद्यापीठाच्या दिपककुमारला १३-५ने हरवून अंतिम फेरीत मजल मारली होती. सुवर्णपदकाच्या लढतीत गुणांवर कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या मनीषकुमारने ८-५ गुणांवर अजय निंबाळकरला पराभूत केले. इंदापूरमधील श्री छत्रपती महाविद्यालयात शिकणाऱ्या अजयचे वडील साहेबराव निंबाळकर हे मजूर आहेत. त्याचे आई, वडील, भाऊ व आजी हे मारीआई देवींचे काम करत असतात.

पंटू पवार, किरण शितोळे यांनी खुराकाला मदत केल्याने व तालमीत मोफत सुविधांच्या जोरावर तो राष्ट्रीय कुस्तीपटू घडला. महिलांच्या कुस्ती लढतीत शिवाजी विद्यापीठाच्या मुली चमकल्या. फ्री स्टाईल कुस्तीच्या ५३ किलो वजनी गटात समृद्धी घोरपडेने ६५किलो वजनी गटात सृष्टी भोसलेने कांस्यपदकाची कमाई केली.

देश विदेश

# सा-पेंद्र-दिवाडी मार्गावर रो-रो फेरीबोट धावणार

■ पणजी

**सा-पेंद्र** ते दिवाडी या मांडवी नदीवरील जलमार्गावर लवकरच रो-रो फेरीबोट सेवा सुरू होणार आहे. सुमारे ५० प्रवासी आणि १९ वाहनांची क्षमता असलेली आधुनिक रो-रो फेरीबोट बांधण्यासाठी नदी परिवहन खात्याने निविदा जारी केली आहे. पुढील सहा महिन्यांत ही फेरीबोट प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे.

नदी परिवहन खात्याने बांधा आणि चालवा या तत्त्वावर ही फेरीबोट बांधण्यासाठी इच्छुक जहाज बांधणी




कंपन्यांकडून अर्ज मागवले आहेत. सा-पेंद्र ते दिवाडी या मार्गावर दोन रो-रो फेरीबोटी धावतील. फेरीबोट चालवणे, कर्मचारी नियुक्त करणे आणि देखभाल याचा सर्व खर्च कंपनीकडून केला जाणार आहे. फेरीचे शुल्क गोळा करण्यासाठी नदी परिवहन विभाग कंत्राटदार नियुक्त करेल. प्रत्येक महिन्याच्या शेवटी वरिष्ठ अधीक्षकांकडून सेवेचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच कंपनीला मासिक भाडे देण्यात येईल. सा-पेंद्र ते दिवाडी मार्गावरील ही फेरी सेवा ८ वर्षांसाठी कंत्राटी पद्धतीने चालवण्यास देण्यात येणार आहे. आवश्यक वाटल्यास कंत्राट आणखी दोन वर्षांनी वाढवण्याची तरतूद आहे. कंपनीने १८० दिवसांच्या आत फेरीबोट बांधून सेवेत दाखल करणे बंधनकारक असेल.

# कॅलिफोर्नियाच्या बँक्वेट हॉलमध्ये गोळीबारात ४ जणांचा मृत्यू

■ कॅलिफोर्निया

**उत्तर** कॅलिफोर्नियातील स्टॉकटन येथे बँक्वेट हॉलमध्ये एका मुलाच्या वाढदिवसाच्या पार्टीदरम्यान गोळीबार झाला. या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला आणि दहाजण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये लहान मुलांचा समावेश आहे.

काल उत्तर कॅलिफोर्नियातील स्टॉकटन येथील सॅन फ्रान्सिस्कोच्या पूर्वेला सुमारे ५० मैल अंतरावर असलेल्या लुसिल अव्हेन्यूवरील एका व्यावसायिक संकुलातील बँक्वेट हॉलमध्ये हा गोळीबार झाला. काही बंदुकधारी हॉलमध्ये घुसले. त्यावेळी हॉल भरलेला होता. गोळीबारानंतर गोंधळ उडाला. अफरातफरी झाली. लोक घाबरून लपू लागले. जोआक्विन काउंटी शेरीफ ऑफिसच्या म्हणण्यानुसार, सुमारे १४ जणांना ठार मारण्यात आले. हल्लेखोरांनी आत प्रवेश केला आणि गोळीबार केला तेव्हा अनेक कुटुंबे मुलांसह आत होती. शेरीफ ऑफिसच्या प्रवक्त्या हीथर ब्रेंट यांनी सांगितले की, बळींमध्ये लहान मुले आणि प्रौढही आहेत. अनेक जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# इस्त्रायल पंतप्रधान नेतान्याहूंचा राष्ट्रपतींकडे माफीचा अर्ज

■ तेल अवीव

**इस्त्रायलचे** पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी त्यांच्या विरोधातील भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये राष्ट्रपती इसाक हर्जोग यांच्याकडे अधिकृतरित्या माफीची मागणी केली. नेत्यान्याहू यांच्या बचाव पक्षाचे वकील अमित हाद्द यांनी तब्बल १११ पानांचा सविस्तर अर्ज राष्ट्रपती कार्यालयात सादर केल्याची माहिती राष्ट्रपती भवनाने दिली. इस्त्रायली कायद्यानुसार, न्यायालयाने दोषी ठरवलेल्या व्यक्तींना माफी देण्याचा पूर्ण अधिकार राष्ट्रपतींकडे आहे. जनहिताच्या कारणास्तव कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीही माफी दिली जाऊ शकते. गेल्या आठवड्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही इस्त्रायलचे राष्ट्रपती इसाक हर्जोग यांना पत्र लिहून नेतान्याहू यांना माफी देण्याची विनंती केली होती. त्यामुळे या घडामोडीला महत्त्व आले आहे.

# नागालँडमध्ये 'हॉर्नबिल'महोत्सव सुरू! सहा देशांचा सहभाग

■ कोहिमा

**नागालँडमध्ये** आजपासून हॉर्नबिल फेस्टिव्हलला उत्साहात सुरुवात झाली.पुढील दहा दिवस हा महोत्सव साजरा होणार आहे. हॉर्नबिल या पक्षाला मराठीत धनेश असे नाव आहे.त्याच्या जाडजुड आणि लांब शिंगासारख्या चोचीमुळे त्याला हॉर्नबिल असे म्हणतात.यावर्षी या महोत्सवात सहा देश सहभागी झाले आहेत. हॉर्नबिल फेस्टिव्हल हा नागालँड सरकार सन २००० पासून आयोजित करते.हा महोत्सव राज्याच्या पर्यटनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे.नागालँडमधील सर्व नागा टोळ्यांच्या पुर्वापार चालत आलेल्या अनोख्या संस्कृतीचे दर्शन हॉर्नबिल फेस्टिव्हलच्या निमित्त परदेशी पर्यटकांना घडविले जाते. राजधानी कोहिमापासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर कोहिमा- इम्फाळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २९ वरील किसामा येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

# लॉटरी किंग सांतियागो मार्टीनचा पुद्दुचेरीत स्वतंत्र पक्ष स्थापणार

■ पुद्दुचेरी

**लॉटरी** किंग सांतियागो मार्टीन यांचा मुलगा जोश चार्ल्स मार्टीन याने पुडुचेरी विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली आहे. सांतियागो मार्टीन यांच्या मार्टीन उद्योगसमुहात जोश चार्ल्स मार्टीन हे संचालक आहेत. लॉटरी, रिअल इस्टेट आणि अन्य उद्योग क्षेत्रांमध्ये मार्टीन ग्रुप आघाडीवर आहे. जोश चार्ल्स मार्टीन हे याआधी भाजपामध्ये होते. त्यांनी २०१६ आणि २०२१ मध्ये विधानसभा निवडणूक लढवली. मात्र दोन्ही वेळी त्यांचा पराभव झाला. गेल्या वर्षी भाजपाच्या स्थानिक नेत्यांशी मतभेद झाल्यानंतर जोश यांनी भाजपाला रामराम ठोकला. तेव्हापासून ते सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जनतेमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करत होते. आता त्यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून येत्या १४ डिसेंबर रोजी ते आपल्या पक्षाचे नाव आणि स्थापनेची अधिकृत घोषणा करणार आहेत.

# जर्मनीमध्ये उजव्या एएफडीच्या नव्या युवा शाखेविरोधात निदर्शने

■ बर्लिन

**जर्मनीच्या** फ्रांकफर्टजवळील गीसेन शहरात उजव्या एएफडी पक्षाच्या 'जनरेशन जर्मनी'या नवीन युवा शाखेविरोधात जवळपास २५ हजार आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करुन निदर्शने केली. गीसेनमध्ये एएफडीची युवा शाखा स्थापन करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आंदोलकांनी एएफडीच्या कार्यक्रमस्थळाबाहेर घोषणाबाजी करत शिट्ट्या आणि ढोल वाजवले.



परिस्थिती हाताळण्यासाठी ५ हजार पोलीस तैनात करण्यात आले होते. यावेळी दगडफेकही झाली.यात अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले.जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना वॉटर कॅनन आणि पेपर स्प्रेचा वापर करावा लागला. एएफडीच्या नवीन युवा शाखेला विरोध करण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे नाझी काळासारख्या विचारसरणीचा पुन्हा उदय होण्याची भीती आहे. आंदोलकांचे म्हणणे आहे की,ते हिटलरसारख्या विचारसरणीला देशात कोणत्याही स्वरुपात पुन्हा मजबूत होऊ देणार नाहीत. एएफडीला जुनी युवा शाखा विसर्जित करावी लागली होती. कारण तिची जुनी युवा संघटना जुंगे अल्टरनेटिव्ह जर्मन गुप्तचर संस्थेने अतिरेकी घोषित केली होती.आता नवी शाखा सुरु करण्याची घोषणा करण्यात आली.

# डिजिटल अरेस्ट प्रकरणांची सीबीआय चौकशी होणार

■ नवी दिल्ली

**गेले** काही दिवस देशभरातून डिजिटल अरेस्टची भीती दाखवून सर्वसामान्यांना लाखो रुपयांना लुटल्याच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. याची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे आदेश सीबीआयला दिले. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठासमोर आज यासंबंधीच्या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने सांगितले की, डिजिटल अरेस्ट प्रकरणाकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. म्हणून आम्ही आदेश देतो की सीबीआयने सर्वप्रथम डिजिटल अरेस्ट प्रकरणांची चौकशी करावी. अन्य घोटाळ्यांची चौकशी पुढील टप्प्यात करावी. डिजिटल अरेस्ट हा एक सायबर फसवणुकीचा प्रकार आहे.यामध्ये गुन्हेगार तपास यंत्रणेचे अधिकारी,न्यायाधीश ,पोलीस अधिकारी असे भासवून पीडितांना व्हिडिओ कॉल किंवा फोन कॉल करतात आणि त्यांचे नाव मनी लाँडरिंग किंवा ड्रग तस्करीमध्ये असल्याचे सांगत त्यांना डिजिटल अरेस्ट झाल्याचे सांगतात. डिजिटल अरेस्टमधून सुटण्यासाठी मग पीडितांकडे मोठ्या पैशाची मागणी केली जाते. सर्वसामान्य लोक याला बळी पडून स्वतःचे लाखो रुपयांचे नुकसान करून घेतात.

# संदेश पारकर यांनी ३० कोटी रुपयांची मागणी केली होती! नितेश राणेंचा आरोप

■ मालवण

**शहर** विकास आघाडीच्या वतीने आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आणि भयमुक्त कणकवली करू असा प्रचार करणारे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संदेश पारकर यांनी भाजपाकडून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी आणि ३० कोटी रुपयांची मागणी केली होती असा आरोप भाजपाचे नेते नितेश राणे यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना केला.

नितेश राणे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आरोप केला की संदेश पारकर यांनी नगराध्यक्ष पद आणि ३० कोटीची रुपये याची मागणी माझ्याकडे केली होती. याबाबतची बोलणी करायला ते मला भेटायला मुंबईत आले होते. मी त्यांना म्हणालो की तुम्ही विधानसभा निवडणूक हरला आहात.आता तुम्ही मुलाला पुढे आणा. भाजपा आणि राणे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते समीर नलावडे यांनाच उमेदवारी देण्याचे निश्चित झाले आहे. आम्ही निवडणूक विकासाच्या मुद्यावर लढवणार आहोत. तरीही नंतर पारकर सतत २५ कोटी द्या , ३० कोटी द्या , तुमच्याकडील एखादे काम द्या असे मागत राहिले . हे मागताना नितेश राणे भ्रष्टाचारी नव्हता . आता हा पारकर सभेत सांगतो की भ्रष्टाचार संपवायचा तर राणेचा उमेदवार नको . संदेश पारकरच्या या गोष्टीही जनतेला कळाव्यात म्हणून मी पत्रकार परिषद घेतली आहे,असे नितेश राणे म्हणाले. समीर नलावडे हे आम्ही स्वाभिमान पॅनल वर निवडणूक लढवली तेव्हाही आमच्याबरोबर होते. त्यावेळी त्यांनी हा विचार नाही केला की आपण निवडून येऊ की नाही. गेली आठ वर्षे ते भाजपा आणि राणेंचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत,असे नितेश राणे म्हणाले.

# मिरा रोडमधील शाळेला बॉम्बने उडवण्याची धमकी

■ मिरारोड

**मिरारोड** येथील एका खासगी शाळेला बॉम्बने उडवण्याची धमकी असलेला ईमेल आल्यानंतर एकच खळबळ उडाली. मात्र तपासणीनंतर हा ई-मेल अफवा असल्याचे स्पष्ट झाले. पोलीस ई मेल पाठविणाऱ्याचा शोध घेत आहेत. मुंबई आणि परिसरातील शहरांमधील शाळांना बॉम्बने उडवून देण्याच्या धमक्यांचे सत्र पुन्हा सुरू झाले आहे. सोमवारी सकाळी सहाच्या सुमारास मिरा रोड येथील सिंगापूर इंटरनॅशनल शाळेला बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा एक ई-मेल प्राप्त झाला. हा ई-मेल मिळताच त्वरीत काशिमीरा पोलीस ठाण्याला कळविण्यात आले. पोलिसांनी बॉम्ब शोध पथकासह शाळा आणि शाळेचा परिसर पिंजून काढला. मात्र तपासणीनंतर ही अफवा असल्याचे स्पष्ट झाले. सायबर पोलीस ठाण्यामार्फत ई-मेल नेमका कुठून आला त्याचा तपास सुरू आहे. यापूर्वीदेखील मिरा-भाईंदर शहरात दोन शाळांना असे धमकी देणारे ई-मेल आले होते.

# भारतातील प्रमुख विमानतळांवर विमानांच्या सिग्नलमध्ये छेडछाड

■ नवी दिल्ली

**राजधानी** दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळासह देशातील प्रमुख विमानतळांवरील जीपीएस डेटामध्ये छेडछाड करण्यात आल्याची धक्कादायक माहिती केंद्र सरकारने आज राज्यसभेत दिली. केंद्रीय नागरी विमान उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी राज्यसभेत दिलेल्या लेखी उत्तरात ही माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार दिल्लीसह कोलकाता, अमृतसर, मुंबई, हैदराबाद, बंगळुरु आणि चेन्नई या विमानतळांवरील जीपीएस स्पूफिंग डेटामध्ये छेडछाड करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही समस्या दूर करण्यासाठी सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहितीदेखील नायडू यांनी आपल्या लेखी उत्तरात दिली आहे.


## आदित्य बिर्ला रिअल इस्टेट लिमिटेड

सीआयएन: L17120MH1897PLC000163

सेंच्युरी भवन, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.

**भाग प्रमाणपत्र हरविल्याची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीने पारित केलेली खालील भाग प्रमाणपत्रे हरविली/गहाळ झाल्याचे किंवा चोरी झाल्याचे कळविण्यात आले आहे आणि त्याच्या नोंदणीकृत धारकांनी कंपनीकडे दुय्यम भाग प्रमाणपत्रे पारित करण्याकरिता अर्ज केला आहे.

| फोलियो क्र. | प्रमाणपत्र क्र. | डिस्टिंक्टिव्ह क्र. | समभाग | भागधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ०एसओ००४९५ | २९९५५८-२९९५६५ | ३६१५०८७१-३६१५११९० | ३२० | सोहराब जीजीभॉय दिवेचा |

जनतेस याद्वारे वरील भाग प्रमाणपत्रांसह खरेदी किंवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्याविरोधात खबरदार करण्यात येत आहे. कोणा व्यक्तीचा सदर भाग प्रमाणपत्रांच्या संदर्भात कोणताही दावा असल्यास, त्यानी तो दावा कंपनीकडे त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात वर दिलेल्या पत्त्यावर सदर सूचना प्रसिद्धीचा १५ दिवसांमध्ये नोंदवावा, ज्यानंतर अशा कोणत्याही दाव्याचा विचार करण्यात येणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याची प्रक्रिया सुरू करेल.

**अर्जदार आणि कायदेशीर वारस: आदी केकी मोताफ्राम**

दिनांक: ०२.१२.२०२५



## फॉर्म क्र. युआरसी-२

**प्रकरण २१ चे भाग १ अंतर्गत नोंदणीबाबत सूचना देण्याची जाहिरात (कंपनी कायदा २०१३ च्या कलम ३७४(बी) आणि कंपनी (नोंदणीस प्राधिकृत) अधिनियम, २०१४ चे नियम ४(१) नुसार)**

१. येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३६६ च्या उप-कलम (२) नुसार, कंपनी निबंधकाकडे अर्ज करण्यात आला आहे की **एचवायएनटी सोल्यूशन्स एलएलपी**, एक एलएलपी, कंपनी कायदा २०१३ च्या प्रकरण २१ च्या भाग १ अंतर्गत शेअर्सद्वारे मर्यादित कंपनी म्हणून नोंदणीकृत केली जाऊ शकते.

२. कंपनीचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहे: या व्यवसायात आर्किटेक्चर, इंटीरियर डिझाइन आणि बांधकाम उद्योगातील व्यावसायिकांसाठी एक ऑनलाइन प्लॅटफॉर्म (वेब आणि मोबाईल ॲप्लिकेशन) विकसित करणे आणि चालवणे समाविष्ट असेल जे पोर्टफोलिओ तयार करू शकतील, प्रकल्प प्रदर्शित करू शकतील, क्लायंटशी कनेक्ट होऊ शकतील आणि मार्केटिंग, ब्रँडिंग, प्रमोशन, इव्हेंट्स आणि कंटेंट निर्मितीसह डिजिटल सोल्यूशन्सद्वारे त्यांचा व्यवसाय वाढवू शकतील, याशिवाय दृश्यमानता वाढवणे आणि उद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी आवश्यक अशा सर्व पूरक व्यवसायिक उपक्रमांचाही समावेश करण्यात येईल, जे प्रमुख व्यवसायिक उद्दिष्टांच्या पूर्ततेस सहाय्य करतील.

३. प्रस्तावित कंपनीच्या मेमोरँडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या मसुदाची प्रत **ए-१२०१, ए विंग, न्यू लाईट कोहौसो लिमिटेड, एस. व्ही. रोड, टी. पी. एस.४, साउथ अव्हेन्यू, खार (पश्चिम), खार कॉलनी, मुंबई - ४०० ०५२** येथील कार्यालयात तपासता येईल.

४. येथे सूचना देण्यात येत आहे की, कोणाही व्यक्तीचा सदर अर्जास आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरुपात **सेंट्रल रजिस्ट्रेशन सेंटर (सीआरसी), इंडियन इन्स्टिट्युट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए), प्लॉट क्र.६,७,८, सेक्टर ५, आयएमटी मनेसार, जिल्हा गुरगाव (हरियाणा)-१२२०५०** येथील निबंधकांकडे सदर सूचना प्रकाशन तारखेपासून एकवीस दिवसांत पाठवावेत, तसेच एक प्रत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.

**आज दिनांकित ०२ डिसेंबर २०२५**
**एचवायएनटी सोल्यूशन्स एलएलपी करिता**
**सही/-**
**उमंग मुकेश गांधी**
**नियुक्त भागीदार**
**डीपीआयएन: ०८६१९७७९**
**दिनांक: ०२.१२.२०२५**
**ठिकाण: मुंबई, महाराष्ट्र**



## जाहीर सूचना

आनंद नगर, वसई (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पालघर - ४०१२०२ येथील जय हरी ओम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या २ ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. बी/२०१ (सदर सदनिका) च्या संदर्भात प्रमाणपत्र क्र. २१ डिस्टिंक्टिव्ह क्र. १०१ ते १०५ आमच्या संस्थेद्वारे सदर सदनिकेचे सदस्य म्हणून दिवंगत श्री. प्रसाद नंदकिशोर कोलते यांच्या नावे पारित केले होते आणि त्यांचे दि. २७.१०.२०२४ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांची आई श्रीमती सुरेखा नंदकिशोर कोलते आणि त्यांची पत्नी शेफाली चौधरी हे केवळ कायदेशीर वारस आहेत आणि त्यांनी संस्थेकडे वरील भाग प्रमाणपत्रामध्ये त्यांची नावे हस्तांतरित करण्याकरिता अर्ज केला आहे. म्हणून, संस्था याद्वारे सदर सूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये आमच्या पत्त्यावर म्हणजेच सचिव जय हरी ओम को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., आनंद नगर, वसई (प), पालघर-४०१२०२ येथे दावे किंवा आक्षेप लिखित स्वरुपात वरील पत्त्यावर मागवित आहेत. जर या कालावधीमध्ये कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, आम्ही, संस्था वरील संयुक्त नावे भाग प्रमाणपत्र हस्तांतरित करण्यास मुक्त असेल.

सही/-
सचिव
जय हरी ओम सी.एच.एस. लि.

ठिकाण: वसई दिनांक: ०२.१२.२०२५



## कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते की, **श्री. अनुराग अग्रवाल व श्री. अनुभव अग्रवाल, संचालक, मे. बी एल ए, डेव्हलपर्स एल एल पी, सि टी एस नं. २८ व २९ (भाग), मजासवाडी, व्हिलेज मजास, तालुका अंधेरी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई** – ४०००६०. सदर जागेवर कोणतीही आस्थापना नसल्यामुळे सदर भुखंड मोकळा असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, के-पूर्व प्रभाग यांनी कळविले आहे. या जागेचे क्षेत्रफळ २१४७.०० चौ. मी. असून तत्सम अंधेरी, नगरभूमापन कार्यालयातील मिळकतीचे मालक आहोत आणि ति चा विद्यमान वापर बदलुन सदर मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. तरी देखील **मे. बी एल ए, डेव्हलपर्स एल एल पी, सि टी एस नं. २८ व २९ (भाग), मजासवाडी, व्हिलेज मजास, तालुका अंधेरी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई** – ४०००६०. या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई उपनगर (पश्चिम) यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१. यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

**स्थळ-मुंबई**
**दिनांक-०२/१२/२०२५**

सहि-
मे. बी एल ए, डेव्हलपर्स एल एल पी
(संचालक)



## वेण्णा निरंजना सहकारी पतसंस्था मर्यादीत

(रजि. नं. B.O.M.W.C./R.S.R./C.R./370/87-88)

**मुख्य कार्यालय :-** १२/१, दत्तात्रय भवन, पहिला मजला, डॉ. मित्रसेन माहीमतुरा मार्ग, तिसरा कुंभारवाडा, मुंबई – ४००००४.
**प्रशासकिय कार्यालय :-** १७, हितनिकेतन को.ऑप.हौ.सो., कोकणनगर बस स्टॉपच्या मागे, जे.एम. रोड, भांडूप (प), मुंबई – ४०००७८. फोन नं.- ९५९४६७५५१९ /९८५०३४८०२६

वसुली अधिकारी यांचे तर्फे

**स्थावर मिळकतीची जाहीर लिलाव नोटीस**

मे.सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था (परसेवा) मुंबई जिल्हा मध्ययवर्ती सहाकरी बँक लि.मुंबई च्या दावा दावा क्रं.१०२१/१२/२०१९ दि.३०/०७/२०२० रोजीचे वसुली प्रमाणपत्र

**वेण्णा निरंजना सहकारी पतसंस्था मर्या.मुंबई** ... न्यायनिर्णित धनको
विरुध्द
**श्री विशाल राजाराम जवळ व इतर** ... न्यायनिर्णित ऋणको.

वसुली दाखला क्रं.१०२१/१२/२०१९ घरकर्ज एकुण दावा रक्कम २४,८२,४८९/-अधीक ०१/११/२०१९ पासुन १६% दराने पुढील व्याज आणि प्रदानापर्यंत अतिरिक्त भार लिलावाकरीता मिळकत येथे नमुद केले नुसार वसुली अधिकारी यांनी जे आहे जेथे आहे,आणि जे आहे जसे आहे. या तत्वावर लिलाव विक्रीकरीता ठेवलेल्या खालील नमुद जंगम / स्थावर मिळकती संदर्भात इच्छुक पक्षकारांकडुन मोहोरबंद लिफाफ्यामध्ये निविदा / देकार मागविण्यात येत आहेत.

मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| मिळकतीचे वर्णन | आरक्षित किंमत | इ.अ.र. | लिलावाची तारीख स्थळ व वेळ |
|---|---|---|---|
| मालक - **श्री विशाल राजाराम जवळ** मौजे. जवळवाडी, ता.जावली, जि.सातारा. येथील गट नं.३/१० मधील एकुण ला यो क्षे.०० हे १२ आर ०० चौ मी पैकी खाते क्रं.१३७२ मधील ला यो क्षे ०० हे ०८आर ०० चौ मी इतके श्री विशाल राजाराम जवळ यांचे हिस्याचे क्षेत्र त्यावरील ग्रामपंचायत मिळकत नं.४२३ मध्ये बांधकाम त्यांचे एकुण क्षेत्र २३५.२५चौ.मी.(२५३२ चौफुट) इतके क्षेत्र. | रुपये ५०,०५,०५८/- | रुपये ५,००,५०६/- | **दिनांक - ३१/१२/२०२५** स्थळ - वेण्णा निरंजना सहकारी पतसंस्था मर्या. प्रशासकिय कार्यालय - १७, हितनिकेतन को.ऑप.हौ.सो. कोकणनगर बस स्टॉपच्या मागे, जे.एम.रोड,भांडूप(प) मुंबई.४०० ०७८. येथे दुपारी २.०० वाजता. |

**निरिक्षण तारीख आणि वेळ :- दि. २४/१२/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत.**

**अटी व शर्ती :-**

१. लिलावाच्या अटी आणि शर्ती समाविष्ट बोली प्रपत्र आणि इतर काही माहिती हवी असल्यास रुपये ५००/- जमा करुन निरिक्षणानंतर कोणत्याही कामकाजाचे दिवशी वसुली अधिकारी यांचे कार्यालयातून प्राप्त करता येतील.

२. इच्छूक बोलीदारांनी मुंबई येथे देय वेण्णा निरंजना सहकारी पतसंस्था मर्या.च्या नावे पी.ओ./डी.डी. च्या मार्गाने वरील वेगळी नमुद केल्यानुसार व्याज मुक्त इसारा अनामत रक्कमेसह बंद लिफाफ्यात त्यांची बोली पाठविणे आवश्यक आहे. आरक्षित किंमतीपेक्षा कमी किंमतिच्या बोली नाकारण्यात येतील आणि ई.अ.र. जप्त करण्यात येईल. निविदा दिनांक २७-१२-२०२५ रोजी दुपारी २.०० पर्यंत किंवा पुर्वी वसुली अधिकाऱ्याकडे पोहचणे आवश्यक आहे. विहित तारीख आणि वेळेनंतर बोली नाकारण्यात येतील. निविदा वरील नमुद न्याय निर्णित धनको संस्थेच्या मुख्य कार्यालयात दिनांक २७-१२-२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता उघडण्यात येतील आणि तेथे त्याच दिवशी लिलाव घेण्यात येईल. निविदाधारकांना उपस्थित राहुन त्यांची निविदा वाढविण्याची संधी देण्यात येईल

३. यशस्वी बोलीदाराने लिलावानंतर त्वरीत इसारा रक्कम समाविष्ट अंतिम बोली रक्कमेच्या २५ % रक्कम जमा करणे आवश्यक आहे. आणि उर्वरीत अंतिम बोली रक्कम लिलावाच्या तारखेपासून ३० दिवसात भरणे आवश्यक आहे.

४. वरील खंड नं.३ मधील नमुद केले नुसार बोली रक्कमेच्या २५ % रक्कम जमा करण्यास यशस्वी बोलीदार कसुरवार ठरल्यास इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.तसेच उर्वरीत अंतिम बोली रक्कम लिलावाच्या तारखेपासून ३० दिवसात जमा करण्यास यशस्वी बोलीदार कसूरवार ठरल्यास इसारा रक्कम व त्या तारखेपर्यंत जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि पुन्हा लिलावाद्वारे त्यानंतरच्या तारखेला मिळकतीची पुर्नविक्री करण्यात येईल.

५. मिळकतीबाबत सर्व प्रभार, कर्ज लेवीज, कर, शासन कर, सोसायटीची थकबाकी आणि/ किंवा मिळकतीचे विरोधात इतर देणी /दायित्व बोलीदाराने भरावयाचे आहे.

६. कोणत्याही कारणाशिवाय, कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा हक्क आणि पुढे ढकलण्याचा /रद्द करण्याचा हक्क कोणत्याही पूर्व सुचनेशिवाय लिलाव प्रक्रियेच्या विक्रिची अटी व शर्ती सुधारित करण्याचा हक्क वसुली अधिकारी राखून ठेवत आहेत.

दिनांक : ०१/१२/२०२५

शिक्का

सही/-
श्री सदाशिव राजाराम शेडगे
वसुली अधिकारी

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये



## जाहीर सुचना

या नोटीसद्वारे सर्व संबधितांना सूचना देण्यात येते कि, पंतनगर श्रीसाईनाथ को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि., इमारत क्रमांक ७, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५ या सोसायटीमधील सदनिका क्रमांक ४०६ चौथा मजला हि कै. श्रीरंग भाऊ चव्हाण आधार क्रमांक ७५५५ ३१२८ ४५०९ यांचे दिनांक २५.९.२०२२ रोजी निधन झाले. सदरहू सदनिका त्यांच्या नावावर असून त्यांचा भाग दाखला अनु. क्रमांक 0२४, (पाच भाग प्रत्येकी रुपये ५०/-चे) एकूण रुपये २५०/- असून वितरीत भाग अनुक्रमे ११६ ते १२० असे आहेत. कै.श्री श्रीरंग भाऊ चव्हाण आणि श्रीमती पद्मावती श्रीरंग हे पती पत्नी असुन त्यांना मुलबाळ नाही आणि कै.श्री श्रीरंग भाऊ चव्हाण यांनी मृत्युपत्र अथवा इच्छापत्र न केल्यामुळे तसेच त्यांनी सदरहू सदनिकेसाठी नामनिदेर्शन अर्ज संस्थेच्या दप्तरी दाखल केलेला नाही. त्यामुळे श्रीमती पद्मावती श्रीरंग चव्हाण ह्या एकमेव वारस असल्यामुळे त्यांनी दिनांक १४.१२.२०२३ रोजी सदरहु सदनिका आणि संबधित भाग दाखला नावावर बदली करण्यासाठी संस्थेकडे/प्रशासकाकडे उपविधी प्रमाणे अर्ज केलेला आहे. तरी या व्यतिरिक्त सदरहू खो.क्रं. ४०६ पंतनगर श्री साईनाथ को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि., इमारत क्रमांक ०७, समता कॉलोनी, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५ च्या बाबतीत कोणाही व्यक्तीचा सदरहु खोली किंवा भागावर विक्री, अदलाबदल, गहान, बक्षीस, विश्वस्त, वारसाहक्क, अंत्यदान, कब्जा,भाडेपट्टा,धारणाधिकार,सुविधाधिकार किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कोणताही हीतसंबंधाचा दावा असेल तर निम्नस्वाक्षरीकरांना त्यांच्या ५१२ अे,सी,विंग कैलास एस्प्लनेड, एल.बी.एस.मार्ग, घाटकोपर (प) मुंबई ४०००८६ या कार्यालयात पुष्ठ्यर्थ कागदपत्रांच्या नोटरीकृत प्रतींसह ह्या जाहिरातीच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसात संध्याकाळी ५ ते रात्री ७ या वेळेत लेखी कळवणे गरजेचे आहे. अन्यथा अशा पद्धतीचा दावा किंवा हितसंबंधाच्या संदर्भाशिवाय भाग दाखल हस्तांतरण पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुंबई :
दिनांक :०२.१२.२०२५

सही/-
श्री चंद्रकांत बबनराव पोफळे
वकील उच्चन्यायालय, मुंबई
श्रीमती पद्मावती श्रीरंग चव्हाण खोली क्रमांक ४०६ पंतनगर श्री साईनाथ को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि., करिता



## फॉर्म जी

[ऑटोमोबाईल व्यवसाय - डीलरशिप] (युनिट क्रमांक ७१२, ७ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १, कफ परेड, कुलाबा, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४००००५) येथे कार्यरत

**बाफना मोटर्स रत्नागिरी प्रायव्हेट लिमिटेड करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| अक्र | संबंधित तपशील | टिप्पणी |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व त्यासह पॅन/सीआयएन/एलएलपी क्र. | **बाफना मोटर्स (रत्नागिरी) प्रायव्हेट लिमिटेड** **सीआयएन:** U34100MH1996PTC097465 **पॅन:** AABCB3555D |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | युनिट क्रमांक ७१२, ७ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १, कफ परेड, कुलाबा, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४००००५ |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | https://www.bafnamotorsratnacirp.com/ |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | कुलाबा मुंबई, रत्नागिरी महाराष्ट्र (आता कोणतीही मालमत्ता उपलब्ध नाही) |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | शुन्य |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | उपलब्ध नाही |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शुन्य |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, प्रक्रियेच्या पुढील घटनांकरिता संबंधित दिनांक समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असणारे यूआरएल | kangayan.s@gmail.com येथून प्राप्त करता येतील. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएल | kangayan.s@gmail.com येथून प्राप्त करता येतील. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक: | १५.१२.२०२५ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | २०.१२.२०२५ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | २५.१२.२०२५ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | ३०.१२.२०२५ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | २५.१२.२०२५ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | ३०.०१.२०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याकरिता प्रक्रिया ईमेल आयडी | kangayan.s@gmail.com |

ठराव व्यावसायिकाची स्वाक्षरी
एस कांगायन
IBBI/IPA-002/IP-N00866/2019-2020/12770
(बाफना मोटर्स रत्नागिरी प्रायव्हेट लिमिटेड) करिता
(०१ डिसेंबर आणि चेन्नई)

# अखेर अक्षता पडल्या!



अभिनेत्री सामंथा रूथ प्रभू आणि दिग्दर्शक राज निदिमोरू यांच्या नात्याविषयीच्या चर्चांना अचानक वेगळेच वळण मिळाले आहे. याबाबतच्या अफवांना पुष्टी मिळाली असून त्यांनी ईशा योग केंद्रातील लिंग भैरवी मंदिरात अतिशय खासगी आणि आध्यात्मिक वातावरणात विवाहबद्ध होत आयुष्याचा नवा अध्याय सुरू केला आहे. सोमवारी (१ डिसेंबर रोजी) अवघ्या ३० जणांच्या उपस्थितीत पहाटेच हा समारंभ पार पडल्याचे समोर आले आहे. या सोहळ्याला सामंथाने परंपरेनुसार लाल रंगाची साडी परिधान केली होती.

राज निदिमोरू यांच्या माजी पत्नी श्यामली डे यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका गूढ पोस्टने या चर्चांना आणखी वेग दिला आहे. डेस्परेट पीपल डू डेस्परेट थिंग्ज असा संदेश त्यांनी शेअर केला असून तो या लग्नाचा सूचक इशारा मानला जात आहे. राज आणि श्यामली यांचा २०२२ मध्ये घटस्फोट झाला होता, सामंथाचे अभिनेता नागा चैतन्यसोबत 'चायसॅम' म्हणून लोकप्रिय असलेले नाते २०२१ मध्ये तुटले. त्यानंतर तिच्या आयुष्याविषयी माध्यमांमध्ये बरीच चर्चा झाली. मात्र सामंथाने करिअर, आरोग्य आणि वैयक्तिक प्रगतीकडे लक्ष देत स्वत:ला नव्याने उभे केले. 'द फॅमिली मॅन'मधील दमदार भूमिकेने ओटीटी विश्वात तिची ओळख अधिकच मजबूत केली. राज आणि सामंथाचे नाते २०२४ पासूनच चर्चेत होते. अनेक कार्यक्रमांत ही जोडगोळी एकत्र दिसली होती. मध्यंतरी या दोघांनी केलेल्या अमेरिका ट्रिपची माहितीही बाहेर आली होती. मात्र त्यांनी कधीही जोडप्याप्रमाणे फोटो काढणे किंवा आपले नाते सार्वजनिक करणे टाळले होते. आता या विवाहासह दोघेही स्वत:च्या आयुष्यातील दुसऱ्या अध्यायाची सुरुवात करत आहेत.

तेलुगू भाषिक कुटुंबात तिरुपती येथे जन्मलेले राज आपल्या शैक्षणिक पार्श्वभूमीमुळे, अमेरिकेतल्या अनुभवांमुळे आणि 'राज अ‍ॅण्ड डीके' या क्रिएटिव्ह जोडीतील त्यांच्या योगदानामुळे भारतीय मनोरंजनविश्वातील सर्वात प्रभावी निर्मात्यांपैकी एक म्हणून ओळखले जातात. संगणकशास्त्रातील मास्टर्स पदवी मिळवून काही वर्षे टेक इंडस्ट्रीतही त्यांनी काम केले आहे. 'द फॅमिली मॅन' या मालिकेने मात्र त्यांना देश-विदेशात प्रचंड प्रसिद्धी मिळवून दिली. याच मालिकेच्या दुसऱ्या सिझनमध्ये सामंथा राजीच्या भूमिकेत दिसली आणि इथूनच राज आणि सामंथाची ओळख वाढत गेली. त्यांच्या वाढत्या जवळिकीबद्दल अनेक स्तरांवर चर्चा होत होती. आता अक्षता पडल्याने या चर्चा अफवा नसून खऱ्या होत्या हे स्पष्ट झाले आहे. याबाबतची अधिकृत घोषणा लवकरच होईल असे सांगितले जात आहे.

# 'रंगीला'चा रिमेक जरुर करावा- उर्मिला

गेल्या काही दिवसांत 'रंगीला' चित्रपटाच्या नव्या ४ के एचडी रीस्टोर्ड आवृत्तीने चित्रपटगृहांमध्ये पुन:प्रवेश केला असून प्रेक्षकांना पुन्हा एकदा नॉस्टॅल्जिक बनवले आहे. यानिमित्ताने नायिका उर्मिला मातोंडकरने या चित्रपटाच्या रिमेकबाबत आपले मत स्पष्टपणे मांडले आहे. या कल्ट क्लासिकवर बोलताना उर्मिला म्हणते की, चित्रपट कधीच कोणाच्या मालकीचा राहत नाही. एकदा सेल्युलाईडवर आल्यावर तो प्रेक्षकांचा होऊन जातो. त्यामुळे 'रंगीला'चा रिमेक करावा असे कोणाला वाटत असल्यास त्यांनी जरूर करावा. कारण कलात्मकता ही कोणा एकट्याची नसते. प्रेक्षकच त्या कलाकृतीचे खरे मूल्य ठरवतात.


याबाबत दिलेल्या मुलाखतीत उर्मिला म्हणाली की, चित्रपट ही एक मुक्त अभिव्यक्ती आहे. त्यामुळे कलाकाराने स्वत:च्या जुन्या भूमिकांशी अतिशय घट्ट जोडलेले राहणे योग्य नाही. स्क्रीनवर दिसणारी मुलगी आणि वास्तवातील मी यात खूप अंतर आहे. अशा वेळी जुन्या भूमिकांवर हक्क सांगणे बालिशपणाचे ठरेल, असे ती म्हणाली. त्यामुळे कोणाला या चित्रपटाचा रिमेक करायचा असेल तर मनापासून त्याचे स्वागत आहे. सरतेशेवटी त्याचे यश-अपयश प्रेक्षकच ठरवतील.

१९९५ मध्ये प्रदर्शित झालेला राम गोपाल वर्मा दिग्दर्शित 'रंगीला' अमीर खान, उर्मिला मातोंडकर आणि जॅकी श्रॉफ यांच्या अभिनयाने सजलेला होता. अभिनेत्री बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मिली नावाच्या तरुणीची कथा या चित्रपटात उलगडत जाते आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या दोन पुरुषांमुळे तिच्या आयुष्यात निर्माण होणारे नवे वळण ही कहाणी अधिकच रंगतदार बनवते. क्या करे, तनहा तनहा, हाय राम्मा ये क्या हुआ यांसारखी ए. आर. रहमान यांनी संगीतबद्ध केलेली या चित्रपटातील सदाबहार गाणी आजही लोकप्रिय आहेत. हा चित्रपट त्या वर्षीच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या सिनेमांपैकी एक ठरला होता.



# विवाहांची संकल्पना कालबाह्य!

अभिनेत्री आणि खासदार जया बच्चन या बिनधास्त, सडेतोड, परखड आणि स्पष्ट वक्तव्ये करण्याबाबत सुप्रसिद्ध आहेत. अनेकदा त्यांनी केलेल्या वक्तव्यांवरुन वादंगही निर्माण होतात; पण तरीही त्या आपले मत नोंदवण्यास मागेपुढे पहात नाहीत. लग्न आणि नातेसंबंधांविषयी त्यांची भूमिका वर्षानुवर्षांपासून सुस्पष्ट आणि बिनधास्त राहिली आहे. अलीकडेच त्यांनी विवाहांविषयी बोलताना लग्न या संकल्पनेला 'आउटडेटेड' म्हणत नव्या चर्चेला तोंड फोडले आहे.



७७ वर्षांच्या जया म्हणतात की, आजच्या पिढीने स्वत:ची जीवनशैली स्वतंत्रपणे एन्जॉय करणे अधिक महत्त्वाचे आहे. नव्या पिढीचे भावनिक आणि मानसिक जग वेगळ्या प्रकारे आकार घेत आहे. त्यामुळे पारंपरिक बंधनांना तितकीशी किंमत उरलेली नाही. या संदर्भात त्यांनी आपली नात नव्या नवेली नंदाचे उदाहरण देत सांगितले की, तिने लग्न करायलाच हवे अशी आपली बिलकूल इच्छा नाही. नव्या काही दिवसांत अठ्ठावीस वर्षांची होणार आहे. जया यांच्या मते आजची तरुणाईला करिअर, स्वातंत्र्य आणि व्यक्तिमत्त्वाच्या वाढीत लग्न अडथळा ठरू नये असे वाटते आणि माझ्या मते त्यामध्ये गैर काहीही नाही. ही चर्चा पुढे जात असताना संवादकर्त्यांनी त्यांना लग्नाबद्दल अमिताभ बच्चन यांचे मत काय असेल. अशी विचारणा केली असता त्यांनी हलक्याफुलक्या पण प्रामाणिक शैलीत सांगितले की, कदाचित ते 'शादी मेरी जिंदगी की सबसे बड़ी गलती थी,' असे म्हणू शकतात. पण मला ते मान्य नाही. अर्थात, जया बच्चन यांनी स्पष्टपणाने सांगितले की, आज लग्नाविषयी माझे विचार बदलले असले तरी पहिल्या भेटीतच अमिताभ बच्चन यांच्याबद्दल आकर्षण निर्माण झाले होते आणि हळूहळू त्या नात्यानेच त्यांचे आयुष्य बहरले. मी ५२ वर्षांपासून वैवाहिक आयुष्य जगते आहे; पण याचा अर्थ आमचे अनुभव आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरतीलच असे नाही, असे त्या म्हणतात.

ऋषिकेश मुखर्जी यांच्या 'गुड्डी'च्या सेटवर झालेली पहिली भेट, 'एक नजर'च्या शूटिंगदरम्यान वाढलेली जवळीक आणि नंतर झालेला विवाह या सर्व आठवणी सांगताना त्यांनी हे मान्य केले की आजचा काळ, नाती आणि अपेक्षा पूर्णपणे बदलल्या आहेत.

जया बच्चन यांनी पुढे लग्नाची तुलना लाडवांशी करत सांगितले की लग्न केले तरी अडचणी येतात आणि न केल्यास पश्चातापही होऊ शकतो. आजच्या पिढीला कुटुंबियांकडून अधिक स्वातंत्र्य मिळते, त्यामुळे भावनिक आणि मानसिक जुळवणी अत्यावश्यक ठरते. शारीरिक आकर्षण आणि कम्पॅटिबिलिटी ही नाती टिकवणारी मुलभूत तत्त्वे आहेत, असे या पिढीला वाटते. आमच्या काळात या गोष्टी खुलेपणाने मान्य करण्याची पद्धत नव्हती. पण आजची तरुणाई हे सर्व खुलेपणाने समजून घेत आहे आणि गरज असल्यास प्रयोगही करते. माझ्या मते, नात्यातील प्रेम अधिक महत्त्वाचे असते; बाकी सर्व गोष्टी त्या प्रेमाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतात, असे त्या म्हणतात.

# मुलांसाठी मी का फोन करू?

राजकारणाप्रमाणेच हिंदी चित्रपटसृष्टीमध्येही अलीकडील काळात नेपोटिझम म्हणजेच घराणेशाहीविषयी सातत्याने मतमतांतरे व्यक्त होत आहेत. यामध्ये नेपोटिझमला विरोध करणाऱ्यांची संख्या भलेही जास्त असली तरी स्टारकिडस्चे सिनेसृष्टीतील आगमन थांबलेले नाहीये. अलीकडेच अभिनेता अर्शद वारसीने दिलेल्या एका मुलाखतीमुळे हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. बॉलिवूडमध्ये अडीच दशकांपासून काम करत असलेल्या अर्शदने अनेक दिग्दर्शकांसोबत व मोठ्या कलाकारांसोबत काम केले आहे, पण तरीही आपल्या मुलांना काम मिळवून देण्याच्या बाबतीत कुणाकडेही विनंती करण्यास मी तयार नाही, असे मत त्याने या मुलाखतीत मांडले आहे. आजच्या काळात बॉलिवूडवर नेपो किडस्चा प्रभाव वाढत चालल्याची टीका होत असताना त्याचे हे वक्तव्य विशेष चर्चेत आले आहे.



अर्शद सांगतो की, माझा मुलगा आणि मुलगी दोघांनाही अभिनयाची आवड आहे. मुलगा सध्या सिद्धार्थ आनंद यांच्या 'किंग'मध्ये असिस्ट करत असून त्यापूर्वी राजकुमार हिरानी यांच्याही टीममध्ये काम केले आहे. पण माझ्या मते, अभिनयाच्या क्षेत्रात आज यशाची शक्यता कमी आणि स्पर्धा अत्यंत तीव्र अशी स्थिती निर्माण झाली आहे. मुळात, सिनेइंडस्ट्रीमध्ये कोणीही कोणाची मदत करू शकत नाही; प्रत्येकाने स्वत:चा मार्ग स्वत:च तयार करावा लागतो. त्यामुळे कुठल्याही दिग्दर्शकाला फोन करून माझ्या मुलांवर शेकडो कोटी रुपये खर्च करायला सांगणे मला योग्य वाटत नाही. मुळात, कोणी माझ्या मुलावर इतका मोठा डाव का लावेल? असा सवालही तो करतो. अर्शद म्हणतो, दिग्दर्शकाला 'मुलांना एकदा भेटा' अशी साधी विनंती करणे म्हणजे त्यांना चित्रपटात घेण्यासाठी दबाव तयार करण्यासारखे होईल आणि हे तत्त्वत: मला मान्य नाही. माझ्या मते, कलाकाराचे कामच त्याचा एकमेव आधार असायला हवा. या सगळ्यात एक मनोरंजक बाब म्हणजे ज्या 'किंग' चित्रपटात अर्शद यांचा मुलगा साहाय्यक दिग्दर्शक असून चित्रपटात अर्शद स्वत:ही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. शाहरुख खान अभिनित या चित्रपटाचे चित्रीकरण बऱ्याच अंशी झालेले आहे. मध्यंतरी, पोलंडमधील लोकेशन्सवरून अर्शद यांनी पोस्ट केलेल्या फोटोंमुळे चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.

याआधी 'जॉली एलएलबी ३' मध्ये अर्शद अक्षय कुमारसोबत झळकला होता. या चित्रपटाने चांगला व्यवसाय केला होता. अभिनयातली मेहनत, भूमिकांमधील वैविध्य आणि स्वत:च्या मुलांबाबतही तितकाच कठोर व्यावहारिक दृष्टिकोन या सर्वांमुळे अर्शदने सिनेवर्तुळात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

# संघ ही दहशतवादी संघटना सुजात आंबेडकर यांचा आरोप

■ नागपूर

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघ देशाची राज्यघटना मानत नाही, स्वातंत्र्यदिनी संघाच्या मुख्यालयावर तिरंगा फडकवला जात नाही. ही संघटना कायद्यानुसार नोंदणीकृत नाही. त्यामुळे ही संघटना राष्ट्रविरोधी दहशतवादी संघटना आहे असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी केला. नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांच्या प्रचारासाठी आज ते नागपूरमध्ये आले होते. त्यावेळी नागपूर पत्रकार संघात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

याप्रसंगी त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील आंदोलनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. मराठवाडा विद्यापीठ परिसरात संघाच्या लोकांनी विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी स्टॉल लावला होता. वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी त्यावर आक्षेप घेतला. नोंदणीकृत नसलेली संघटना विद्यार्थ्यांची नोंदणी करू शकत नाही,अशी भूमिका त्यांनी घेतली. त्याची संघाने पोलिसांत तक्रार केली. तेवढ्या तक्रारीवरून पोलिसांनी आमच्या कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. त्यामुळे आम्ही आंदोलन केले.

# प्रदूषण करणाऱ्या प्रकल्पांवर यापुढेही कारवाई सुरूच ठेवा

**पालिका आयुक्तांचे सक्त निर्देश**

■ मुंबई

**मुंबईतील** वायू गुणवत्ता निर्देशांकात (एक्यूआय) मध्ये मागील ४८ तासांत लक्षणीय सुधारणा आढळली आहे. मात्र, पालिकेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्या खासगी, शासकीय, अशासकीय प्रकल्पांवर यापुढेही कारवाई सुरूच ठेवा, असे सक्त निर्देश महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. तसेच, ग्रेडेड रिस्पॉन्स अ‍ॅक्शन प्लॅन स्टेज-४ (ग्रॅप-४) मुंबईसाठी सध्या लागू नाही, असेही गगराणी यांनी स्पष्ट केले.

मुंबई शहर व उपनगरात वायू प्रदूषण नियंत्रणासाठी पालिकेकडून विविध प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत. यासाठी विविध बांधकामांना कामे थांबवा' नोटीस बजावण्यात आल्या आहेत. यामध्ये बेकरी तसेच स्मशानभूमींचे स्वच्छ इंधनावर परिवर्तन, धूळ आटोक्यात आणण्यासाठी मिस्टिंग मशीनच्या सहाय्याने फवारणी, पाण्याने रस्ते धुऊन काढणे आणि विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन, नागरिकांमध्ये जनजागृती यासह विविध उपाययोजनांचा समावेश आहे. सर्व प्रशासकीय वॉर्डात एकूण ९४ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# जामखेडमध्ये मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यासमोर घोषणाबाजी

■ अहिल्यानगर

**जामखेड** शहरातील रखडलेल्या विकासकामांबाबत नाराजी व्यक्त करण्यासाठी आज उबाठाच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ताफ्यासमोर घोषणाबाजी केली. शहरातील विविध विकास प्रकल्पांची मागणी आणि समस्यांचे फलक दाखवत कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.


मुख्यमंत्री फडणवीस जामखेडमध्ये आयोजित प्रचारसभेसाठी जात असताना अचानक घोषणाबाजी केल्याने काही वेळ वातावरण ताणतणावपूर्ण झाले. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली आणि उबाठाच्या ६ कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. कार्यकर्त्यांनी सांगितले की, जामखेड आणि कर्जत येथे आमदार रोहित पवार यांनी परवानगी मिळवून आणलेली एमआयडीची योजना महायुती सरकारने रोखली आहे. त्यामुळे आम्ही त्यांना जाब विचारला.

# मुंबईतील दुबार मतदार शोधताना पालिका कर्मचाऱ्यांना नाकीनऊ

■ मुंबई

**प्रारूप** मतदार यादीतील चुका, बदलेले मतदान केंद्र आणि दुबार नावे पडताळणीसाठी निवडणूक कर्तव्यावर असलेले महापालिकेचे कर्मचारी सोमवारपासून मतदारांच्या घरोघरी जात आहेत. मात्र, वॉर्डातील विस्तीर्ण झोपड्या आणि चिंचोळ्या मार्गातील सोसायट्यांमध्ये जाऊन मतदारांची पडताळणी करताना पहिल्याच दिवशी कर्मचाऱ्यांना नाकीनऊ आल्या आहेत.

अनेक गोष्टींचा सामना कर्मचाऱ्यांना करावा लागत आहे. मुंबईतील वसाहती, गृहनिर्माण संकुले, इमारतीतील मतदारांना १ डिसेंबरपासून पालिका कर्मचारी भेटी देऊन त्यांच्याशी संवाद साधत आहेत. मात्र शहरातील अनेक वॉर्डात विस्तीर्ण अशा झोपडपट्ट्या आहेत. या झोपड्यांमध्ये लहान मोठ्या गल्ल्यांमधून मतदाराने दिलेल्या घराचा पत्ता शोधताना अनेक अडचणी पालिका कर्मचाऱ्यांना येत आहेत. काही ठिकाणी भर दुपारी वस्तीत माणसांची वर्दळ कमी असते. तर मुस्लीम मोहल्ल्यात जाऊन मतदार शोधणे पुरुष कर्मचाऱ्यांना खूपच आव्हान असल्याचे वांद्रे बेहरामपाडा



येथे कार्यरत असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले. तशीच काही परिस्थिती गोवंडी, मानखुर्द, कुर्ला, भायखळा येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आहे. उपनगरात मोठ्या प्रमाणात झोपड्याप्रमाणे एसआरए पुनर्वसन इमारती आहेत. या इमारतीमध्ये अनेक ठिकाणी दिवसा घरातील माणसे कामावर असतात अशावेळी सात-आठ जिने चढउतार करून कोणीच सापडत नाही.

# धारावीसाठी राज ठाकरे मैदानात उतरणार?

■ मुंबई

**७ डिसेंबरला** धारावी बचाव समितीकडून कामराज स्कूल मैदानात सर्वपक्षीय सभा आयोजित केली आहे. या सभेसाठी आदित्य ठाकरे उपस्थित असणार आहेत. धारावी बचाव समितीकडून सभेसाठी सर्व पक्षांच्या नेत्यांना आवाहन करण्यात आले आहे. यात मनसे प्रमुख राज ठाकरे यांचाही समावेश असून, धारावीसाठी ते मैदानात उतरणार का, अशी चर्चा सध्या रंगली आहे. धारावीसंदर्भात काल समितीची बैठक पार पडली. त्यानंतर समितीच्या सदस्यांनी मातोश्रीवर जाऊन आ. आदित्य ठाकरे यांच्यासोबत चर्चा केली. आता समितीकडून मनसेप्रमुख राज ठाकरे यांनाही निमंत्रण देण्याच्या हालचाली सुरू आहेत.

# कोलकातामध्ये आयोगाबाहेर बूथ अधिकाऱ्यांची निदर्शने

■ कोलकाता

पश्चिम बंगालमध्ये एसआयआर (विशेष सखोल फेरतपासणी) प्रक्रियेत कार्यरत बूथ लेवल अधिकाऱ्यांनी (बीएलओ) कामाचे दडपण असल्याचा आरोप करत आज निवडणूक आयोगाच्या कार्यालयाबाहेर निदर्शन केले. या आंदोलनामुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना मोठ्या प्रमाणावर तैनात करण्यात आले होते.

बीएलओंनी म्हटले की, एसआयआर प्रक्रियेमुळे त्यांना अतिताण आणि प्रचंड कामाचे दडपण सहन करावे लागत आहे. मागील काही दिवसांपासून बीएलओ सतत विरोध करीत आहेत. गेल्या आठवड्यात काही बीएलओंनी जबरदस्तीने राज्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यालयात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता. यामुळे निवडणूक आयोगाने कोलकाता पोलीस आयुक्तांना पत्र पाठवून निवडणूक अधिकारी आणि आयुक्तांच्या सुरक्षिततेची दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत.

# प्रभागरचनेला आव्हान देणारी याचिका फेटाळली

■ मुंबई

**प्रभागरचनेच्या** प्रक्रियेत मतदारसंघांच्या अंतिम आराखड्यांना मंजुरी देण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने विभागीय आयुक्तांना दिले आहेत.

या निर्णयाला आव्हान देणारी निखिल के. कोळेकर यांनी दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळली. या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील सुधांशू चौधरी यांनी युक्तिवाद केला. ते म्हणाले की, प्रभागांच्या फेररचनेला आणि मतदारसंघांच्या अंतिम आराखड्यांना मंजुरी देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहेत.

# कधी काँग्रेस तर कधी शिंदेंसाठी गौतमीचा प्रचार

■ चंद्रपूर

**नृत्यांगना** गौतमी पाटील कधी काँग्रेससाठी तर कधी शिंदे गटाच्या उमेदवारासाठी प्रचार करताना दिसत आहे. आज काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी चंद्रपुरातील मूल शहरात गौतमी पाटील यांच्या उपस्थितीत भव्य रोड शो आयोजित करण्यात आला. या रोड शोला नागरिक आणि काँग्रेस कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी ती म्हणाली की, या निवडणुकीत



एकताताई उभ्या आहेत. सर्वांनी त्यांना सपोर्ट द्या आणि भरभरून मते द्या.

कालदेखील गौतमी पाटील हिने आर्वीमध्ये शिंदे गटाच्या उमेदवार दिपाली देशमुख यांच्यासाठी प्रचार केला. यावेळी त्यांनी दिपाली देशमुख यांना भरूभरून मते देण्याचे आवाहन केले. गौतमी पाटील या दोन्ही राजकीय गटांच्या प्रचारसभांमध्ये दिसत असल्याने चर्चांना उधाण आले आहे.


# बुलडाण्यात मतदानाच्या आदल्यादिवशी ईव्हीएम मशीन उघडल्याने गोंधळाची स्थिती

■ बुलडाणा

**बुलडाण्यात** निवडणूक मतदानाच्या आदल्या दिवशी निवडणूक कर्मचाऱ्यांनी ईव्हीएम मशीन उघडले. यामुळे खामगाव शहरात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. नगरपरिषद शाळेत झालेल्या या प्रकारावर उमेदवार आणि कार्यकर्त्यांनी आक्षेप घेत नाराजी व्यक्त केली. कर्मचारी बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिटची (सीयू-बीयू) तपासणी करत होते. मात्र ही प्रक्रिया मतदानापूर्वी होत असल्याने उमेदवारांना संशय वाटला आणि त्यांनी विरोध केला. त्यामुळे काही वेळ वातावरण तणावपूर्ण बनले.

नंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले की, मतदान केंद्र क्रमांक १ वर मतदान चमूने केवळ जोडणी तपासण्यासाठी ईव्हीएम केस उघडली होती. सीयू-बीयू जोडणी योग्य आहे का हे पाहण्यासाठी ही प्रक्रिया आवश्यक होती. मात्र उमेदवारांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला. त्यामुळे आम्ही उमेदवारांना प्रत्यक्ष ईव्हीएम मशीनची तपासणी करून दाखवली आणि पुन्हा एकदा जोडणी करून टोटल शून्य असल्याचे दाखवल्यानंतर सर्वजण शांत झाले.

# नवाकाळ शब्दकोडे-१४४८



**आडवे शब्द –**

२. शुभ दिन ५. सर्व, तमाम ७. दुसऱ्यांसाठी झिजणारा, कामी येणारा १०. उत्तुंग इमारत ११. अनावश्यक वस्तूंचा पसारा १४. भुगा, पावडर १५. शेवट १६. हिवाळ्याच्या सुरुवातीला पेरणी होऊन वाढणारी पिके (गहू, हरभरा, ज्वारी, मोहरी, जवस) १७. गुरांचे सावकाश जेवणे १८. दोषारोप २०. वितरण २२. सूक्ष्म तुकडा २३. त्रास, पीडा २५. उमर २६. स्त्रियांचा वस्त्रविशेष २७. शल्य, सल २८. तराजूचा प्रकार २९. प्रत्येक दिवशी ३०. वेळ वाया घालवणे ३३. हस्त ३६. कंटाळा, उबग ३८. मेघ, ढग ३९. उपकारांची जाणीव असलेला ४१. सरस्वतीचे तंतुवाद्य ४२. सवतींची आपापसातील असूया ४६. पादत्राणांचा उंची प्रकार ४८. भीष्माचे वडील ४९. काठ ५०. गर्दन, आदराची वागणूक ५२. नौबत ५४. पेठ, आळी ५६. आक्षेप, विरोध ५९. दहा ६१. खुंटी, वर्म ६२. विष्णूचा एक अवतार, कूर्म ६४. लोकांना भक्तिमार्गाची शिकवण देणारे सत्पुरुष ६६. वाटप करणारा ६८. भांडण, झगडा ७०. उदार स्वभावाचा ७१. सूक्ष्म तपशील ७३. खडे सैन्य ७५. हिरावून घेणे ७६. गलबताचे कापड ७७. तापाची पूर्वसूचना, अंग मोडून येणे ७८. उफराटे, अपेक्षेपेक्षा उलट ८०. बालपण ८२. दमयंतीचा पती ८३. निर्भय ८४. अवतरण, परिच्छेद ८५. खरे ८६. सुरी ८८. प्रश्न ९०. तीव्र मतभेद, वादावादी ९१. विकत घेण्याची कुवत ९४. अलीकडचा, ताजा ९५. त्वचेवर लावण्याचे औषध ९७. वृक्ष, बाग, अरण्य १००. तृतीया १०४. निर्धन १०६. फळातील खाद्यभाग १०८. रंक १११. श्रीकृष्णाची भक्त कवयित्री ११२. मधुर ११३. इच्छा ११५. धुणे, धुलाई ११६. एसटी बसचे एक मजेदार संबोधन ११७. किल्ल्याभोवतीची संरक्षक भिंत

**उभे शब्द –**

१. शाळेतले २. उत्तम स्वयंपाक करणारी ३. व्यापारातला फायदा ४. सर्व जबाबदाऱ्यांतून मुक्त ५. कासवाची शर्यत हरलेला ६. मार्शल आर्टसचा प्रकार ७. झाडाचे पान ८. रजक ९. अस्वल, घाणेरडे १०. उडवाउडवी, टाळाटाळ १२. गुंतवणुकीवर मिळालेला फायदा १३. रस्ता, मार्ग १४, मग्न, तल्लीन १९. उपरा, बाहेरचा २०. उत्तर आणि पश्चिम यामधली उपदिशा २१. अर्धी ओंजळ २२. आटा २३. विष्णुच्या गळ्यातील माला २४. योग्य, रास्त २५. मुंडण ३१. कौशल्य ३२. काळीज, लिव्हर ३४. जीभ, जिव्हा ३५. वासरू ३७. सोन्याची शुद्धता ४०. काया, देह ४३. डुक्कर ४४. पाचू, पन्ना ४५. विष्णूची पत्नी ४७. तलवारीपासून रक्षण करणारी ४८. संदेह ४९. दुर्ग ५१. मोठी नदी ५२. चावा, दंश ५३. अधाशी ५४. लिंबू वर्गातले एक आंबटगोड फळ ५५. मारला गेलेला ५७. सुट्टीचा सार्वत्रिक वार ५८. बाणांची पिशवी, भाता ६०. वर्ष, साल ६१. कष्ट, सायास ६२. दिवंगत, मेलेला ६३. नेहमी ६५. परका, अनुचित ६७. कारस्थान ६९. चंचल स्वभावाचा ७१. टिपणवही, हस्तलिखित ७२. पहाटेची आरती ७४. काव्य, मुलींचे एक नाव ७६. चारित्र्यसंपन्न ७९. शौर्य ८०. गारवा, थंडी ८१. वेखंड ८२. रक्तवाहिनी, शीर ८४. मूळ, उत्पत्तीस्थान ८५. अनिवार्यता, गरज ८७. बगल, कुक्षी ८९. त्वरित ९०. रेती ९२. रात्र, मुलींचे एक नाव ९३. वारेमाप, विपुल ९६. प्रेमात पडलेला, लुब्ध ९८. तमाशा ९९. सभ्य, सज्जन १०२. भूमी १०३. खोटेपणा १०४. गायब १०५. पीडा, संकट १०७. घाई, वेग १०९. वेदना ११०. तोरा ११२. वाटोळे, वर्तुळ ११४. वाईट सवय •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४४७ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. विमान ४. शेलका ६. माद्री ७. जागरूक ९. अंधविश्वास १०. क्षती ११. जय्यत १२. बैदूल १३. गाव १४. सलामत १६. काळ १७. बदल १९. बखोट २२. मघा २३. रुजवात २५. हरीण २६. पलटण २८. तडित ३०. ढोल ३१. कालवणे ३३. गड ३४. कीव ३५. मणका ३७. वाजी ३८. वन ३९. मणी ४०. जलसा ४२. चळत ४३. रजई ४५. गोची ४६. आद्य ४७. खचणे ४९. लडिवाळ ४१. चळत ५२. पीडा ५४. कौरव ५५. उब ५६. कमावता ५८. आस ५९. डगर ६२. करवा ६३. पावन ६४. पल्याड ६६. बलदंड ६८. टपरी ७०. बट्टा ७२. काडवात ७४. कवडी ७५. नद ७६. तयार ७७. वदन ७८. थाटमाट ८०. चावट ८१. घर्षण ८२. विरस ८३. पालवी ८४. चरा ८५. बीमोड ८७. अरण्य ८८. नाल ८९. तरुणी ९२. अतिशयोक्ती ९३. लोट ९५. दैव ९६. पुनीत ९८. दंभ ९९. रुद्रावतार १०१. दाणादाण १०२. वेडसर १०३. मीमांसा

**उभे शब्द** : १. माधव २. विश्वासघातकी ३. मासला ४. शेती ५. काजळ ६. मातबरी ७. जादू ८. गलबलणे ९. अंगार १०. क्षतज १२. बैल १५. मरुत १६. कात १८. दणका २०. खोट २१. टणटणी २४. वारण २५. हलवाई २६. पवन २७. बंडल २९. डिवचणे ३२. लवचीकता ३३. गजरा ३५. मतलब ३६. कारवाई ३९. मद्यपी ४१. साखर ४४. जळ ४८. चवड ५०. अमावास्या ५३. डाळ ५४. कौसल्या ५५. उर ५६. कर ५७. शेवरी ५८. आपमतलबी ६०. गल्ली ६१. अलका ६२. कडवा ६३. पापडी ६५. डबर ६७. दंडकारण्य ६८. टवटवीत ६९. कोंदट ७१. आंदण ७३. तथा ७४. कमाल ७५. नवरा ७७. वर्षप्रतिपदा ७९. टपाल ८०. चाचणी ८२. विरक्ती ८६. मोहिनी ८७. अयोध्या ८८. नाट ९०. रुक्षता ९१. देवमासा ९३. लोभस ९४. इंद्राणी ९६. पुट्ठा ९७. तदा ९८. दंड १००. रमी

## थरूर काँग्रेस बैठकीत पुन्हा गैरहजर आईसोबत असल्याचे स्पष्टीकरण

पान १ वरून

धोरणांविरुद्ध जाऊन मोदी किंवा भाजपा चांगले काम करत आहेत, असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही पक्षात का आहात? फक्त खासदारकीसाठी का? दोन्ही बाजूंनी खेळणे म्हणजे ढोंग आहे.

दरम्यान, केरळमध्ये थरूर यांनी त्यांच्या आईचा ९० वा वाढदिवस साजरा करत असल्याची माहिती समाजमाध्यमावर शेअर केली. त्यांनी वडिलोपार्जित २४० वर्षे जुन्या घराचे फोटो, पारंपरिक मंदिर आणि केळीच्या पानावर वाढलेले पारंपरिक शाकाहारी जेवणाचे फोटो पोस्ट केले आहेत. दरम्यान, केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीमुळे काँग्रेसचे संघटन महासचिव के. सी. वेणुगोपाल हेही बैठकीस गैरहजर होते.

## लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणी एनआयएचे काश्मीर-लखनौत छापे

पान १ वरून

ठिकाणांची छाननी केली होती. लखनौमध्ये एनआयएच्या पथकाने कैसरबाग आणि मडियां भागात डॉ. शाहीन शाहिद व डॉ. परवेझ अन्सारी यांच्या घरांवर टाकलेला छापा सुमारे पाच तास टाकला. या छाप्यादरम्यान महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली. यावेळी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. खंडारी बाजार परिसरातील गल्ल्या सील केल्या होत्या. यापूर्वी विशेष न्यायालयाने लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणातील डॉ. मुझम्मिल शकील, डॉ. शाहीन सईद, मुफ्ती इरफान अहमद आणि अदील अहमद या चार आरोपींच्या कोठडीत शनिवारी १० दिवसांची वाढ केली आहे.

## अचानक निवडणूक पुढे ढकलल्याने संताप

पान १ वरून

जाऊ शकतात. निवडणूक आयोगाने याची दखल घ्यायलाच नको होती. खरे तर आयोगाचे अधिकारीच निर्णय घेतात. त्यांच्या निर्णयालाच न्यायालयात आव्हान देण्यात आले. या संदर्भातील काही प्रकरणांचे निकाल लवकर लागले, तर काहींचे लागले नाहीत. याचा अर्थ आधीचा निकाल, तोच कायम समजायला पाहिजे होता. परंतु आयोगाने चुकीचा अर्थ लावून जवळपास ३० नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका पुढे ढकलल्या. यामुळे निवडणुकीत मोठा अडथळा निर्माण झाला. मागील आठ-दहा दिवसांपासून उमेदवार तयारी करत होते. आता ही निवडणूक २० डिसेंबरला होणार. त्यामुळे कार्यकर्ते,पक्ष यांची मेहनत वाया गेली. काही ठिकाणी मतदाराला दोन वेळा मतदानाला जावे लागेल. याचा परिणाम मतदानावर होईल. या निर्णयानंतर आता किमान निकाल तरी एकत्र जाहीर करण्यात यावा. उद्या लोक जाणीवपूर्वक निवडणूक तारखा लांबवून उशीर करतील. पुढे निवडणुकीतून पलायन करण्याचा किंवा दिशाभूल करण्याचे प्रकार होतील. हे आयोगाने टाळले पाहिजे. या विषयाचे पुनरावलोकन केले पाहिजे.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, आयोगाचे निवडणुकीचे नियोजन चुकीचे आहे. छाननी झाल्यानंतर आलेल्या याचिकांवर निर्णय घेण्यास किती वेळ लागेल. यासंदर्भात विचार आयोगाने केला नाही. यावर निर्णय होऊ शकला नाही, निर्णयानंतर वेळ मिळाला नाही अशी कारणे दिली आहेत. आयोगाचा कार्यक्रम कोणी ठरवला आहे, याबाबत शंका निर्माण होते. लोकशाहीची प्रक्रिया असते. ती निष्पक्ष असली पाहिजे. आयोग लोकांना वेठीस धरत आहे.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीएका निवेदनाद्वारे राज्य निवडणूक आयोगाकडे निवडणुका स्थगित करण्याचा निर्णय बदलावा व पूर्वीच्या कार्यक्रमाप्रमाणे या निवडणुका घ्याव्या, अशी मागणी केली आहे. ते म्हणाले की, हा निर्णय सर्व उमेदवारांवर अन्याय करणारा आहे. नगरपालिका निवडणूक नियम १९६६, राज्य निवडणुक आयोगाचे ४ नोव्हेंबरचे सहपत्र आणि २९ नोव्हेंबर रोजी निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश यात समन्वयाचा अभाव आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी अपिलाचा निर्णय २६ नोव्हेंबर नंतर लागला असेल किंवा उमेदवार स्वत: शपथपत्र देत असल्यास या निवडणुका स्थगित न करता त्या पूर्वीच्याच कार्यक्रमाप्रमाणे घेण्यात याव्यात.

## व्होटचोरीवरून विरोधक आक्रमक

पान १ वरून – त्यांनी घोषणाबजीने सभागृह दणाणून सोडले. त्यामुळे अध्यक्षांनी कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केले. दुपारी दोन वाजता कामकाज सुरू होताच विरोधकांनी गदारोळ सुरूच ठेवला. त्यामुळे अखेर कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. राज्यसभेतही एसआयआरच्या मुद्यावरून थोड्याबहुत फरकाने असेच चित्र होते.

## आगरी-कोळी गाण्यांनी धम्माल उडवून देणारे पार्श्वगायक

## संतोष चौधरी उर्फ दादूस

**भिवंडी तालुक्यातल्या कामतघर या गावात राहणारे संतोष चौधरी हे दादूस आणि 'कोळी समाजाचे बप्पी लाहिरी' म्हणून प्रसिद्ध आहेत. वास्तव्य आहे. अंगावर दोन ते अडीच किलोचं सोनं घालून हळदींच्या कार्यक्रमात स्टेजवर गाणं गायला ते उभे राहतात. त्यामुळेच त्यांना गोल्डमॅन म्हणून पण ओळखलं जातं. त्यांना लहानपणापासूनच गाणी म्हणायची आवड होती. इयत्ता आठवीपासूनच ते कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ लागले होते. यासाठी ते स्वत: एखाद्या ठिकाणी हळद, दांडिया, पूजा असेल तर कार्यक्रम करतो सांगून गाणी म्हणायचे. हळूहळू हीच आवड जोपासत त्याचं कायम स्वरुपी करिअर त्यांनी निवडलं. त्यांच्या पत्नी योगिता पण गायिका आहेत. संतोष चौधरींना दादूस कसं नाव पडलं याच्या बद्दल त्या सांगतात.**





माझी आणि त्यांची ओळख ही गाण्यांचे कार्यक्रम सादर करतानाच झाली. मी त्यांच्या टीममध्ये पूर्वीच कलाकार म्हणून सहभागी झाले होते. नंतर आमचं लग्न झालं. मला आमच्या टीममधले इतर सगळेच जण बहीण किंवा वहिनी मानायचे. आमच्याकडे बहिणीच्या नवऱ्याला 'दादूस' म्हटलं जातं. त्यानंतरच त्यांचं नाव दादूस पडलं. आता लोक त्यांना दादूस म्हणूनच ओळखतात. दादूस उर्फ संतोष चौधरी यांनी अनेक आगरी आणि कोळी गीते गायली आहेत. तसेच त्यांच्या सीडी डीवीडी देखील आल्या आहेत. काही काळापूर्वी झी मराठीवरील ' सा रे ग म प लिटिल चॅम्स' कार्यक्रमात ते पाहुणे म्हणून दिसले होते. छोट्या पडद्यावरील लोकप्रिय रिएलिटी शो बिग बॉस मराठीच्या तिसऱ्या सीझन मध्ये दादूस दिसत आहेत. आगरी कोळी समाजातून बिग बॉस मराठीमध्ये झळकणारे दादूस हे पहिलाच कलाकार आहेत. लोकप्रिय गायक म्हणून ओळखल्या जाणारे दादूस यांचा स्वभाव आक्रमक आहेत. त्यामुळे अनेक वादग्रस्त प्रकरणांमुळेही ते चर्चेत आले आहेत.

## आजारपणात राऊत यांची पत्रकार परिषद शिंदेंचे ३५ आमदार भाजपा फोडणार

पान १ वरून

आहेत. उद्धव आणि राज ठाकरे यांची सकारात्मक चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर त्यांनी एकनाथ शिंदेंवर आणि भाजपावर कडाडून टीका केली. रवींद्र चव्हाण यांची भाजपा प्रदेशाध्यक्ष म्हणून नेमणूक याचसाठी झाली की, त्यांनी शिंदेंचे ३५ आमदार फोडायचे. शिंदे गटाचा कोथळा अमित शहाच काढणार, हे लिहून ठेवा, असे राऊत यावेळी म्हणाले.

पत्रकार परिषदेमध्ये बोलताना संजय राऊत यांनी प्रथम आपल्या प्रकृतीबद्दल माहिती दिली. राऊत म्हणाले की, मी बरा असतो तर नगरपालिका प्रचारासाठी महाराष्ट्रात फिरलो असतो. शिंदे गटाच्या गुलाबो गँगने सांगितले आहे १ तारखेला लक्ष्मीदर्शन होणार आहे. आता निवडणूक आयोगाने याची दखल घेतली पाहिजे. काही ठिकाणी १० हजार किंवा १५ हजार एका मतामागे असे लक्ष्मीदर्शन सुरू आहे. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये पैशांचा इतका खेळ कधीही झाला नव्हता. राज्याचे मुख्यमंत्री किंवा सरकार या निवडणुका लढवतच नव्हते. स्थानिक पातळीवरच या निवडणुका होत होत्या. आता पाच-सहा हेलिकॉप्टर व खासगी विमाने वापरली जात आहेत. आम्ही निवडणुका स्थानिक कार्यकर्त्यांवर सोडल्या आहेत. लोक म्हणतात की, विरोधक निस्तेज आहेत, तसे मुळीच नाही. या राज्याची निवडणूक संस्कृती उद्ध्वस्त झाली आहे. मागच्या चार ते पाच वर्षांत देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हे घडले आहे. सध्याच्या घडीला तू मोठा की मी मोठा अशी स्पर्धा तीन सत्ताधारी पक्षांमध्ये सुरू आहे. लोकं विकत घेता येतात असे समजणारे फडणवीस यांनी यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व पाहिले असते तर असे केले नसते, अशी टीका राऊतांनी केली. शिंदेंना वाटते की, दिल्लीचे दोन नेते (मोदी-शहा) त्यांच्या पाठीशी आहेत, पण ते कोणाचेच नाहीत. शिंदेंचा पक्ष फुटलेला आहे. अमित शहा यांनीच हा गट तयार केला.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे व राज ठाकरे पालिका निवडणुका एकत्र लढविणार आहेत. त्यामध्ये सकारात्मक चर्चा सुरू आहे. जागावाटपावर बैठका होत आहेत. राज ठाकरेंनी तयार केलेले निवडणूक-संबंधित प्रेझेंटेशन उद्धव ठाकरे यांना खूप आवडले. मोदी-शहा-अदानी यांची सर्वात मोठी इच्छा आहे की, ठाकरे बंधू एकत्र येऊ नयेत. पण ते एकत्र येण्याचीच शक्यता खूप जास्त आहे. काँग्रेसशी आमची चर्चा सुरू आहे. बिहार निवडणुकीनंतर त्यांचा विश्वास वाढला असेल तर ते मुंबईत एकटे लढतील. मी डिसेंबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात दिल्लीला जाणार आहे तेव्हा काँग्रेसच्या हायकमांडशी चर्चा करीन. काँग्रेसने आमच्यासोबत यावे ही आमची भावना आहे. काँग्रेसने आमच्याबरोबर असणे ही आमची भूमिका आहे. राज ठाकरे बरोबर आल्याने भाजपाचा पराभव होणार आहे. मुंबईचा शत्रू म्हणजे भारतीय जनता पक्ष आहे. अदानीच्या घशात मुंबई घातली जाते आहे. ते थांबवायचे असेल तर राज ठाकरेंना बरोबर घेणे आवश्यक आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## एकनाथ शिंदेंची विरोधकांकडून खिल्ली

पान ८ वरून

हॅलो उदयजी, मी आता कळंबमध्ये आलोय, मी एकनाथ शिंदे बोलतोय, उदयजी तुम्हीच का मंत्री? इथं लोकांची एक समस्या आहे. इथलं एक हालगाट दूध देत नाही... आता त्याचं दूध का तेवढं काढून द्या. मग मंत्र्यांनी सांगायचं, काळजी करू नका साहेब, लगेच चरवी दूध काढून दोन दिवसात पाठवतो कळंबला, कशानं हाणाव आम्हाला? काय पद्धत आहे? कायबी आलं की हॅलो.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात जोरदार करत म्हणाले की, जिथं जातील तिथं एमआयडीसी मंजूर करतात. लोक म्हटले की, थोडे पाणी पाहिजे, ते म्हणतात, धरण मंजूर. धरणाला नदी नाही, नदी मंजूर. नदीला पाणी नाही, डोंगर मंजूर. निवडणुकीत बनवाबनवी करायची यांना सवय झाली आहे. पण आता अशी ही बनवाबनवीचा कार्यक्रम चालणार नाही. लोकांच्या लक्षात आले आहे.

तर उबाठाच्या सुषमा अंधारे यांनीही शिंदेंना टोला लगावत म्हटले की, आम्हाला एकनाथ शिंदे अन् उदय सामंत यांच्यासारखे फोनवर नकली बोलायची गरज नाही.

## शहाजीबापूंवर धाड! रडू कोसळले

पान १ वरून

ऑफिसमध्ये दाखल झाले. तुम्ही बसून राहा. आम्हाला तपासणी करायची आहे, असे त्यांनी सांगितले. त्यांना मी सांगितले की, मला गोळ्या घ्यायच्या आहेत, मला जाऊ द्या. त्यांनी मला तीन-चार तास बसवून ठेवले. कार्यकर्ते, पत्रकारही त्याठिकाणी होते. त्यांनाही रोखून धरले. १९५२ पासून येथे निवडणुका होत आहेत. तेव्हापासून पहिल्यांदा असे घडले आहे. वेदना झाल्या, काय करावे? आज मी राजकारणातून संन्यास जाहीर करण्याच्या मानसिकतेत आहे. चार-आठ दिवस वाट बघून वरिष्ठांशी चर्चा करणार आहे. मला कधीच कोणी साथ दिली नाही. परंतु ज्या पद्धतीने मला खेळवले, जागावाटप करायचे आहे, एकत्र चर्चा करू असे सांगून मला अर्ज भरेपर्यंत अंधारात ठेवले. ऐनवेळी मला युती जुळत नसल्याचे कळवले. १२ उमेदवार तयार होते. कसेतरी पॅनल उभे केले.

ते पुढे म्हणाले की, या कारवाईमागे दीपक साळुंखे यांचा हात आहे. ते रोज मुंबईला जाऊन सर्व पक्षांच्या कार्यालयात जाऊन बसतात. परंतु कोणत्याही पक्षाने त्यांना प्रवेश दिलेला नाही. आता ते मंत्री जयकुमार गोरे यांचे सल्लागार झाले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस असे पाप करणारा माणूस नाही. याची मला ९९ टक्के शाश्वती आहे. हे सर्व स्थानिक नेत्यांचे कारस्थान आहे. जयकुमार गोरे माझा ज्येष्ठ म्हणून सन्मान करतात. परंतु दीपकच्या नादी लागून ते का बिघडले हे समजत नाही. आताची निवडणूक होऊन जाईल. परंतु पुढच्या सर्व निवडणुकांवर त्याचा परिणाम होईल. येथे लोकसभेत भाजपा उभे राहिले तर मी लोकांकडे कमळासाठी कसे मत मागू? याची जबाबदारी आता जयकुमार गोरे यांनी घ्यावी. सांगोल्याच्या मतदारांनी स्वाभिमान जागृत ठेवावा असे आवाहन करतो.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मला याची कल्पना नाही. पण कुणी सत्तेत आहे किंवा सत्तेबाहेर आहे यावरून धाड ठरत नाही. आमच्याही एखाद्या कार्यकर्त्याविरोधात तक्रार आली तर त्याचीही प्रकरणात चौकशी होते. माझीही गाडी अनेकवेळा तपासली जाते. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, हे फारसे गंभीर प्रकरण नाही.

# नवा काळ

• पुणे | मंगळवार २ डिसेंबर, २०२५ • पान -८




## येत्या गुरुवारी रात्री सुपरमून दर्शन होणार!

**ठाणे -** येत्या गुरुवारी, ४ डिसेंबर रोजी श्रीदत्तजयंतीच्या दिवशी, मार्गशीर्ष पौर्णिमेच्या रात्री आकाशात रात्रभर सुपरमूनचे दर्शन होणार असल्याचे पंचांगकर्ते, खगोल अभ्यासक दा.कृ.सोमण यांनी सांगितले. याविषयी अधिक माहिती देताना श्री.दा.कृ.सोमण म्हणाले की, चंद्र पृथ्वीपासून सरासरी ३ लक्ष ८४ हजार कि.मीटर अंतरावर असतो. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या ३ लक्ष ५६ हजार ९६२ कि.मीटर अंतरावर येणार आहे. त्यामुळे त्या रात्री चंद्रबिंब १४ टक्के मोठे आणि ३० टक्के जास्त तेजस्वी दिसेल. संपूर्ण भारतातून साध्या डोळ्यांनी आपणासर्वांस सुपरमूनचे दर्शन घेता येईल. गुरुवार ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजून १८ मिनिटांनी पूर्वेस सुपरमून उगवेल आणि रात्रभर आपणास दर्शन देऊन सकाळी ७ वाजून १४ मिनिटांनी पश्चिमेस मावळेल. यानंतर पुन्हा सुपरमून दर्शनाचा योग पुढल्यावर्षी २४ डिसेंबर २०२६ रोजी येणार असल्याचे श्री.दा.कृ.सोमण यांनी सांगितले.

## एका स्त्रीच्या नकाराने क्रांती घडली

**रुख्माबाईचा** जन्म १८६४ मध्ये बॉम्बेमध्ये झाला. तिची आई जयंतीबाई स्वतः बालवयातच विवाहबंधनात अडकली. लहान वयातच मातृत्व भोगले आणि सतराव्या वर्षी विधवा झाली. या दुःखद अनुभवात वाढलेल्या जयंतीबाईला बालविवाहाची क्रूरता माहीत होती. त्यामुळे, रुख्माबाई आठ वर्षांची असताना तिने समाजसुधारक आणि प्रख्यात वैद्य डॉ. सखाराम अर्जुन यांच्याशी पुनर्विवाह केला. डॉ. अर्जुन हे त्या काळातील मर्यादांच्या चौकटीतही मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे व्यक्तिमत्व होते. त्यांनी रुख्माबाईला अभ्यासासाठी प्रोत्साहन दिले आणि तिच्या घरात ज्ञानाचे वातावरण निर्माण केले.

**भारतीय समाजातील स्त्रियांच्या अधिकारांसाठी उभ्या राहिलेल्या अनेक लढ्यांपैकी एक लढा असा आहे, ज्याने केवळ समाजाचेच नव्हे तर एका साम्राज्याचेही लक्ष वेधून घेतले. हा लढा लढणारी स्त्री होती-रुख्माबाई. १८८०च्या दशकात, बालविवाहासारख्या रूढ प्रथांनी घट्ट पकडलेला भारतीय समाज आणि त्यावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याला एका तरुण स्त्रीच्या साध्या पण ठाम नकाराने अंतर्मुख व्हावे लागले.**



तथापि, समाजाच्या जाचक परंपरा इतक्या सहज पुसल्या जात नव्हत्या. रुख्माबाई अकरा वर्षांची असताना, तिचा विवाह दादाजी भिकाजी या उन्नीस वर्षांच्या तरुणाशी लावण्यात आला. त्या काळच्या रूढीनुसार, लग्नानंतरही ती आई-वडिलांसोबतच राहत होती. दादाजीला योग्य स्थिर पुरुष बनण्यासाठी वेळ दिला जात होता आणि रुख्माबाई तिचे शिक्षण गुपचूप पुढे नेत होती.

पण दादाजीच्या आयुष्याची दिशा वेगळीच निघाली. तो आळशीपणा, गैरजबाबदारी आणि कर्जात अडकत गेला. त्याला वाटू लागले की, त्याची बालवधू हीच त्याच्या समस्यांवरची सोपी उपाययोजना आहे. त्यामुळे १८८४ मध्ये, रुख्माबाई वीस वर्षांची असताना त्याने तिला आपल्या घरी येण्याची मागणी केली. रुख्माबाईने ठामपणे नकार दिला.

दादाजीने मग तिला न्यायालयात खेचले. रिस्टिट्यूशन ऑफ कॉन्जुगल राइट्स या कायद्यानुसार, पत्नीने नवऱ्यासोबत राहायला हवे-नाहीतर ती कायद्याने दोषी ठरते. दादाजीची भूमिका साधी होती-पत्नी माझी मालमत्ता आहे, तिने माझ्याकडे परत यावे. पण रुख्माबाईचा प्रतिवाद अद्वितीय आणि क्रांतिकारी होता. ती म्हणाली, माझा विवाह माझ्या इच्छेविरुद्ध, बालवयात झाला. तेव्हा मला विवाह म्हणजे काय हेच कळत नव्हते. मी कधीच संमती दिली नाही. स्त्रीला मालमत्ता मानले जाऊ नये, तिची इच्छा मानली पाहिजे-भारतीय न्यायालयात हे प्रथमच कोणी ठामपणे मांडत होते.

१८८५ मध्ये न्यायमूर्ती पिनहे यांनी तिच्या बाजूने निर्णय दिला. त्यांनी नमूद केले की विवाहासाठी संमती महत्त्वाची असते आणि रुख्माबाई विवाहाच्या वेळी संमती देण्याच्या पात्रतेत नव्हती. हा निर्णय एकाच क्षणात देशभर खळबळ माजवून गेला. रुढीवादी भारताने हा निर्णय हिंदू धर्मावरचा हल्ला मानला. परंपरावादी नेते, यामध्ये बाळ गंगाधर टिळक यांचाही समावेश होता, त्यांनी रुख्माबाईच्या अवज्ञेला इंग्रजी शिक्षणाचा परिणाम ठरवले. दबाव वाढत गेला आणि १८८६ मध्ये उच्च न्यायालयाने खालच्या न्यायालयाचा निर्णय उलथवला.

१८८७ मध्ये न्यायमूर्ती फरान यांनी अंतिम निर्णय दिला. रुख्माबाईने नवऱ्यासोबत राहायला जावे, अन्यथा सहा महिन्यांचा तुरुंगवास. रुख्माबाईचे उत्तर देशभर दणाणून गेले. मी तुरुंगात जाईन, पण संमतीशिवायच्या विवाहाला कधीच शरण जाणार नाही. ही घोषणा भारतातच नव्हे तर इंग्लंडमध्येही पोहोचली. ब्रिटिश वृत्तपत्रांनी तिच्या धैर्याचे कौतुक केले. इंग्लंडमधील महिला संघटनांनी तिच्या बाजूने आवाज उठवला. सुप्रसिद्ध विद्वान मॅक्स म्युलर यांनाही तिच्या शिक्षणात स्वनिर्णयाची शक्ती दिसली. दरम्यान, रुख्माबाई ए हिंदू लेडी या नावाने टाईम्स ऑफ इंडिया मध्ये लेख लिहू लागली. मुलींच्या हरवलेल्या बालपणाविषयी, अकाली मातृत्वाच्या दुःखांविषयी, शिक्षणाच्या संधी हिरावल्या जाण्याविषयी तिने निर्भीडपणे लिहिले. या दुष्ट प्रथेमुळे माझ्या आयुष्यातील आनंद नष्ट झाला. तिचे शब्द देशाच्या विवेकाला भिडले. रुख्माबाईने स्वतः राणी व्हिक्टोरियालाही पत्र लिहिले. मुलांच्या आणि मुलींच्या विवाहासाठी किमान वय निश्चित करण्याची मागणी केली. तिच्या या मागणीने सरकारचे लक्ष वेधले. जुलै १८८८ मध्ये तडजोड झाली. दादाजीने २,००० रुपये स्वीकारून विवाह रद्द करण्यास सहमती दर्शवली आणि रुख्माबाई मुक्त झाली.

मुक्त झाल्यानंतर तिने शिक्षणाचा मार्ग निवडला. डॉ. एडिथ पेची यांच्या मदतीने ती इंग्लंडला गेली आणि १८९४ मध्ये लंडन स्कूल ऑफ मेडिसिन फॉर विमेन मधून पदवी प्राप्त केली. भारतात परतल्यावर ती देशातील पहिल्या महिला डॉक्टर्सपैकी एक बनली. पुढील पस्तीस वर्षे सुरत आणि राजकोट येथील रुग्णालयांमध्ये मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून तिने हजारो महिलांची सेवा केली. साथीचे आजार पसरले तेव्हाही ती कामावर ठाम उभी राहिली.

सेवानिवृत्तीनंतरही ती मागे फिरली नाही. पर्दा प्रथेवर टीका करणारी पुस्तके प्रकाशित केली. आपल्या वसीयतपत्रात तिने मुलींच्या शिक्षणासाठी घर दान केले.

तिच्या खटल्यानंतर अवघ्या तीन वर्षांनी, १८९१ मध्ये, ब्रिटिश सरकारने एज ऑफ कन्सेंट ॲक्ट पारित केला. हा भारतीय मुलींना बालविवाहापासून संरक्षण देणारा पहिला महत्त्वपूर्ण कायदा होता. रुख्माबाईचे निधन २५ सप्टेंबर १९५५ रोजी झाले. तिने तिच्यावर दावा करणाऱ्या नवऱ्यापेक्षा, तिच्या देशावर राज्य करणाऱ्या साम्राज्यापेक्षा आणि तिचा आवाज दाबू पाहणाऱ्या प्रथांपेक्षा जास्त काळ जगले. २०१७ मध्ये गुगलने तिच्या १५३व्या जयंतीनिमित्त तिला डूडलद्वारे सन्मान दिला. पण तिची खरी परंपरा वेगळीच आहे-

प्रत्येक मुलगी जी आज शाळेत जाते, प्रत्येक स्त्री जिला स्वतःचे भविष्य निवडण्याचा अधिकार आहे, आणि प्रत्येक भारतीय आवाज जो अन्यायाविरुद्ध ठाम उभा राहतो. रुख्माबाई अकरा वर्षांची असताना तिला विवाहबंधनात अडकवले गेले. तिने आयुष्यभर लढा दिला की, पुढील कोणत्याही मुलीला तेच भोगावे लागू नये. आणि म्हणूनच-तिचा नकार ही केवळ वैयक्तिक बंडखोरी नव्हती, तो भारतीय समाजाच्या बदलाचा प्रारंभबिंदू ठरला.



## हॅलो, एमआयडीसी मंजूर करा!
### एकनाथ शिंदेंची विरोधकांकडून खिल्ली

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांचा नवा ट्रेंड सध्या चर्चेत आहे. स्थानिक स्वराज्य निवडणुकीचा प्रचार करत असताना भर प्रचारसभेतून ते आपल्या मंत्र्यांना फोन लावतात आणि स्थानिक जनतेची समस्या सांगून काहीतरी मंजूर करून घेतात. मात्र, यावरून विरोधक त्यांची यथेच्छ खिल्ली उडवत आहेत.

शिंदे यांनी पहिला फोन यवतमाळमधील पांढरकवडातील सभेतून उद्योग मंत्री उदय सामंत यांना लावून इथे रोजगाराची समस्या असल्याचे सांगत एमआयडीसीचा शब्द घेतला. यानंतर त्याच दिवशी वणी इथल्या सभेतून प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांना फोन लावून इथे कोळशामुळे हवा आणि पाणी दूषित होते, तत्काळ कारवाई करा, असा आदेश दिला. हा पॅटर्न लोकप्रिय होतो आहे, हे लक्षात आल्यावर शिंदे यांनी संगमनेरमधील सभेत एमआयडीसीसाठी पुन्हा उद्योगमंत्री उदय सामंत यांना फोन लावला. यानंतर शेवगावमधील सभेत, पाणीपुरवठा योजनेसाठी पाणीपुरवठा मंत्री गुलाब पाटील यांना फोन लावला. त्यानंतर उदगीर येथील सभेत शिंदे यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना फोन लावून रुग्णालयात सोनोग्राफी, एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

शिंदे हे सर्व फोन भरसभेत लावून माईकवरून उपस्थितांना ऐकवतात. त्याला सभेच्या उपस्थितांकडून जोरदार प्रतिसाद मिळतो. मात्र, विरोधक यावरून त्यांच्यावर उपरोधिक शैलीत टीका केली आहे. उबाठाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी एका सभेत शिंदे यांच्या भाषणाची नक्कलच करून दाखवली.

पान ७ वर

## कामाठीपुराच्या पुनर्विकासातून म्हाडाला एक हजार घरे मिळणार

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील कामाठीपुराचा समूह पुनर्विकास म्हाडा खासगी विकासाच्या माध्यमातून करणार आहे. विकासक जेवढे विक्री योग्य बांधकाम करेल त्याच्या ८.२५ टक्के वाढीव चटई क्षेत्रफळ म्हाडाला मिळणार आहे. म्हणजे जवळपास एक हजार घरे म्हाडाला यातून मिळणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाच्या कार्यालयातून कामाठीपुरा वसाहत सुमारे ३४ एकर जमिनीवर उभी आहे. यामध्ये ९४३ इमारती असून ८००० भाडेकरू आहेत. म्हाडाने पुनर्विकासासाठी काढलेल्या निविदेत विक्रीयोग्य ८.२२ टक्के वाढीव चटई क्षेत्रफळ म्हाडाला दिले जावे, अशी अट होती. मात्र ८.२५ टक्के अतिरिक्त क्षेत्रफळ देण्याचे विकासकाने मंजूर केले आहे. यानुसार ८ एकर जागेत मालक व भाडेकरूंसाठी पुनर्रचित इमारती उभारल्या जाणार आहेत. तर ८ एकर जागेत रस्ते, उद्यान व इतर पायाभूत सुविधा असणार आहेत. उर्वरित जागेत विकासकाला ५ लाख चौरस मीटरहून अधिक विक्रीयोग्य क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे. म्हाडाला एक हजार सदनिकांचा हिस्सा मिळणार आहे.

## मुंबईत आज आणि उद्याची १५ टक्के पाणीकपात रद्द

■ मुंबई

**भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत येणाऱ्या अनुयायींची गैरसोय होऊ नये म्हणून भांडुप जलशुद्धीकरण जलवाहिनी बदलण्याचे काम काही दिवसांसाठी स्थगित करण्यात आले आहे. त्यामुळे बुधवारी ३ डिसेंबर आणि गुरूवारी ४ डिसेंबर रोजी एकूण १४ प्रशासकीय विभागांमध्ये होणारी १५ टक्के पाणी कपात रद्द करण्यात आली आहे. तानसा धरणातून भांडुप जलशुद्धीकरण केंद्राची २७५० मिलीमीटर व्यासाची जुनी जलवाहिनी काढून नवीन जलवाहिनी अंथरण्याकामी काही कामे प्रस्तावित आहेत. त्यासाठी साधारण २४ तासांचा कालावधी आवश्यक आहे. मात्र महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनुयायींची गैरसोय होऊ नये म्हणून ही पाणीकपात रद्द करण्यात आली.

## हिवाळी अधिवेशनात ९ महत्त्वाची विधेयके

■ नवी दिल्ली

**आजपासून** सुरू झालेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात केंद्र सरकार नऊ अर्थविषयक विधेयके मांडणार आहे. यामध्ये विमा कायद्यात सुधारणा आणि तंबाखू, पान मसाला यांसारख्या हानिकारक पदार्थांवर कर आणि अधिभार लावण्याबाबतच्या विधेयकांचा समावेश आहे. संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येणाऱ्या विधेयकांची यादी सरकारने सर्व खासदारांना उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार विमा कायद्यात सुधारणा करून थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा ७४ टक्क्यांवरून १०० टक्के करण्याची तरतूद करण्यात येणार आहे. आतापर्यंत विमा क्षेत्रात ८२ हजार कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आलेली आहे. गुंतवणुकीची मर्यादा वाढवल्यानंतर परकीय गुंतवणुकीत मोठी वाढ होणे अपेक्षित आहे.

## आपचे पंजाबचे मुख्यमंत्री मान यांच्या विरूद्ध काहीच पुरावा नाही

■ अमृतसर



**दंगल** घडवणे आणि बेकायदेशीरपणे जमाव जमवण्याच्या खटल्यात पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि आम आदमी पार्टीच्या (आप) अन्य नेत्यांविरूद्ध कोणताही ठोस पुरावा नसल्याचे स्पष्ट करीत पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने हा खटला निकाली काढला.

वीजदरात वाढ केल्याच्या निषेधार्थ सन २०२० मध्ये आपच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात मान आणि आपचे अन्य नेते सहभागी झाले होते. याप्रसंगी आपच्या कार्यकर्त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याला घेराव घालण्याचा प्रयत्न केला. त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी पाण्याचे फवारे मारले. त्यामुळे संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केली होती. या प्रकरणी चंदिगड पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. हा खटला रद्द करण्यात यावा अशी मागणी मान आणि आपच्या वतीने उच्च न्यायालयात करण्यात आली होती. ती मान्य करत न्यायालयाने याचिका निकाली काढली.



## रुपाली ठोंबरे पक्षात नाराज शिंदे सेनेच्या मार्गावर?

■ पुणे

**अजित** पवार गटातील पुण्याच्या महिला नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची नुकतीच मुंबईत भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पक्षबदलाचे संकेत दिले. शिवसेनेने जर मला ऑफर दिली तर मी विचार करीन, असे म्हटल्यानंतर त्या शिंदे सेनेत प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादीमध्ये अशी चर्चा सुरू आहे की, सत्ताधारी पक्षात असूनही अपेक्षेप्रमाणे जबाबदारी मिळाली नसल्याचे रुपाली ठोंबरे-पाटील यांना वाटते. काही दिवसांपूर्वी त्यांच्याकडून प्रवक्ते पदाची जबाबदारीही काढून घेण्यात आली. पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा व महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यासोबत त्यांचे खटके उडाले. त्यानंतर त्यांची नाराजी वाढली आहे. रुपाली चाकणकर यांच्यावर टीका केल्यामुळे पक्षाकडून अलीकडेच रुपाली ठोंबरे-पाटील यांना पक्षशिस्तीचा भंग केल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस पाठण्यात आली होती. या नोटीसला रुपाली ठोंबरे-पाटील यांनी पत्र पाठवून उत्तर दिले होते. त्यांनी उत्तरादाखल दिलेल्या पत्रात म्हटले होते की, फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या मृत्यूसंदर्भात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांच्या मताशी मी सहमत नाही, हे माझे मत मांडले होते. मी राज्य महिला आयोगाबद्दल बोलले आहे, प्रदेशाध्यक्षांबद्दल बोलले नाही. दरम्यान, याबाबत पत्रकारांशी बोलताना रुपाली ठोंबरे-पाटील यांनी पक्षांतराच्या चर्चेचे खंडन केले.



भायखळ्यातील राणीच्या बागेत दोन बिबटे खेळत होते आणि त्यांचा खेळ पाहण्यासाठी पर्यटक थांबले होते. (छाया-दीपक साळवी)

## मुंबईसह राज्यात थंडीचा कडाका आणखी वाढणार

■ मुंबई

**मुंबईसह** उपनगरात रविवारपासून थंडीचा जोर वाढू लागला. घाटमाथ्यावर रात्री कडाक्याची थंडी पडत असून, थंडीचा जोर वाढणार असल्याचे भाकीत हवामान तज्ज्ञांनी केले आहे. उत्तर भारतात डिसेंबरच्या सुरुवातीपासूनच कडाक्याची थंडी जाणवू लागली आहे. पंजाबपासून दिल्ली-एनसीआर आणि आसपासच्या भागांमध्ये किमान तापमान ६ ते १० अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचले आहे. थंडीचा हा वाढलेला जोर नागरिकांना दिवसाही जाणवत आहे. या सगळ्याचा परिणाम महाराष्ट्रावरही होणार आहे. महाराष्ट्रात उत्तरेला पुढचे ४८ तासांत पारा आणखी घसरणार आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागांमध्ये थंडीचा कडाका आणखी वाढणार आहे. मध्य महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात थंडीची लाट येणार आहे.

## खासदार रेणुका चौधरी यांनी संसद परिसरात कुत्रा आणला

### हा चावत नाही, चावणारे संसदेत!

**काँग्रेस खासदार रेणुका चौधरी या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवारी आपला पाळीव कुत्रा घेऊन संसद परिसरात आल्या. त्यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, हा लहान आहे आणि अजिबात नुकसान न करणारा प्राणी आहे. संसदेत चावणारे दुसरेच आहेत, कुत्रे नाहीत. या वाक्यावर भाजपा खासदारांनी तीव्र आक्षेप घेतला.**



■ नवी दिल्ली

**रेणुका** यांना विचारण्यात आले की, त्या कुत्र्याला संसदेत का घेऊन आल्या आहेत, तेव्हा त्या म्हणाल्या की, यात काय अडचण आहे? हा कुत्रा संसद परिसरातच गाडीत बसून राहिला. त्याला संसद भवनाच्या आत नेण्यात आले नाही.

रेणुका राज्यसभा खासदार आहेत आणि २०२४ मध्ये तेलंगणातून राज्यसभेवर निवडून आल्या आहेत. त्या याआधी महिला व बाल विकास आणि पर्यटन मंत्रालयात स्वतंत्र प्रभार मंत्री होत्या. आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री देखील होत्या. त्या दोन वेळा लोकसभा खासदार होत्या आणि अनेक संसदीय समित्यांच्या सदस्यही होत्या. रेणुका चौधरी यांच्या कृत्यावर भाजपा खासदार जगदंबिका पाल यांनी नाराजी व्यक्त करीत म्हटले की, रेणुका चौधरी कुत्रा घेऊन संसदेत आल्या हे चुकीचे आहे.

## चिनी मांजाने गळा चिरला सोळा वर्षीय युवकाचा मृत्यू

■ इंदूर

**पतंग** उडवण्यासाठी वापरण्यात आलेल्या चिनी बनावटीच्या मांजाने गळा चिरल्यामुळे येथे एका सोळा वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. गुलशन असे या मुलाचे नाव आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. गुलशन आपल्या नव्या दुचाकीवरून मित्रांसोबत रालामंडल येथे फेरफटका मारण्यासाठी गेला होता. तेथून परतताना दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नेमावर पुलावर पतंगाचा मांजा त्याच्या गळ्याला अडकला. धारदार मांजा आणि दुचाकी वेगात असल्याने गुलशनचा गळा चिरला गेला. दुचाकीवर गुलशनच्या मागच्या सीटवर त्याचा चुलत भाऊ आणि दोन मित्र असे तीन जण बसले होते. त्यांनी गुलशनच्या गळ्यात रुतलेला मांजा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र मांजा एवढा धारदार होता की त्यांची बोटेही चिरली गेली. त्यांनी कसाबसा गुलशनच्या गळ्यात रुतलेला मांजा बाहेर काढला आणि त्याला नजीकच्या रुग्णालयात हलवले.

## देवेंद्र फडणवीस-शिंदेंचा एकाच हॉटेलात मुक्काम! मात्र भेट नाही

■ छत्रपती संभाजीनगर

**महायुतीतील** घटक पक्षाचे प्रमुख नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पैठण प्रचार दौऱ्यावेळी संभाजीनगरमध्ये एकाच हॉटेलमध्ये मुक्कामी थांबले होते. परंतु दोन्ही नेत्यांनी भेट घेतली नाही. त्यामुळे दोन्ही नेत्यांमध्ये अबोला आहे का? महायुतीत आलबेल नाही का? याची चर्चा सुरू झाली आहे. मात्र दोन्ही नेत्यांनी ही चर्चा निरर्थक असल्याचे स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माध्यमांना दिवसभर चालवण्यासाठी खाद्य मिळाले आहे. परंतु मी रात्री उशिरा आलो आणि आता लवकर जात आहे. मी माहिती घेतली. त्यांची सभा माझ्या सभेनंतर १ तास उशिरा नियोजित आहे. त्यामुळे भेट झाली नाही.

उद्या होईल. आम्ही दोघेही सध्या प्रचारात व्यग्र आहोत. फोनवर आमचा रोजच संवाद होतो. त्यामुळे आता भेट झाली किंवा झाली नाही तरी काहीही फरक पडत नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही वेळेचा मेळ बसला नाही म्हणून भेट झाली नाही. आमचे रोजच बोलणे होते असे सांगितले.